

शिक्षण, व्यवसाय, उद्योग यांचा संस्कार करणारे सायंदैनिक


# प्राजक्त

आद्य संस्थापक व संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी


वर्ष : ४९ अंक : १७ कोल्हापूर ता. १६ मे २०२२ पाने ७२ किंमत ६ रुपये

Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS









## सुवर्ण महोत्सवी

# आम्ही भिडे

## विशेषांक

मे २०२२

५०













पुण्यामध्ये राहून आता आस्वाद घ्या स्वादिष्ट व्यंजनाचा आपल्या

# गोकुळ रेस्टॉरंटमध्ये!

अनोख्या स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आनंद घ्या. खरोखर अस्सल गाव अनुभव घ्या भांडी आणि इतर गोष्टींसोबत आणि वातावरणासह!

**तर वाट कसली बघताय?**

लवकरच भेट द्या अभिरुची गोकुळला आणि अनुभवा गावाकडची मज्जा आपल्या आप्तेष्टांसह!

**मिश्र आसनव्यवस्था उपलब्ध:**
**टेबल्सची निवड करणे अथवा पारंपारिक पद्धतीने जमिनीवर बसणे.**

080 4889 0509 | +91 9922 190 221

**अभिरुची मॉल, टेरेस लेव्हल वडगाव बुद्रुक, 59/1क, भिडे बाग, सिंहगड रस्ता, पुणे 411 041.**



अभिरुची गोकुळ रेस्टॉरन्ट

gulmohor banquet

*Let good times blossom!*

लग्नकार्य, मुंज, शुभकार्य, स्नेहसंमेलन, कॉर्पोरेट इव्हेंट्स्

प्रसंग कोणताही असो,

**गुलमोहर बँक्वेट्स**

पूर्ण करील आपल्या सर्व अपेक्षा!




CAPACITY 50 TO 1200 PAX



मधुमालती हॉल

विलक्षण इनडोअर प्लस रूफटॉपचा हॉल सुसज्ज सर्व गोष्टींसह तुमच्या विशेष कार्यक्रमांसाठी!
अतिथींसाठी सुंदर लक्षवेधी कलाकृती सोबत विशेष आदरातिथ्य उपलब्ध!



**गुलमोहर येथे तुमचा उत्सव आजच बुक करा!**

गुलमोहर बॅन्क्वेट हॉल, टेरेस लेव्हल, अभिरुची मॉल, ५९/१ क भिडे बाग, सिंहगड रोड, वडगाव बु।।, पुणे – ४१

०८०४८८९०५०७ / ८६६९९ ८२२५५ / ८९५६०१४८४९ / ८९५६०१४८५०

info@gulmohorbanquethall.com www.gulmohorbanquethall.com

शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक
प्राजक्त
संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी
वर्ष : ४९ ● अंक : ५२ ● कोल्हापूर ता. १६ मे २०२२
Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS

## विश्वस्त व कार्यकारी मंडळ
श्री. शशिकुमार केशव भिडे, विश्वस्त, अध्यक्ष
श्री. प्रभाकर शंकर भिडे, विश्वस्त, उपाध्यक्ष
श्री. चंद्रकांत शंकर भिडे, विश्वस्त, कार्याध्यक्ष
श्री. दिलीप वासुदेव भिडे, विश्वस्त, सचिव
श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, विश्वस्त, कोषाध्यक्ष
ले.क.(नि.) सुनिल वासुदेव भिडे, विश्वस्त, उपसचिव
श्री. प्रशांत सदानंद भिडे, विश्वस्त, उपकोषाध्यक्ष
श्री. प्रदीप जनार्दन भिडे, विश्वस्त
श्री. शंतनु निळकंठ भिडे, विश्वस्त
सौ. संपदा राजेंद्र भिडे, विश्वस्त
श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, विश्वस्त


# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

# आम्ही भिडे

मे २०२२ ✻ ५० वा सुवर्ण विशेषांक



नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
मुखपत्र
(खाजगी वितरण)
✻✻✻✻
संस्था नोदणी क्रमांक
ई-२०१४० मुंबई



• **पुणे कार्यालय :**
**ले.क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४/९६५७५४१२३६

• **मुंबई कार्यालय :**
**सौ. संपदा भिडे**
ए-५०३, श्री साई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई ४०००२८. मो. ९८१९९५१३९१
e-mail : **office@bhidekul.in**
website : **www.bhidekul.in**

## *संपादकीय...*

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची मुहुर्तमेढ झाल्यामुळे आपण भिडे मंडळी गेली २२ वर्षे एकत्र आहोत आणि राहणार आहोत. वार्षिक सभा, स्नेहसंमेलन, भोंडला, हळदीकुंकू यांसारखे समारंभ आणि वेबसाईट, आम्ही भिडे ह्या माध्यमांद्वारे आपण एकमेकांशी संपर्कात आहोत. गेल्या २२ वर्षांत प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक, वैद्यकीय, पूरग्रस्त मदत किंवा खेळासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत करीत आहोत.

सांगली येथे २००३ मध्ये पहिला 'आम्ही भिडे' अंक प्रकाशित झाला. त्याच वेळेस 'आम्ही भिडे' मुखपत्र संपर्काचे माध्यम ह्या दृष्टीने त्रैमासिक किंवा अर्धवार्षिक असावा असा विचार प्रदर्शित केला गेला. परंतु कुलवृत्त प्रकाशनाची व्यस्तता आणि त्यानंतर प्रतिष्ठानची विस्कटलेली आर्थिक घडी ह्यामुळे प्रत्येक भिडे संमेलनात एक अंक प्रकाशित होऊ लागला. सन २०११ चे मुंडाजे संमेलनापासून अंकासाठी जाहिरात, देणगी मिळाली तर विनामूल्य अंक वितरण होऊ शकेल ह्या दृष्टीने प्राजक्त ह्या एजन्सीद्वारे आपण त्रैमासिक अंक सुरू केले. त्यामुळे आजपावेतो ४९ अंक भिडे मंडळींपर्यंत विनामूल्य पोचवत आहोत ही जमेची बाजू आहे. आज ५० वा सुवर्ण विशेषांक म्हणजे भिडे कुटुंबाचे मुखपत्र प्रकाशित करताना आनंद होत आहे. हा विशेषांक फुलविण्याचे व सजविण्याचे कार्य ज्या लेखकांनी केले त्यांचे आभार मानणे कर्तव्य आहे. तसेच होऊन गेलेली संमेलने व त्यांची वैशिष्ट्ये सांगणारे लेखन, भिडे प्रतिष्ठान व त्याचे कार्य हे प्रेरणादायी आहे. ज्या व्यक्ती व संस्थांनी जाहिराती उपलब्ध करून दिल्या एवढेच नाही तर भिडे नसूनसुद्धा 'आम्ही भिडे'च्या वाचकांनी हितचिंतकांनी जाहिरात, देणगी ह्या माध्यमातून अंक पुढे चालविण्यासाठी आर्थिक भार लावला ह्यावरून त्यांचे सुद्धा भिडे कुलावर असलेले प्रेम दिसून येते. 'आम्ही भिडे' प्रत्येक अंकाचे काम प्राजक्त एजन्सीचे श्री. प्रफुल्ल डबीर हे प्रिटिंग, सेटिंग, पेस्टींग, फोल्डींग करून वितरणापर्यंत काम करतात तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. विनीता डबीर ह्या डीटीपीची जबाबदारी उत्तम सांभाळतात. ह्या दाम्पत्याला त्यांच्या इतर कामाची कितीही घाई असली तरी घाईत 'आम्ही भिडे'च्या असलेल्या तगाद्यास प्रथम प्राधान्य देतात त्यासाठी त्यांना धन्यवाद देणे उचित समजतो. तसेच लहानसहान कामात ज्या अनेकांची मदत झाली त्यांचे आभार मानून इथे थांबतो.

आम्ही भिडे
अंक ५० वा

संपादक : **श्री. प्रभाकर शंकर भिडे**
कार्यकारी संपादक : **श्री. दिलीप भिडे**

**संपादक मंडळ :** ले.क. सुनील भिडे, श्री. राजेंद्र भिडे, सौ. स्नेहल भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. माधव भिडे, श्री. विनायक भिडे

**सल्लागार मंडळ :** श्री. सुनील भिडे (अभिरुची), श्री. के. मो. भिडे, डॉ. प्रतिभा भिडे, श्रीमती सुमती वा. भिडे, श्रीमती प्रतिभा भिडे, श्री. शंतनु नि. भिडे, सौ. मेघना भिडे

**अक्षर जुळणी :** सौ. विनीता डबीर

**सहवेदना :** भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात भिडे व्यक्तींचे निधन झाले त्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धा सुमने अर्पण करीत आहे.


**१) श्री. रत्नकुमार चिंतामणी भिडे, कामोठे, पनवेल** **२) श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे.**

## • अनुक्रमणिका •

संपादकीय ........ १
पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठाविषयी थोडेसे...! ........ ३
भिडे प्रतिष्ठान विश्वस्त व कार्यकारिणी ........ ६
जवळून पाहिलेले २००७ चे भिडे संमेलन ........ ९
परंतु या सम हा ! ........ ११
शेवट आहे सरणावरती ........ १२
प्रतिष्ठानच्या परिवारात ........ १३
भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! ... १४
२०११ कर्नाटक (मुंडाजे) संमेलन आणि मी ........ १५
स्वर्गाचे सरकार : मंत्रिमंडळ ........ १६
स्वीकृत सदस्य अभिनंदन ! ........ १६
मी अनुभवलेली वाटचाल ........ १७
भारतीय सेनेचे अधिकारी ........ १९
Major General Sanjay Waman Bhide
कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी ........ २०
ज्येष्ठ गायिका, निवेदिका : सौ. नीला रवींद्र (भिडे) ........ २३
मुलाखत : एका नाट्यकलाकाराची ........ २६
मागे वळून पाहताना... ........ २९
दिलखुश रेडिओ... ........ ३०
देशातील पहिली मराठी शाळा - भिडे वाड्यात ........ ३२
असेही काही समाज कार्यकर्ते भिड्यांमध्ये आहेत !.... ३३
भिड्यांच्या उल्लेखनीय बाबी आपल्याला ........ ३४
माहीत आहेत का ? ........ ३४
धन्य असा पुत्र ! ........ ३४
पुनर्भेट ! ........ ३५
कौतुक ........ ३५
चारमडी (मृत्युंजय) नदीवरील जलविद्युत प्रकल्प.... ३६
संघ प्रार्थना अर्थासह ........ ३७
भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू ........ ३७
शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सुवर्णकन्येचे मनोगत. ३८
कुल संमेलने ........ ३८
कोवळ्या वयात ! ........ ४१
मनोगत ! ........ ४३
क्रीडा गौरवांकित भिडे दाम्पत्य ........ ४४
हार्दिक अभिनंदन ! ........ ४५
मला मिळालेला पुरस्कार ........ ४६
श्री व्याडेश्वर देवाची कथा ........ ४७
महाकवी सावरकरः ........ ४८
एक सत्कार : आनंद आणि दुःख ........ ४९
धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना ........ ५१
गिरनार दर्शन : आनंद निधान ........ ५३
गणपतीची इंग्रजी आरती ........ ५६
नर्मदा परिक्रमा एक अनुभूती ........ ५७
श्री योगेश्वरीदेवी आंबेजोगाई, जि. बीड ........ ५८
घर ! ........ ५९
भारतीय जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धन ........ ६५
नेते व राजकारण ........ ६८
एक पणती ! ........ ६८

# पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठाविषयी थोडेसे...!

**– अतुल आत्माराम भिडे,** ठाणे.
मो. ९८२१५१५०७३




*(पूर्वीच्या काळी विद्यार्जन पूर्ण झाल्यावर विद्यार्थी गुरुजनांना अभिवादन करीत त्यावेळी आपली ओळख सांगताना प्रत्येक विद्यार्थी मी अमूक प्रवराचा तसे आपले गोत्र, वेद, सुक्त, शाखा यांचा उल्लेख करीत असत. ऋषी परंपरेत कोणता वर्ण कोणत्या वंशातील आहे हे समजण्यासाठी गोत्र आणि प्रवर या संकल्पनांचा उदय झाला. विशिष्ट कुलांपैकी अलीकडच्या ऋषींच्या नावावरून हे गोत्रनाम प्रस्थापित केले जात असे. अंगिरस, अगस्थ आणि भृगू हे तीन, आद्य गोत्रकार समजले जातात. प्रवराचा अर्थ 'प्रार्थना' असा होतो. चित्पावन ब्राह्मणांची चौदा गोत्रे असून काही ऋग्वेदी सूत्रांची, काही कृष्ण यजुर्वेदी म्हणजे हिरण्यकेशी सूत्रांची आहेत. या चौदा गोत्रांचे प्रवर्तक ऋषी सातच आहेत. सूत्रकारांनी विशिष्ट गोत्रांचे विशिष्ट प्रवर ऋषी सांगितलेले आहेत. अंगिरस-नित्युंदन, विष्णुवृद्ध. नित्युंदन गोत्राच्या प्रवरात अंगिरस, पौरुकुत्स व म्यासदस्थव हे तीन प्रवर ऋषी आहेत. ते मूळचे क्षत्रिय असून प्रथम राजर्षी आणि नंतर ब्रह्मर्षी झाले आहेत. भारद्वाज, कपि, नित्युंदन आणि विष्णुवृद्ध यांच्या प्रवरात अंगिरस हा एक समान सूत्रकार ब्रह्मर्षी आहे. वज्र कुलोत्पन्न अंगिरस ऋषी ब्रह्मर्षी असून बृहस्पतीचे पिता आहेत.)*

पहिल्या 'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन सांगली भिडे कुलसंमेलनात ३० नोव्हेंबर, २००३ रोजी करण्यात आले. या मुखपत्राचे संपादक, लेखक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार, मुद्रक व प्रकाशक सर्व भिडे कुलोत्पन्नच आहेत. भिडे कुलवृत्ताची माहिती संकलित करत असताना अनेक विषयांवर चर्चा होत असे. भिडे कुलोत्पन्नांपर्यंत आपले विचार मांडण्यासाठी एखादे छापील स्वरूपात व्यासपीठ उपलब्ध व्हावे ह्या उद्देशाने 'आम्ही भिडे' हे अनियतकालिक मुखपत्र सुरू करावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यामध्ये स्व. दामुकाका, प्रभाकरपंत, विनायकराव, राजमुद्राचे अभय व स्व. सतिश भिडे, व्यंकटेश आणि मी अशी मंडळी सहभागी झाली होती. ह्या अंकाचा 'आम्ही भिडे' लोगो, डिझाईन, प्रिंटिंग ही जबाबदारी माझ्यावर होती. तसेच पहिल्या आवृत्तीच्या वेळेस माझे आजोबांनी केलेल्या कामाची आठवण सुद्धा सतत येत होती. ह्या मुखपृष्ठावर मूळ ऋषींना अभिवादन करणारा एक श्लोक आहे. त्यामागे विटांची भिंत दाखविली असून त्याचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वी भिडे मंडळी यज्ञवेदीची विटांनी रचना करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींपैकी होते त्याचा निर्देश दाखविण्यासाठी भिंत दाखविली आहे. त्यामध्ये आपल्या एका देवळाची प्रतिकृती चित्रित केली आहे. या भिंतीमधील एकजूट, एकसंधपणा असाच टिकावा हे दाखविण्याचा प्रयत्न आहे.

असे म्हणतात की, आपुलकीची ज्योत तेवत ठेवायची असेल तर सहवासाचे तेल घालावे लागते. 'आम्ही भिडे' ह्या आपण सर्वांनी, सर्वतोपरी साहाय्य करण्याचा निश्चय करून हे मुखपत्र एखाद्या नंदादीपाप्रमाणे तेवत राहून भिडे कुलाच्या सर्व भावी योजनाकार्याला प्रकाशमय मार्ग दाखविण्याचे काम करेल या विश्वासाने प्रार्थना करू या. ह्या ५० व्या सुवर्ण विशेषांकात पहिल्या अंकाची आठवण लिहिण्यासाठी खूप आनंद होत आहे. त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

## आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा....

फरसाण, मिठाई, श्रीखंड, बासुंदी, गुलाबजाम
अशा चविष्ट-दर्जेदार-वैविध्यपूर्ण पदार्थांची
१०० वर्षांची 'गोड परंपरा'

Franchisees of अनंत हलवाई
All types of Sweets

स्वादिष्ट रुचकर घरगुती पुरणपोळी

गुळ पोळी, उकडीचे मोदक, चिवडा, शंकरपाळे, भाजणीची चकली, स्पे. बेसन लाडु व इतर पदार्थ

कनक KANAK ORGANIC Fresh & Healthy

शुद्ध, ताज्या व नैसर्गिक भाज्या, फळे आणि कडधान्ये

Instant TEA & COFFEE
GeeBees
Golden Beverages

इंस्टंट चहा, कॉफी, केशर इलायची उकाळा तसेच इंस्टंट टोमॅटो सूप व मंच्याव्ह सूप मिळेल.

DHANWANTARI DISTRIBUTORS PVT. LTD.
Ayurvedic Food Products

रोग्यांना निरोगी करणारी आणि निरोग्यांना अधिक उत्साही करणारी

आनंदी उत्साही मन,
सक्रीय निरोगी तन,
उत्सव असो वा सण,
सुंदर-सुगंधी क्षण!




संस्थापक-मालक-चालक
श्री मोहन भिडे 'आपला गोड मित्र'
९८२० ४५१ ३४४

Sweet Family Friend!
KANAK ENTERPRISES
Everest Shopping Center
Opp. Railway Station, Dombivli-W
0251-2480 394

कनक TM

ugamcreative.in


कलाक्षेत्रम
सिल्कस् ॲण्ड सारिज्
विणकर को-ऑपरेटिव्ह सोसायटी
लग्न बस्त्याचे
खास दालन
४०६,शॉप नं. २, नारायण पेठ,
लक्ष्मी रोड, पुणे - ३०
फोन : ०२०-२४४८६८७७ / २४४५०९३१
Email : kalashetramsilkandsarees999@gmail.com
8530011999 / 8530033999
आम्ही भिडेच्या ५० व्या
अंकासाठी शुभेच्छा !

# भिडे प्रतिष्ठान विश्वस्त व कार्यकारिणी

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजी तळेगांव दाभाडे, पुणे येथे संपन्न झाली. दिवंगत भिडे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना श्रद्धांजली वाहण्यात आली. वार्षिक ताळेबंद नियंत्रक समितीने मंजूर केल्यानंतर इतर विषय घेऊन विचारविनिमय झाला. काही ठराव संमत करण्यात आले. त्यानंतर भिडे प्रतिष्ठानची विश्वस्त आणि कार्यकारिणीची घोषणा निवडणूक अधिकारी श्री. शशिकांत भिडे, पुणे ह्यांनी केली. अध्यक्षस्थानी मा. कुमार विष्णू भिडे होते. त्यानुसार ऑक्टोबर २०२१ ते सप्टेंबर २६ ह्या पाच वर्षांसाठी खालील विश्वस्त व कार्यकारिणी अस्तित्वात आली.

**१) विश्वस्त व अध्यक्ष श्री. शशिकुमार केशव भिडे**

पुणे. वय ८२ वर्षे



सन १९८४ ते २००२ पर्यंत रूपी बँकेचे अध्यक्षपद भूषविले. अष्टांग आयुर्वेद संस्था व इतर यांसारख्या निरनिराळ्या संस्थांच्या पदांवर काम केले आहे. आर. के. करंदीकर मेमोरियल ट्रस्ट तर्फे दरवर्षी गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थिनींना शैक्षणिक आर्थिक मदत करतात. कुलवृत्त प्रकाशनानंतर प्रतिष्ठानची आर्थिक ओढाताण होत असताना संचित निधी **(Corpus Fund)** जमा करून त्याच्या व्याजावर व मिळणाऱ्या निधीच्या व्याजातून प्रतिष्ठानचे कामकाज चालवावे ही संकल्पना प्रथम मांडली. प्रतिष्ठानचे संमेलन, वार्षिक सभा व इतर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि मार्गदर्शन मोलाचे आहे. २००७ पासून भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष होते व ह्या पाच वर्षांसाठी प्रथमच त्यांच्याकडे अध्यक्षपद आले.

**२) विश्वस्त व उपाध्यक्ष श्री. प्रभाकर शंकर भिडे**

डोंबिवली. वय ८० वर्षे



उपाध्यक्ष म्हणून पुन्हा निवड. भिडे कुलवृत्ताचे दुसऱ्या आवृत्तीचे प्रमुख संपादक. भिडे प्रतिष्ठानच्या कुलवृत्त संकलन, माहिती तसेच प्रत्येक संमेलन व कार्यक्रम ह्यामध्ये सक्रिय सहभाग आणि बहुमोल मार्गदर्शन. प्रतिष्ठानचे सचिव, उपाध्यक्ष, कार्यवाह अशा विविध पदांवर कार्य. विविध विषयांवर लेखन करण्यात यांचा हातखंडा आहे. कुलवृत्तातील विशेष व्यक्तिमत्त्व सदरासाठी लेखन ह्यामध्ये त्यांचे योगदान. प्रतिष्ठानचे ज्येष्ठ व अनुभवी मार्गदर्शक. ग्रंथाली ह्या संस्थेशी निगडित आहेत.

**३) विश्वस्त व कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत शंकर भिडे**

ठाणे. वय ७१ वर्षे.



प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक. गृहबांधणी क्षेत्रात विश्वसनीय म्हणून गेली अनेक वर्षे अग्रणी आहेत. गेली १८ ते २० वर्षे भिडे प्रतिष्ठानसाठी उत्स्फूर्तपणे सहभाग. 'जेथे कमी तेथे आम्ही' ह्या उक्तीप्रमाणे प्रतिष्ठानच्या अडचणींच्या वेळी धावून येणारे, आधारवड. प्रतिष्ठान आर्थिक अडचणीत असताना "भिड्यांचे भिड्यांसाठी भिड्यांनी" सुरू केलेले हे काम अखंडपणे सुरू राहावे यासाठी सदैव सक्रिय असणारे आणि २००५ ला तळेगाव आणि २००९ किहीम ह्या दोन्ही भिडे संमेलनांचे पुरस्कर्ते.

**४) विश्वस्त व सचिव श्री. दिलीप वासुदेव भिडे**

पुणे. वय ६६ वर्षे.



प्रतिष्ठानचे सचिव म्हणून पुन्हा निवड. प्रतिष्ठानच्या कार्यात गेली १८ ते २० वर्षे कार्यरत. २०१४ अगोदर कार्यकारिणी समिती सदस्य तसेच दुसऱ्या कुलवृत्त संपादनामध्ये सक्रिय सहभाग आणि सहसंपादक. आम्ही भिडे अंक, वेबसाईट सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्रतिष्ठानची संमेलने, वार्षिक सभा आणि इतर कार्यक्रमांमधून सक्रिय सहभाग. भिडे भगिनींसाठी चैत्र गौरी हळदीकुंकू व भोंडला, व्याख्यान यांसारखे कार्यक्रम सुरू करण्याबाबत प्रयत्न केले. २००७ साली पुण्यात झालेल्या जागतिक चित्पावन संमेलनात भिडे संमेलनात १२०० च्या वर भिडे मंडळींची उपस्थिती असण्यासाठी विशेष प्रयत्न. २०१५ नाशिक भिडे कुल संमेलनामध्ये आदर्श कार्यकर्ता पुरस्कार विजेते.

**५) विश्वस्त व कोषाध्यक्ष श्री. माधव पुरुषोत्तम भिडे**

पुणे. वय ६२ वर्षे

प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष म्हणून पुन्हा निवड. प्रतिष्ठानच्या कार्यात २००७ पासून सक्रिय सहभाग. प्रतिष्ठानची वेबसाईट व आम्ही भिडे अंकासाठी कार्यरत. प्रतिष्ठानचा कोष सांभाळण्यासाठी आणि योग्यवेळी योग्य सल्ला देण्यासाठी अचूक व्यक्ती. निवृत्तीनंतरही नोकरीत कार्यरत आहेत.



**६) विश्वस्त व सहसचिव ले. क. (नि.) सुनिल वासुदेव भिडे**

पुणे. वय ६८ वर्षे.

निवृत्त सैन्य अधिकारी. ३७ वर्षे सैन्य दलात नोकरी, अनेक वर्षे सैन्यात नोकरी करून सुद्धा संस्कृत व मराठी भाषेवर विशेष प्रभुत्व असल्यामुळे आम्ही भिडे अंक, वार्षिक सभा, वेबसाईट व इतर कार्यक्रमांमध्ये सक्रिय व विशेष सहभाग. प्रतिष्ठानच्या कोणत्याही कामात सदा पुढे व अग्रणी असणारे शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व. सहसचिव म्हणून पुन्हा निवड. प्रतिष्ठानचे कामात ११ वर्षे सक्रिय सहभाग. २०११ मुंडाजे भिडे कुलसंमेलनातील साहस पुरस्कार विजेते.



**७) विश्वस्त व सहकोषाध्यक्ष श्री. प्रशांत सदानंद भिडे**

सातारा. वय ५९ वर्षे.

सातारा येथे वास्तव्य असून तेथे स्वतःची कर सल्लागार एजन्सी आहे. बऱ्याच कंपन्यांना कर विषयक मार्गदर्शन करतात. २०१२ पासून प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रिय सहभाग. २०१३ साली सातारा येथे झालेल्या कुलसंमेलनात विशेष सक्रिय. सामाजिक कार्याची आवड. २०१४ पासून कार्यकारिणी विश्वस्त म्हणून कार्यरत. ह्यावेळेला प्रथमच सहकोषाध्यक्ष म्हणून जबाबदारी.



**८) विश्वस्त श्री. प्रदीप जनार्दन भिडे**

डोंबिवली. वय ५७ वर्षे

नवी मुंबई येथे खाजगी कंपनीत नोकरी. २०१४ मध्ये डोंबिवली येथे झालेल्या भिडे कुल संमेलनात विशेष पुढाकार. कल्याण/डोंबिवली कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष पुढाकार. समाजकार्याची आवड. भिडे कुल संमेलन, वार्षिक सभा व इतर कार्यक्रमांमध्ये सक्रिय. २०१४ पासून विश्वस्त म्हणून कार्यरत.



**९) विश्वस्त सौ. संपदा राजेंद्र भिडे**

दादर, मुंबई. वय ४५ वर्षे

भिडे प्रतिष्ठानची महिला विश्वस्त म्हणून पुन्हा निवड. महिला समिती प्रतिनिधी आहेत. धर्मादाय आयुक्त मुंबई कार्यालयातील प्रतिष्ठान संबंधी सर्व कामे सांभाळतात. दादर, मुंबई येथे स्वतःचे ब्यूटीपार्लर चालवितात. ब्राह्मण सेवा मंडळ, दादर ह्या संस्थेच्या कार्यकारिणीत संयुक्त कार्यवाह, गेली ८ ते ९ वर्षे प्रतिष्ठानचे संमेलन, सभा व इतर कार्यक्रमात सक्रिय सहभाग. २०१९ सांगली संमेलनात आदर्श कार्यकर्ता पुरस्कार विजेती.



**१०) विश्वस्त श्री. चिंतामणी जनार्दन भिडे**

ठाणे. वय ६१ वर्षे

गेली १७ ते १८ वर्षे प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रिय सहभाग. कर सल्लागार म्हणून निवृत्त. ७ ते ८ वर्षे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. २०१४ मध्ये पहिला आदर्श कार्यकर्ता पुरस्कार विजेते. साहित्य व कला ह्या माध्यमातून आम्ही भिडे अंकासाठी विशेष सहाय्य.



**११) विश्वस्त श्री. शंतनु निळकंठ भिडे**

पुणे. वय ५८ वर्षे

प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवर विश्वस्त म्हणून प्रथमच निवड. कुलवृत्ताची तिसरी सॉफ्ट आवृत्तीसाठी त्यांचे विशेष योगदान आहे. खाजगी कंपनीत कार्यरत आहेत. आम्ही भिडे अंक, वेबसाईट ह्यासाठी संगणकीय माध्यमातून उत्कृष्ट मार्गदर्शक आहेत. कार्यकारिणीची निवड होण्याअगोदर दोन वर्षे स्वीकृत सदस्य होते.



*With Best Compliments From....*



**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

# Bhide & Associates

*Retainership & Consultany of GST, Custom, DGFT,*
*Import-Export Logistics, Clearing & Allied Services*

Office : Plot No. 7, 1st Floor, Nagesh Bunglow,
Behind Bodhe Hospital, Shahupuri Road, Satara - 415002.

Email : psbexconsult@gmail.com

**Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth, Satara - 415 002.**

# जवळून पाहिलेले २००७ चे भिडे संमेलन

**– दिलीप वासुदेव भिडे, पुणे.**


नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे एक दिवसीय ६ वे कुलसंमेलन २३ डिसेंबर २००७ रोजी पुणे येथे महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे यांच्या पुढाकाराने दिमाखात साजरे झाले. एक दिवस महाराष्ट्र चित्पावन संघाचे कार्यवाह श्री. अशोकराव वझे यांनी मला भिडे कुलाचेवतीने २००६ च्या जूनमध्ये बैठकीस बोलावले आणि २००७ ला आपण जागतिक चित्पावन संमेलनात प्रत्येक कुलाचे संमेलन घेणार आहोत आणि प्रत्येक कुलाची किमान ५०० संख्या असावी असे सांगितले. ह्या संमेलनाअगोदर भिडे संमेलन उपस्थिती १५० ते २०० च्या आसपास असायची. त्यामुळे उपस्थिती व भिडे संख्याबळ वृद्धी करणे हे माझ्यासमोर आव्हान होते. सुमारे ८० ते ९० आडनावांची संमेलने पुण्यात घ्यायचा मानस पण बोलून दाखविला. ह्या बैठकीमध्ये उपस्थिती वाढविण्यासाठी प्रत्येक कुलप्रमुखाने मासिक किंवा अर्धमासिक बैठक घेऊन संपर्क साधून माहिती द्यावी असे सांगण्यात आले. तसा विचार केला तर जागतिक चित्पावन संमेलनासाठी १७ महिने बाकी होते. तरीपण हे एक आव्हान होते. परंतु मी ते स्वीकारून तयारी सुरू केली. श्री. दामुकाका, प्रभाकरपंत, चिंतामणी, अतुल तसेच पुण्यातील विद्याकरजी, बी.टी. भिडे, शंतनु, विश्वनाथ इत्यादी भिडे मंडळींची मदत व मार्गदर्शन घेऊन दर १५ तारखेच्या गुरुवारी आणि महिन्यातील एका रविवारी बैठकींना प्रारंभ केला. पहिल्याच बैठकीला फक्त ४ ते ५ भिडे हजर होते. परंतु परिस्थितीपुढे वाकणार तो भिडे कसला हा विचार करून पुढे निघालो. खरंतर नोकरी आणि हे कार्य ह्याची सांगड घालताना कसरत होत होती. परंतु जसजशी जागतिक चित्पावन संमेलनाची जाहिरात आणि पहिल्या ३ ते ४ बैठका झाल्यानंतर भिडे मंडळींची बैठकीला उपस्थिती वाढली आणि आत्मविश्वास मिळाला. ह्यामध्ये सौ. वीणा केळकर, वरदाताई, डॉ. धनश्रीताई ह्यां भगिनींनी सुद्धा मोलाचे सहकार्य केले. कारण संमेलन घ्यायचे म्हणजे सांघिक प्रयत्न आवश्यक असतात. पण जिद्दीची वाण नव्हती आणि कठोर परिश्रमाला पर्याय नव्हता. एप्रिल २००७ मध्ये २५० रु. प्रत्येकी वर्गणीची पुस्तके मिळाली. मी एका पुस्तकात १० प्रमाणे १०० पुस्तकांची मागणी केली आणि पुण्यातील महाराष्ट्र मंडळातील ८०० व्यक्तींना बसण्यासाठी हॉलची मागणी केली. बैठकीत पुस्तकांचे वाटप सुरू केले, बुकिंग होऊ लागले. प्रत्येक बैठकीला किती बुकिंग झाले त्याचा आढावा घेत गेलो. ह्यालाच समांतर अशा चित्पावन संघाच्या बैठकीला पण हजर राहून किती बुकिंग झाले हे सांगावे लागत असे. नोव्हेंबर २००७ पर्यंत फक्त २०० बुकिंग झाले. परंतु ८०० मर्यादेचा हॉल आग्रहाने मागून घेतला होता म्हणून संपर्काचा व बैठकीचा वेग वाढविला. ५ डिसेंबरच्या चित्पावन संघाच्या बैठकीत ७०० बुकिंग झाले आहे असे समजले आणि १५ डिसेंबरला १००० चा आकडा पार केला. परंतु आता जास्त संख्या वाढली तर काय करायचे हा प्रश्न उभा होता.

महाराष्ट्र मंडळाच्या प्रांगणात भिडे कुलाबरोबर बापट, जोशी, दामले, मेहेंदळे, लिमये, शिधये ह्या इतर कुलांची संमेलने होती. त्यामुळे व्यासपीठ व्यवस्था, माईक सिस्टीम ह्या बाबतीत व्यवस्था होणे अपेक्षित होते. २२ डिसेंबर २००७ रोजी संध्याकाळी ६ पर्यंत व्यासपीठ व माईकची व्यवस्था झाली. परंतु रात्री १० वाजेपर्यंत फक्त १०० खुर्च्या मिळाल्या. त्यामुळे भाऊ नावाच्या मंडप ठेकेदाराच्या मागे लागून रात्री ११ पर्यंत १०० खुर्च्या मिळविल्या व त्याच रात्री १२ वाजता निरोप आला की भिड्यांचे बुकिंग १२०० च्या वर गेले आहे. रात्री १ वाजता घरी आलो, पुन्हा पहाटे ५ वाजता तिथे जाऊन अहोरात्र काम करत असलेल्या मंडप कर्मचाऱ्यांकडे विनवण्या करून १००० खुर्च्या दाटीवाटीत लावून घेतल्या. सकाळी ८ वाजेपर्यंत खुर्च्या, माईक, व्यासपीठ सर्व तयारी झाली आणि संमेलनासाठी मंडळी येण्यास सुरुवात झाली. एक दिवसीय संमेलन असल्यामुळे ५ मान्यवरांच्या मुलाखतींचा कार्यक्रम, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचा सत्कार, चीन, जपान, अमेरिका येथून आलेल्या काही भिडे मंडळींची ओळख ह्यामुळे दुपारी १ वाजला तरी कार्यक्रम सुरूच होता. जेवणासाठी १२०० लोकांची व्यवस्था केली होती. परंतु आपल्या कार्यक्रमाला उशीर झाल्यामुळे ज्या ठिकाणी भिड्यांकरिता जेवण तयार होते

**(पान ११ वर)**


Pickwick
"Eet sum mor!"
fssai
200g Wafer
100g Wafer
150g Wafer
120g Wafer
75g Wafer
30g Wafer
60g Wafer
150g Wafer Rolls
15g Wafer
50g Wafer Rolls - Carton
300g Wafer Rolls
50g Wafer Rolls - Pouch
Chocstix
Premium
Wafer Rolls
CHOCSTIX
20g Wafer Roll
ROLLO FUN
Pickwick
HYGIENIC PRODUCTS PVT. LTD.
7, Raj Palace, S.No. 862, Plot No. 208, Bhandarkar Institute Road, Pune - 411004, India.
Tel.: +91 20 2565 4994 / 2565 8330
Email : pickwick@pickwick.in • Website : www.pickwick.in

## *परंतु या सम हा...*



कोणत्याही संस्थेचे अध्यक्षपद सांभाळायचे म्हणजे तारेवरची कसरत असते. काटकोनात राहून सर्व कोन जोडायचे व सर्वसमावेशक निर्णय घेऊन ध्येय गाठायचे. अशा दुर्मिळ व्यक्तींपैकी एक म्हणजे भिडे प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष कुमार भिडे. त्यांची माझी ओळख पुण्यात झालेल्या २००२ च्या संमेलनात झाली. सांगली-मिरजेतील सर्व भिडे कुटुंबीयांची माहिती मिळविण्याचे संपूर्ण काम त्यांनी केले. अनेक संस्थांमध्ये कार्यवाह, उपाध्यक्ष, खजीनदार, अध्यक्ष अशा पदांवर काम केले. भिडे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष झाल्यानंतर २०१४ मध्ये अध्यक्ष झाले. ते अध्यक्ष व मी सचिव असल्यामुळे त्यांचे उत्तम सहकार्य मला मिळाले. एक परखड निःस्वार्थी स्पष्टवक्ता आणि शिस्तप्रिय असे अध्यक्ष प्रतिष्ठानला लाभल्यामुळे संस्थेचा आलेख नेहमी चढता राहिला. कोणतीही सूचना करताना त्याची सुरुवात स्वतःकडून करायची ही त्यांची खासीयत आहे. 'आधी केले, मग सांगितले' ह्या उक्तीप्रमाणे प्रतिष्ठानची आर्थिक वृद्धी होऊन बळकटी आली. त्यांच्या सहा वर्षांच्या कारकीर्दीत घटना दुरुस्ती करून घटनेमध्ये ज्या काही त्रुटी किंवा संदिग्धता होती त्यामध्ये २ ते ३ वर्षे सतत पाठपुरावा करून सुधारणा केल्या. आजीव सभासद वृद्धी, शैक्षणिक, वैद्यकीय मदत करण्याबाबतचे धोरण ह्यामध्ये लवचिकता आणली. ह्याशिवाय मेडिक्लेम, परदेशी जाणाऱ्या विद्यार्थीवर्गाला आर्थिक मदत, व्यावसायिक आणि नोकरी करणाऱ्यांना मार्गदर्शन अशा अनेक बाबतीत त्यांच्या मौलिक सूचना व मार्गदर्शन मोलाचे ठरले. खरेतर अध्यक्षपद त्यांनी स्वीकारतानाच ३ वर्षांकरिता मी आहे असे सांगितले. परंतु घटना दुरुस्ती होताना ३ ऐवजी झालेली ५ वर्षे आणि १ वर्ष कोरोना महामारी ह्यामुळे त्यांचा कार्यकाल ६ वर्षे झाला. चुकीच्या ठिकाणी कोणाचीही पाठराखण न करता परखडपणे आपले मत मांडतात. काही वेळेस मतभेद होत असत परंतु संस्थेच्या उन्नतीकरिता अशा व्यक्तीचे नेतृत्व आवश्यक असते. फणस बाहेरून काटेरी असला तरी आतून मात्र गोड असतो हे त्यांच्याबाबतीत म्हणणे वावगे ठरणार नाही. पुढील ५ वर्षांचा कार्यकालासाठी आम्ही सर्व विश्वस्त त्यांनी पदावर राहावे असा आग्रह करीत होतो, परंतु प्रकृतीच्या कारणामुळे इथून पुढचा प्रवास शक्य होणार नाही, तरीपण प्रतिष्ठानला माझी जिथे आणि जेव्हा आवश्यकता असेल तेथे मी जमेल ती नक्की मदत करेन असे सांगितले. सरतेशेवटी मी एवढेच म्हणेन, 'झाले बहु, होतील बहु, आहेतही बहुत परंतु या सम हा...!'

**– दिलीप वासुदेव भिडे,** (पुणे) सचिव

तिथे इतर कुलांच्या मंडळींनी जेवणाचा आस्वाद घेतला. कार्यक्रम संपायला दुपारी १.२० झाले. त्यामुळे भिडे कुलाकरिता तयार होणाऱ्या जेवणासाठी थोडा वेळ आहे असे सांगण्यात आले. लोकांना भूक लागली होती. अशा कठीण प्रसंगात मी जरा सुद्धा विचलित न होता सर्व भिडे मंडळींना हात जोडून थोडा वेळ थांबण्याची विनंती केली, दिलगिरी व्यक्त केली. परंतु सांगायला आनंद होतो की आपल्या भिडे मंडळींपैकी एकाने सुद्धा उलट प्रश्न न करता मला उलट धीर दिला. दुपारी ४ वाजता महाराष्ट्र मंडळाच्या प्रांगणात मुख्य कार्यक्रम सुरू झाला ह्या सर्व कार्यक्रमाचे सूत्र संचालन आपले मा. अध्यक्ष प्रदीप भिडे ह्यांच्याकडे होते आणि आपल्या २००७ च्या भिडे संमेलनाचे सूत्रसंचालन डॉ. धनश्री भिडे यांच्याकडे होते. काही मनोरंजनात्मक, सत्कार समारंभ असे कार्यक्रम होऊन रात्री ८ वाजता ह्या जागतिक चित्पावन संमेलनाची सांगता झाली. असे हे अभूतपूर्व आणि भिड्यांची रेकॉर्डेड उपस्थिती असलेले संमेलन दिमाखात पार पडले.

ह्या जागतिक चित्पावन संमेलनाचे शिल्पकार श्री. अशोकराव वझे व त्यांचे सहकारी सर्वश्री अजित भिडे, भागवत, गानू, करमरकर इत्यादी अनेकांनी पराकाष्ठा केली. कार्यकर्त्यांची फळी तयार करण्याचे कौशल्य हे अशोकराव वझे यांच्यासारख्या एखाद्याच व्यक्तीकडे असते हे विशेष नमूद करावेसे वाटते. अनेक कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींनी सुद्धा हे संमेलन यशस्वी होण्यासाठी हातभार लावला. ह्यामध्ये अनेकांचा सहभाग होता. परंतु नावे लिहिण्याचा प्रपंच न करता सहकार्याबद्दल मी त्यांना शतशः धन्यवाद देतो.

## शेवट आहे सरणावरती

किती झुंजावे किती लढावे
विश्वास ठेवू भाग्यवारती
सुरू कसेही झाले तरीही
शेवट आहे सरणावरती
पाऊले देतील साथ कशीही
पण यशाचा डोंगर आहे दूर
मार्गातील दरीच्या खोलीत
खचू नये परिश्रमाचा सूर
आपल्या सत्याच्या प्रकाशात
असत्य टाकू झाकून
विणुया सुखाचे जाळे
आपुल्या इवल्याशा हातून
एकजुटीने, एकमताने गाऊ
गाणी आपुल्या युगाची
मुखात असावे आनंदाचे शब्द
साथ सरगम सात स्वरांची
आपण चालावे सरळ नेहमी
जरी वाकडी असेल वाट
संपेल आजची रात्र अंधारी
ती पहा झालीही पहाट

**– करुणा भिडे**, डोंबिवली

### शैक्षणिक मदत (विद्यार्थ्यांसाठी)

चि. अथर्व सुनिल भिडे, पुणे ह्याला भिडे प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधीमधून रु. १५,००० शैक्षणिक मदत देण्यात आली. तसेच चि. कपिल गणेश भिडे, पुणे ह्याला रु. ५,००० आर्थिक मदत देण्यात आली.

### पूरग्रस्त मदत

चिपळूण, सांगली, महाड ह्या ठिकाणी आलेल्या पुरामुळे नुकसानग्रस्त भागात प्रतिष्ठानने स्वतः जाऊन दखल घेतली आणि जमलेल्या दोन लाखांची मदत सुमारे २९ ते ३० पूरग्रस्त लाभार्थींना भिडे प्रतिष्ठानने आर्थिक मदतीचा हात दिला.

### शैक्षणिक मदत २०२०-२१

श्री. प्रदीप वासुदेव व डॉ. शीला प्रदीप भिडे, दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ता प्राप्त शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विना परतफेड विशेष आर्थिक मदत देण्यात आली.

| | |
|---|---|
| १) कु. चैताली संजय भिडे, सांगली | रु. २०,००० |
| २) कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली | रु. ५,००० |
| ३) कु. अश्विनी अशोक भिडे, पुट्टुर कर्नाटक | रु. २०,००० |
| ४) कु. आस्था केदार भिडे, पुणे | रु. १५,००० |
| ५) कु. क्षितीजा गणेश भिडे, पुणे | रु. २५,००० |
| ६) कु. प्रणिती अमित भिडे, पुणे | रु. ५,००० |

### शैक्षणिक मदत २०२१-२२

| | |
|---|---|
| १) कु. प्रणिती प्रशांत भिडे, पुणे | रु. ३०,००० |
| २) कु. भाग्यश्री मंदार भिडे, पनवेल | रु. १८,००० |
| ३) कु. मंजिरी मंदार भिडे, पनवेल | रु. १८,००० |
| ४) कु. नियती मंदार भिडे, पनवेल | रु. १८,००० |
| ५) कु. अश्विनी अशोक भिडे, पुट्टुर कर्नाटक | रु. २०,००० |
| ६) कु. क्षितिजा गणेश भिडे, पुणे | रु. २५,००० |

### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
### विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| मे | श्री. रमेश व सौ. स्नेहा आपटे (भिडे), पुणे | १७-५-८२ |
| | श्री. सुनिल व सौ. स्नेहल भिडे, पुणे | ८-५-८९ |
| | श्री. प्रकाश व सौ. प्रज्ञा भिडे, सांगली | २९-५-८९ |
| | श्री. माधव व सौ. योगिनी भिडे, पुणे | २०-५-९० |
| | श्री. मिलींद व सौ. विजयश्री भिडे, पुणे | २०-५-९६ |
| | श्री. शार्दुल व सौ. मृणाल भिडे, पुणे | ११-५-०५ |
| | श्री. समीर व सौ. मृदुला भिडे, तळेगाव दाभाडे | २९-५-१३ |
| | श्री. सुभाष व सौ. सुप्रिया भिडे, मालाड | १०-५-७१ |
| | श्री. प्रशांत व सौ. सुप्रिया भिडे, सातारा | ११-५-८६ |
| जून | श्री. अरुण व सौ. अरुणा भिडे, नाशिक | ५-६-६९ |
| | श्री. अमित व सौ. पूनम भिडे, पुणे | ९-६-१० |
| | श्री. चिंतामणी व सौ. विद्या भिडे, ठाणे | ३०-६-९१ |
| | श्री. विजय व सौ. स्नेहल भिडे, ठाणे | १७-६-९१ |
| | श्री. योगेशचंद्र व सौ. वृंदा भिडे, पुणे | ०२-६-९३ |


# प्रतिष्ठानच्या परिवारात

**– श्री. विजय र. भिडे, ठाणे**
लेखापरीक्षक

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानशी माझा संबंध जवळजवळ प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून ते २०१४ पर्यंत हिशेब तपासनीस म्हणून आला. वास्तविक हिशेब तपासनीस हे व्यावहारीक रूप होते. परिवाराच्या काही मंडळींशी त्या कारणाने निर्माण झालेले स्नेहबंध हे त्यापेक्षा वेगळे होते. त्यासंबंधीच्या आठवणींवर चार शब्द श्री. दिलीप भिडे यांच्या सांगण्यावरून शब्दबद्ध करण्याचा हा एक प्रयत्न. या केवळ स्मरणानुसार आठवणी असल्याने काही तपशिलाबाबत चुका असण्याची शक्यता आहे तरी याकडे केवळ स्मरणरंजन म्हणून पाहावे ही विनंती.

साधारणपणे १९९८-९९ साली प्रतिष्ठानच्या सभासदत्वाचा अर्ज भरताना त्यामध्ये एक प्रश्न होता की आपण प्रतिष्ठानला काही वेळ देऊ शकून कार्यात सहभागी व्हाल का ? या प्रश्नाला मी होकारार्थी उत्तर देऊन हिशेबासंबंधी कार्य करू शकेन असे लिहिले होते. यामुळे श्री.अभय भिडे यांचा फोन आला व त्यांनी मला एका मिटींगला बोलावले. सदर सभेस सर्वश्री प्रदीप, मुकुंदराव, अभय, प्रभाकरपंत वगैरे उपस्थित असल्याचे स्मरते. याच सभेत मला ऑडिटरचे काम पाहण्यास सांगितले. अशा तऱ्हेने सुरुवात झालेल्या परिचयाचे पुढे संबंध वाढले. प्रतिष्ठानच्या सुरुवातीच्या काळात मुख्यत्वे दामुकाकांशी बराच संबंध आला. आदर्श कार्यकर्ता कसा असावा याचे दामुकाका हे चालते-बोलते उदाहरण ! कोणाशीही बोलताना/ वागताना डोक्यावर बर्फाची लादी व जिभेवर खडीसाखर हे सूत्र त्यांनी आयुष्यभर सांभाळले. हिशेबातील काटेकोरपणा व अचूक तपशिलाचा त्यांचा आग्रह वाखाणण्यासारखा होता. श्री प्रभाकरपंतांची सम्यकदृष्टी व साक्षेपीपणा संपादकपदास शोभेसा होता. मुकुंदरावांचा शिक्षण व बँकिंक क्षेत्रातील अनुभव प्रतिष्ठानला मोलाचा ठरला. प्रदीप भिडे यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व सर्वांना उत्साह प्रदान करीत असे. ठाण्याचा अतुल, कल्याणचा भालू वगैरे कार्यकर्ते नेहमी कामात तत्पर असत.

सुरुवातीस कुलवृत्त निर्मिती हे कार्य होते. गावोगावी जाऊन कुलवृत्ताच्या निर्मितीप्रमुख लोकांशी विचारविनिमय करून माहिती जमविणे व त्याचे व्यवस्थित संकलन करणे अत्यंत जिकीरीचे काम होते. परंतु सर्वांच्या सहकार्याने हे काम पार पडले. मला आठवते त्याप्रमाणे भास्कर कॉलनीत वेगळी जागा घेण्यापूर्वी सदर कार्य श्री. अतुल भिडे यांच्या घरून होत असे. सदर कार्यात माझा खारीचा वाटा म्हणजे मी १-२ वेळा माझ्या सासरच्या शहरातून (नागपूर) सुमारे २५-३० लोकांचे पत्ते शोधून त्यांना सभासद केले होते. तसेच औरंगाबाद, बेंगलोर, सोलापूर येथून देखील काही माहिती आणली होती. सर्वांच्या प्रयत्नाने अखेर हे काम पूर्ण झाले व दिमाखदार प्रकाशन सोहळा पार पडला. सुदैवाने या काळात कोणाशी मतभेदाचा प्रसंग आला नाही. आधीच मराठी माणसे त्यात कोकणस्थ व वरती एकारांत, असे असून देखील कोणाशी मतभेद वगैरे झाले नाहीत. हिशेबातील चोख नोंद प्रथम श्री. दामुकाका व मग चिंतामणी/दिलीप यांनी चोख ठेवल्यामुळे हिशेबाचे काम निर्विघ्न पार पडले. सुरुवातीच्या काळात ८०जी चे सर्टिफिकेट व १२ ए चे सर्टिफिकेट इत्यादी गोष्ट पार पाडण्यात देखील सर्वांनी सहकार्य केले. हिशेब तपासनीसाच्या जबाबदारीतून मी २०१४ साली मुक्त झालो ते मुख्यतः प्रतिष्ठानचा सर्व व्याप पुण्याहून नियंत्रित व्हायला लागला व मुंबई-पुणे असे समायोजन कठीण पडू लागले. शिवाय सर्व जुन्या मंडळींनी बाहेर पडल्याशिवाय नवीन लोकांना वाव मिळणार नाही असा विचार होताच. मी या जबाबदारीतून मुक्त झालो असलो तरी सध्याच्या मंडळींशी संपर्कात असतो. विशेषतः श्री. दिलीप भिडे यांच्याशी बरेचवेळा बोलणे होते. नवीन कार्यकारिणी यशस्वीपणे वाटचाल करीत आहे त्याबद्दल अभिनंदन ! आमच्या आईवडिलांच्या स्मरणार्थ अल्प देणगी कोणास द्यावी हा प्रश्न प्रतिष्ठानने सोडविला. गेली ७-८ वर्षे आम्ही शैक्षणिक देणगी अत्यंत विश्वासाने प्रतिष्ठानला देत आहोत. याचा योग्य विनियोग झाल्याची पोचपावती एका लाभार्थी विद्यार्थिनीच्या पत्रामुळे प्रतीत झाली. जाता जाता एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ती म्हणजे प्रतिष्ठानचा कारभार यंग सिनियर सिटिझन उत्तम प्रकारे चालवित असले तरी त्यात तरुणांचा अथवा मध्यमवयीन कार्यकर्त्यांचा सहभाग वाढणे आवश्यक वाटते. शेवटी माझ्या शारीरिक व बौद्धिक मर्यादा लक्षात घेऊन प्रतिष्ठानचे विशिष्ट कार्य करायची संधी मिळाली तर आनंदच होईल. प्रतिष्ठानच्या कार्यास अनेक शुभेच्छा !



व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा | १ |
| २. | सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग | २ |
| ४. | सौ. पूर्वा प्रमोद देवधर, गिरगांव | २ |
| ५. | श्री. श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण | २ |
| ६. | सौ. अलका केशव भिडे, पुणे | ६ |
| ७. | श्री. पुष्कर प्रसन्न भिडे, पुणे | ६ |
| ८. | श्री. अभिषेक सुरेंद्र भिडे, इंदौर | १० |
| ९. | श्रीमती सुशिला प्रभाकर भिडे, पुणे | १० |
| १०. | सौ. लतिका आपटे, पुणे | ११ |
| ११. | सौ. पूर्णिमा धनंजय भिडे, पुणे | १३ |
| १२. | कु. भूषण राजाराम भिडे, अलिबाग | १५ |
| १३. | श्री. केशव मोरेश्वर भिडे, पुणे | १६ |
| १४. | श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली | १७ |
| १५. | श्री. संजय शंकर भिडे, मुंबई | १७ |
| १६. | श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे | १८ |
| १७. | श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | २० |
| १८. | ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक | २१ |
| १९. | सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा | २३ |
| २०. | श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे | २४ |
| २१. | श्री. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी | २४ |
| २२. | श्री. धनंजय केशव भिडे, पुणे | २४ |
| २३. | सौ. अमृता अमित फाटक, पुणे | २४ |
| २४. | सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे | २५ |
| २५. | श्री. मधुसुदन धोंडू भिडे, डोंबिवली | २५ |
| २६. | श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे | २६ |
| २७. | सौ. अपर्णा उमेश भिडे, ठाणे | २६ |
| २८. | श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली | २७ |
| २९. | सौ. केतकी जयराम भिडे, सोलापूर | २७ |
| ३०. | कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| ३१. | कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| ३२. | सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे | २८ |
| ३३. | सौ. मृणाल प्रकाश भिडे, माभळे | २९ |

### मे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे | ३ |
| २. | सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली | ३ |
| ३. | सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे | ५ |
| ४. | सौ. स्नेहा नितीन भिडे, पुणे | ५ |
| ५. | श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ | ६ |
| ६. | कु. प्रचिती प्रसाद भिडे, पुणे | ७ |
| ७. | सौ. मिताली मंदार भिडे, रत्नागिरी | ९ |
| ८. | कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी | १० |
| ९. | श्री. शरद हरी भिडे, पुणे | ११ |
| १०. | श्री. राजेश शरद भिडे, पुणे | ११ |
| ११. | सौ. कल्याणी विनोद भिडे, औरंगाबद | ११ |
| १२. | श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर | १३ |
| १३. | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | १३ |
| १४. | कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे | १३ |
| १५. | श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे | १७ |
| १६. | श्री. सुनिल कृष्णाजी भिडे, पुणे | १७ |
| १७. | सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल | १९ |
| १८. | सौ. माया सुनिल भिडे, पुणे | १९ |
| १९. | सौ. उज्वला यशवंत भिडे, औरंगाबाद | १९ |
| २०. | सौ. भाग्यश्री दिलीप भिडे, पुणे | २० |
| २१. | कु. ईशान अमित भिडे | २१ |
| २२. | श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे | २२ |
| २३. | कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई | २३ |
| २४. | कु. ओम चंदन भिडे, पुणे | २४ |
| २५. | सौ. अभिलाषा रोहन भिडे | २४ |
| २६. | सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली | २५ |
| २७. | श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे | २६ |
| २८. | कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद | २६ |
| २९. | कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली | २७ |
| ३०. | सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप | २७ |
| ३१. | चि. भार्गवी विक्रांत भिडे, पुणे | २८ |
| ३२. | श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव | २९ |
| ३३. | सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे | २९ |
| ३४. | श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे | २९ |
| ३५. | श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर | २९ |
| ३६. | श्री. विजयसिंह विष्णू भिडे, नाशिक | ३१ |
| ३७. | श्री. विनायक वासुदेव भिडे, रत्नागिरी | ३१ |
| ३८. | सौ. सुप्रिया प्रशांत भिडे, पुणे | ३१ |

### जून

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे | १ |
| २. | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. अमोल मुकुंद भिडे, सांगली | २ |
| ४. | सौ. नीना नविन भिडे, इंदौर | ३ |
| ५. | कु. अमृता चंदन भिडे, पुणे | ५ |
| ६. | सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे | ६ |
| ७. | सौ. सुषमा दीपक भट, गोरेगाव | ६ |
| ८. | सौ. स्मिता विजय भिडे, ठाणे | ८ |
| ९. | सौ. आदिती अविनाश भिडे, नाशिक | ९ |
| १०. | सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे | ९ |
| ११. | श्री. उदित आशिष भिडे, कल्याण | ११ |
| १२. | सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे | १२ |
| १३. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १२ |
| १४. | सौ. गार्गी आदित्य जोशी, पनवेल | १३ |
| १५. | श्री. आल्हाद प्रमोद भिडे, पुणे | १५ |
| १६. | डॉ. माधुरी प्रसाद भिडे, पुणे | १७ |
| १७. | सौ. संगिता सतिश भिडे, नाशिक | १८ |
| १८. | सौ. स्मिता सतीश भिडे, पुणे | १८ |
| १९. | चि. वेदांग प्रशांत भिडे, डोंबिवली | १८ |
| २०. | कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे | १९ |
| २१. | सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे | २० |
| २२. | श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव | २० |
| २३. | श्री. प्रशांत सुरेश भिडे, पुणे | २० |
| २४. | सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक | २१ |
| २५. | श्री. प्रभाकर नारायण भिडे, माभळे | २१ |
| २६. | कु. क्षितीजा गणेश भिडे, पुणे | २१ |
| २७. | सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे | २३ |
| २८. | सौ. नीला कुमार भिडे, पुणे | २३ |
| २९. | श्री. प्रशांत मधुसुदन भिडे | २३ |
| ३०. | श्री. सुधीर विष्णू भिडे, बदलापूर | २३ |
| ३१. | सौ. शलाका तेजस भिडे, चेंबूर | २४ |
| ३२. | श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे | २६ |
| ३३. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| ३४. | श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल | २९ |
| ३५. | सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर | २९ |
| ३६. | श्री. नीलकमल फडके, पुणे | २९ |

# २०११ कर्नाटक (मुंडाजे) संमेलन आणि मीं

- दिलीप वा. भिडे, पुणे
मो. ९६५७५४१२३६

२००७ च्या जागतिक चित्पावन संमेलनाचे निमित्ताने कर्नाटकच्या मुंडाजे येथील श्रीधर गोपाळ भिडे यांची ओळख झाली. त्या संमेलनात मुलाखतीच्या कार्यक्रमात ही व्यक्ती कर्नाटकमध्ये व्यावसायिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी व्यक्ती आहे हे समजले. वास्तविक ह्या २००७ च्या अगोदर सुद्धा त्यांनी एक संमेलन कर्नाटकात घेऊया असे सुतोवाच केले होते. परंतु एवढ्या दूरवर किमान ५० भिडे तरी उपस्थित राहतील की नाही ह्याबाबत साशंकता असल्यामुळे विचार केला गेला नाही. कारण महाराष्ट्राबाहेर भिडे संमेलन घेण्याचे धाडस म्हणजे एक आव्हानच होते. परंतु २००७ नंतर झालेल्या प्रत्येक भिडे संमेलनास श्रीधरपंत उपस्थित असायचे आणि कर्नाटकात संमेलन घेण्याचा आग्रह कायम होता. सरतेशेवटी गणपतीपुळे येथील भिडे संमेलनात पुढील वर्षी मुंडाजे ह्या गावी संमेलन घ्यायचे मुक्रर झाले. त्याची सर्व जबाबदारी श्रीधरपंतांनी घेतली आणि भिडे प्रतिष्ठानने त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

संमेलनासाठी रेल्वे बुकिंग, बस करिता प्रतिष्ठानचे माध्यमातून प्रयत्न सुरू झाले की जेणेकरून संख्या किमान १०० असावी अशी अपेक्षा. ह्या संमेलनात कोणाकडून संमेलन शुल्क न घेता त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था व खर्च आम्ही कर्नाटकीय भिडे करू असे श्रीधरपंतांनी खात्रीने सांगितले. परंतु संमेलन वर्गणी न घेता करणे हा पायंडा पडू नये म्हणून दर माणशी रु. २५० घ्यावेत असे कार्यकारिणीने ठरविले. त्यानुसार मेंगलोरपर्यंत रेल्वे किंवा बस प्रवास आणि मेंगलोर येथून आपापल्या खर्चाने त्या रेल्वे गाडीचे वेळात मुंडाजे पर्यंत बस ठेवण्यात आली होती. गेल्यावर यथोचित आदरातिथ्य झाले. जेवण व नाष्टा तर सोय अप्रतिम होती. मुंडाजे येथील मंडळींनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे आणि अपेक्षेपेक्षा जास्त मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे न भूतो न भविष्यती असा हा सोहळा पार पडला.

संमेलनाचे उद्घाटन श्री. प्रदीप वासुदेव आणि डॉ. शीला भिडे ह्या माजी सनदी अधिकारी दाम्पत्याकडून झाले. दोन दिवसांचे संमेलन १५ व १६ जानेवारी २०११ रोजी झाले. १५ जानेवारी रोजी भिडे संमेलन आणि १६ जानेवारीला कर्नाटकमधील मुंडाजे, उजीरे ह्या जवळपास असणाऱ्या कर्नाटकातील भिडे मंडळींचा मानसन्मान असे दोन दिवसांचे संमेलन होते. ह्या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे श्रीधरपंतांचे एक पुतणे श्री. नारायणराव भिडे ह्या तरुणाने २८ कोटी रुपयांत आणि १८३ दिवसांत एक जलविद्युत प्रकल्प पूर्ण केला. नैसर्गिक स्रोत व मानव संपत्तीचा वापर करून स्थानिकांना रोजगार व पंचक्रोशीतील समृद्धी आणि विकास करून मुंडाजे गावात एक आदर्श निर्माण केला.

संमेलनाचे पहिल्या दिवशी मुंडाजे येथील भिडे हाऊसचे आधारवड आणि थोर समाजसेवक स्व. गोपाळराव भिडे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त त्यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक मुंडाजे गावात वाजतगाजत काढण्यात आली. कै. गोपाळराव यांच्या कार्यात तीन पिढ्यांमध्ये सातत्याने मदत करणाऱ्या आणि त्यांचे कार्य पुढे नेणाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक मानसन्मान करण्यात आला. तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रम, चहा, नाश्ता, भोजन आणि राहण्याची व्यवस्था ह्याबाबत कोणतीच उणीव भासू दिली नाही. भिडे प्रतिष्ठानकडून एकही पैसा न घेता केवळ कर्नाटकातील भिडे लोकांनी खर्च केला ही कौतुकाची बाब आहे. हे संमेलन म्हणजे 'ज्या व्यक्ती ह्या संमेलनास अनुपस्थित राहिल्या त्या व्यक्ती एका उत्कृष्ट सोहळ्यापासून वंचित राहिल्या असा अभूतपूर्व सोहळा संपन्न झाला. श्रीधरपंत भिडे व कुटुंबीय यांच्या स्वतःच्या अनुदानातून मुंडाजे येथील एक शाळा चालवितात त्या शाळेला वर्गणीपोटी जमलेले रु. ७५,००० व रु. २५,००० प्रतिष्ठानने घालून एक लाख रुपये त्या शाळेला देणगी देण्यात आले.


भिडे संमेलन सर्वांसाठी संस्मरणीय व उपयुक्त ठरावे. हा प्रतिष्ठानचा नेहमीच प्रयत्न असतो. संमेलनाचे आयोजन करणे म्हणजे कोणा एका व्यक्तीचे काम नसून हे सांघिक यश असते. संमेलनासाठी अगोदर सहा महिने कार्यकर्ते राबत असतात आणि निःस्वार्थीपणे आपला खारीचा वाटा देत असतात. आजमितीला आपल्या अल्पसंख्य असलेल्या समाजाने, ज्ञातीने एकत्र येऊन एकमेकांना सहाय्य करणे, मदत करणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टिकोनातून तरी एक दिवस का होईना आपण आवर्जून यावे असे वाटते.

अनंत काळापासून सकल ब्रह्मांडावर राज्य करणारे संपूर्ण बहुमत असलेले, अलौकिक व एकमेवाद्वितीय अढळ व स्थिर सरकार

## स्वर्गाचे सरकार : मंत्रिमंडळ

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रपती | : | श्रीदत्तात्रेय |
| पंतप्रधान | : | श्रीमहादेव |
| निर्माण | : | श्रीब्रह्मदेव |
| बांधकाम | : | श्रीविश्वकर्मा |
| अर्थ व संपत्ती | : | श्रीमहालक्ष्मी |
| गृह, धर्म व सुव्यवस्था | : | श्रीविष्णू |
| अध्यक्ष | : | श्रीगणेश |
| संरक्षण | : | श्रीहनुमान |
| विकास | : | श्रीपवनदेव |
| शिक्षण व समाजकल्याण | : | श्रीसरस्वती |
| कृषी व जल | : | श्रीवरुणदेव |
| अन्नपुरवठा | : | श्रीअन्नपूर्णा (पृथ्वी) |
| आरोग्य | : | श्रीअश्विनीकुमार |
| सिंचन व पाणीपुरवठा | : | श्रीइंद्रदेव |
| माहिती व संदेश प्रसारण | : | देवर्षी नारद |
| गुप्तचर यंत्रणा | : | श्रीसूर्यदेव |
| परराष्ट्र व विदेश | : | श्रीरत्नाकर (समुद्र) |
| न्याय | : | श्रीयमराज |
| कायदा व संविधान | : | श्रीशनिदेव |
| सेनापती | : | श्रीकार्तिकेय |
| ऊर्जा व इंधन | : | श्रीअग्नीदेव |
| अस्त्र व शक्ती | : | श्रीदुर्गा (आदिशक्ती) |

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



हार्दिक अभिनंदन



ता. १६ एप्रिल २०२२ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेमध्ये नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या घटना कलम १०(२) तरतुदीनुसार **श्री. विनायक विश्वनाथ भिडे,** पुणे आणि **सौ. मेघना आशिष भिडे,** पुणे ह्यांची स्वीकृत सदस्य म्हणून कार्यकारिणीवर निवड करण्यात आली. त्यांचे नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन !

स्थापना : १८५४ शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी R.T.N. E-3



**लो. टिळक स्मारक वाचन मंदिर**

(पूर्वीची नेटिव्ह जनरल लायब्ररी)

चिपळूण, जि.रत्नागिरी, फोन (०२३५५) २५५५३३

ई- मेल - lotisma_1@rediffmail.com. / ta 6403001@gmail.com

जा.क्र. 32 दिनांक : १५/०८/२०२१

मा.अध्यक्ष..

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान.

महोदय

.२२ जुलैच्या महापुरात चिपळूण शहरातील सारं जनजीवन अस अस्तव्यस्त झालं.कोपलेल्या वाशिष्ठीने सारं शहरच आपल्या कवेत घेतलं. मग आपलं लो.टिळक स्मारक वाचन मंदिर अपवाद कसं ठरेल. आपल्या ग्रंथालयाने संपूर्ण कोकणातील एक अप्रतिम संग्रहालय निर्माण केले होते. अश्मयुगीन हत्यारांपासून मराठा काळापर्यंतची हत्यारे...इ.स.पूर्व काळापासूनची नाणी.. भांडी.. दस्तऐवज.. पोथ्या.. आपल्या कोकणात मिळणारी खनिजे.. मूर्ती.. असा दुर्मिळ खजिना होता... होता म्हणतोय कारण पुरात संग्रहालय बुडाले. आता एकएक वस्तू शोधतो आहोत. मौलिक ग्रंथ जलसमर्पित झाले. हळूहळू सावरायला सुरवात केली आहे. अशा कठीण काळात उर्मिलाताईंनी आपणहून फोन करून मदतीला येत असल्याचे सांगितलं, खूप आधार वाटला. ज्या आपुलकीने मदतीला आलात त्या बद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

विशेष म्हणजे आपण कुलवृतांत जमवतो आहोत. आपला भिडे कुलवृतांत इथ आहे. आठ..दहा महिन्यात पुन्हा निश्चित उभे राहू.आपण आणि सर्व भिडे बंधू आवर्जून भेट द्यायला या.

ही आपुलकी अशीच वाढत राहो ही विनंती...

आपला नम्र

प्रकाश देशपांडे

कार्याध्यक्ष

लो.टिळक स्मारक वाचन मंदिर,चिपळूण

**Marriage Relationship** M. 9822107636
**Teenage Counselling**

**Let us start a conversation**



**Sharmila Puranik**
**B. Com., L. Lb.**
**Diploma in Counseling Psychology**

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची

# मीं अनुभवलेली वाटचाल

सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे
फोन : ०२०-२५३९७०६१

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची पहिली सभा झाली 'अभिरुची' (भिडे बाग) सिंहगड रोड, पुणे येथे सुमारे जानेवारी १९९९ मध्ये. त्या सभेला मी उपस्थित होते. तेव्हापासून ह्या प्रतिष्ठानचा आलेख उंचावत गेला आहे. कोणतीही संघटना म्हटली तर मुख्य असतो तो संघटनेमागचा हेतू. तसेच कामात झोकून देणारे निकटवर्ती कार्यकर्ते, असे कार्यकर्ते ह्या संस्थेला लाभले आहेत.

स्वतः उत्तम कार्यकर्ता असून भागत नाही, त्याला इतर अनेक कार्यकर्ते घडवावे लागतात, तसे ते घडविले गेले. कोणत्याही मोठ्या कामात मुख्य अडचण आर्थिक स्वरूपाची असते. सधन मंडळींना समवेत घेऊन ती अडचण दूर केली गेली, पण केवळ धनवंतांची संघटना होऊन भागत नाही. सर्वसामान्य भिडे मंडळींनी आपापला खारीचा वाटा उचलला. त्यामुळे प्रत्येकाला संघटना आपली वाटू लागली. त्यामुळेच कार्य जोमाने चालू झाले. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, सावध विचारे, वेचकरी !' हे हेतू मनात ठेवून अनेक व्यक्ती कार्यरत झाल्या. अनेक गावांमध्ये दरवर्षी भिडे संमेलने होऊ लागली.

सर्वात मोठे काम म्हणजे नित्युंदन गोत्रीय भिडे कुलवत्त तयार करणे. पुणे संमेलनात ही बाब पुढे आली. हे फार मोठे अवघड काम होते. पण ते फार कमी वेळात उत्तम पार पडले. कुलवृत्त म्हणजे, म्हणजे केवळ नावांची जंत्री न राहता भिडे आडनावांच्या अनेक व्यक्तींची माहिती मिळवून त्यांच्या वेगवेगळ्या कार्याचा परिचय फोटोसह वृत्तांताच्या ग्रंथाने करून दिला. सर्वांना आपलेपणा वाटावा म्हणून आबालवृद्धांना प्रत्येक संमेलनात स्थान मिळाले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीनुसार पारितोषिके देणे, होतकरू तरुण उद्योजकांना आर्थिक साहाय्य करणे, वयाची पंचाहत्तरी साजरी करणे, आदर्श सून निवडून तिचा सत्कार करणे, अतिशय वृद्धांचा सत्कार करणे, लग्नाची पन्नाशी, पंचाहत्तरी करणे, त्रैमासिकात वाढदिवस छापणे, कार्यकर्त्यांना प्रोत्साहनासाठी बक्षिसे देणे इत्यादी अनेक उपक्रम राबविले जातात. भिडे आडनावाचे अनेक कलाकार निवडून त्यांच्या कलांना प्रोत्साहन दिले गेले. नट, गायक, निवेदक, नकलाकार, कवी लेखक, जादुगार, गायक, वादक इत्यादी कलाकारांना संमेलनांमधून सादरीकरणाची संधी मिळाली. तसेच प्रत्येक संमेलनांमधून स्थानिक व श्रेष्ठ व्यक्तींना यथोचित संधी देण्यात आली. अर्थात्, प्रत्येक कार्याला पैशांचे पाठबळ लागते. देणगीदार मिळवून चोख हिशेब ठेवला जातो. देणगीदारांची नावेही 'प्राजक्त' ह्या त्रैमासिकात येतात. कलागुणांना वाव मिळण्यासाठी निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा इत्यादी स्पर्धाही अधूनमधून होतात. महापूर, भूकंप, कोरोनासारखे आजार, सामाजिक संकट अशा प्रसंगी प्रतिष्ठानच्या आर्थिक कुवतीप्रमाणे साहाय्य दिले गेले.



गेले २०-२१ वर्षे सतत कार्यरत असणारे प्रतिष्ठान जोमाने वृद्धिंगत होईल यात शंकाच नाही. 'कोरोनाच्या' जागतिक संकट काळात काम थोडे मंदावल्यासारखे वाटले, पण तसे न होता कार्यालयीन काम जोमाने चालू आहे. पुण्यामध्ये सन २००७ मध्ये अखिल भारतीय ब्राह्मण संमेलन भरले होते, त्यात नित्युंदन गोत्रीय भिडे बंधू-भगिनींची संख्या उल्लेखनीय होती.

### निवेदन

आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणींकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.

## With Best Compliments From....

॥ जय महाकाली ॥

# Savita Bhide & Company

*...we do more for your money*

*We are a Client focused company offering multiple Financial Services under Single roof. We enjoy a Strong Reputation built over 30 years and fostered by the Trust of our Customers Our Industry Knowledge and our Competencies drive our end to end Execution Capabilities and enable us to provide Best Services to our Clients. Savita Bhide & Company offers personalized Financial services across segments like*

**Portfolio Investment Services**- Aligned to your needs, risk appetite and expected returns. We help you plan for your short term and long-term goals by recommending the right investments

**Mutual Fund Investments** -Make your money work for you. Expert guidance from our Financial Planners to help you invest in the right mix of Savings, Income and Wealth creation Funds

**Insurance Advisory for Life and Health Insurance** - Trusted agents for LIC, Birla Sunlife, Max Bupa, United India we offer specialized advice and guidance tailored to meet individual requirements

**Tax Consultancy**- Financial experts well versed in Individual and Business Taxation laws can guide you on how to minimize taxation while remaining compliant with the law

**Real Estate Advisory**- Based on years of market research. We find genuine buyers, sellers and tenants for your property and hand hold you until the transaction is complete

**Home loans, Mortgage loans, Balance transfer, Education loans** etc. Our tie-up with HDFC, Bank of Baroda, PNB Housing, Tata Capital etc. facilitates paper work and ensures fast approvals

**Legal Documentation Services**- Our Legal team helps with drafting of Sale Deeds, Gift Deeds, Power of Attorney, Will and other Title documents and Agreements

**Interior Designing and Landscaping**- Solutions for Residential and Commercial properties. Consultancy and Execution from our Architect to suit your lifestyle and meet your budget - Ketaki Bhide +919881740231

**Reach us at**
**1697, Sadashiv Peth, Khajina Vihir Chowk,**
**Near Shallesh Raswanti Gruha, Pune 411030.**
**Ph.: (O) 020-24472316, (R) : 020-24354353 | E-mail : bhidesatish@yahoo.co.in**

Satish Bhide
M 9822048661

Aditya Bhide
M 9850559397

# भारतीय सेनेचे अधिकारी
## **Major General Sanjay Waman Bhide** YSM, VSM (Retd.)

मेजर जनरल संजय भिडे यांचा जन्म १९५४ मध्ये झाला. महाराष्ट्र मंडळ, पुणे येथून ते मॅट्रीक झाले. नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी येथे प्रवेश मिळविला. १९७४ मध्ये त्यांच्या बॅचमध्ये ते ६ व्या क्रमांकावर ऑफिसर झाले आणि आर्मीच्या पॅराट्रुप स्पेशल फोर्सेसमध्ये निवड झाली. देशात व देशाबाहेर जवळपास बहुतेक वेळा ते लढाईतच होते. मिझोराम मध्ये **MNF** च्या काळात लढताना आतंकवादी कॅम्प कुठे आहेत आणि ते कुठून घुसखोरी करतात त्याची माहिती काढून आतंकवाद्यांचे कॅम्प उद्‌ध्वस्त करण्यासाठी जे योगदान दिले त्यासाठी त्यांना **'Chief of Army'** ह्या मेडलने सन्मानित करण्यात आले. त्या नंतरच्या १५ वर्षांच्या काळात श्रीलंका, पंजाब, नागालँड व काश्मीर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आतंकवाद्यांचा खात्मा केला.कर्नल ह्या पदावर असताना त्यांच्या युनिटने सुमारे १०० आतंकवाद्यांना कंठस्नान घातले आणि ८७ आतंकवादी शरण आले हे आजपावेतो भिडे साहेबांचे रेकॉर्ड कोणीही मोडू शकलेले नाही. ह्या त्यांच्या अतुलनीय कामगिरीसाठी मा. राष्ट्रपतींकडून त्यांना विशिष्ठ सेवा मेडल **(VSM)** प्रदान करण्यात आले. त्यानंतर ब्रिगेडिअर आणि जनरल झाल्यावर ते काश्मीर मध्येच सेवाव्रत राहील आणि त्यांच्या सर्व ड्यूटीच्या काळात ३०० च्या वर आतंकवाद्यांना संपविले ह्या त्यांच्या 'वीरता' व 'नेतृत्व' ह्या साठी पुन्हा मा. राष्ट्रपतींच्या हस्ते युद्ध सेवा मेडल **(YSM)** ह्या पदकाने सन्मानित करण्यात आले.

नोकरीत असतानाच त्यांनी पुणे विद्यापीठामधून बी.ए. आणि मॅनेजमेंट सायन्स मधून **M.Sc.** मद्रास विद्यापीठातून केले. डिफेन्स स्टडीज इन मॅनेजमेंट मध्ये **Master of Philosophy** इंदौर येथून केले. निवृत्तीनंतर पुणे विद्यापीठामध्ये २ वर्षे प्रोफेसर म्हणून काम केले. ते स्वतः काश्मीर समस्या आणि देश सुरक्षा ह्या विषयावर दै. सकाळ मध्ये लेखन करतात. वीर नारी सेवा ट्रस्टचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. ज्या सैनिकांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली अशा त्यांच्या मुलांसाठी हा ट्रस्ट कार्य करतो.

२०११ मध्ये पुण्यात झालेल्या भिडे कुल संमेलनाचे अध्यक्ष होते. तसेच २०२० मध्ये पनवेल येथे झालेल्या भिडे कुल संमेलनात त्यांनी ३७० कलम आणि काश्मीर ह्या विषयावर दीड ते दोन तासांचे मंत्रमुग्ध असे व्याख्यान प्रश्नोत्तरांसहित दिले. मेजर जनरल संजय भिडे यांच्या मातोश्री श्रीमती सुमतीकाकू 'आम्ही भिडे' अंकात नेहमी लेखन करतात. ललना, माहेर, गृहलक्ष्मी ह्या दिवाळी अंकांमधील त्यांच्या कथांना पारितोषिकेसुद्धा मिळाली आहेत. सुमतीकाकूंचे ९२ वय असून सुद्धा लेखनाची त्यांची ऊर्मी आजपावेतो आहे. वडील स्व. वामनकाका भिडे हे **ARDE** आर्मामेंट रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंटमध्ये डायरेक्टर म्हणून कार्यरत होते. भारतातर्फे पहिली राफेल रायफल निर्मिती त्यांनी केली. देशसेवा व समाजसेवेचे व्रतस्थ असलेल्या भिडे कुटुंबाला भिडे परिवाराकडून त्रिवार वंदन आहे.





गायत्री ट्रॅव्हल्स, पुणे

हजारो वर्षे अनेक ऋषीमुनींनी तपश्चर्या केलेल्या नर्मदामैय्या किनारी भेट देण्याची सुवर्णसंधी...

पंधरा वर्षे परिक्रमा आयोजित करणारे अनुभवी संचालक यात्रेबरोबर

**नर्मदा परिक्रमा**

(अर्थात बसने परिभ्रमण)

* सर्व प्रवास २ २ च्या लक्झरी बसने
* सर्वत्र निवासासाठी डिलक्स हॉटेल्स्
* कमोडसह प्रास्त रुम्स ( २ ते ४ बेडस्)
* स्वादिष्ट रुचकर शाकाहारी भोजन
* पुणे ते इंदोर व परत परत प्रवास आपल्या आवडीनुसार

यात्रा निघण्याच्या तारखा : १) २७ ऑक्टोबर २०२२ २) २२ जानेवारी २०२३ ३) १२ फेब्रुवारी २०२३

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर बुकिंग सुरू झाले...

संपर्क : सौ. प्राची भिडे


मो. ९६५७४५१४२६/९८८१४२८१२१

# कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी

– **श्री. रवींद्र भिडे,** मुंबई
वरीष्ठ पोलीस निरीक्षक (निवृत्त)

दिनांक २६-११-२००८ रोजी मुंबईवर अतिरेकी हल्ला झाला. मी आणि माझे कुटुंबीय दिनांक २४ नोव्हेंबर २००८ रोजी आमच्या राहत्या गावी गेलो होतो. बऱ्याच वर्षांनी सुट्टी मिळाली होती आणि गावाला आमचा राहायचा बेत सुमारे एक आठवड्याचा होता. सर्व कुटुंबीय, आई-वडील, भाऊ, भावाचे कुटुंबीय, मी आणि माझे कुटुंबीय असे सर्वजण बऱ्याच वर्षांनी गावाला एकत्र जमलो होतो. दिनांक २६-११-२००८ रोजी संध्याकाळचे जेवण वगैरे होऊन आम्ही घरात गप्पा मारत बसलो असताना, माझ्या घरासमोर सुमारे ५० मीटर अंतरावर राहणाऱ्या माझ्या चुलत भावाने त्याच्या घरातून हाक देऊन मला सांगितले, 'रवी टीव्ही लाव, मुंबईत बघ काय चाललंय.' मी टीव्ही लावला आणि पाहतो तो मुंबईत विविध ठिकाणी गोळीबार आणि बॉम्बस्फोट झाल्याचे टीव्हीवर दाखवत होते. त्यापाठोपाठ आमचे वरिष्ठ अधिकारी श्री. करकरेसाहेब, श्री. कामठेसाहेब आणि माझा बॅचमेट विजय साळसेकर हे गोळीबारात मृत्युमुखी पडल्याचे टीव्हीवर बघताच, मला काहीतरी गंभीर घडत असल्याची जाणीव झाली. आईवडिलांची परवानगी घेऊन मी रात्री एक वाजता गावाहून मुंबईत यायला निघालो. मिळेल त्या वाहनाने पुढे सरकत सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान मी मुंबईत घरी पोहोचलो. अंघोळ-पाणी उरकून ताबडतोब माझ्या पोस्टींगच्या ठिकाणी गुन्हे शाखा येथे दाखल झालो. वरिष्ठांच्या आज्ञेनुसार मी तात्काळ नरीमन हाऊस कुलाबा येथे बंदोबस्त कामी हजर झालो. मी नुकताच गुन्हे शाखेत कार्यरत झालो होतो त्यामुळे मला रिव्हॉल्वरही अद्याप जारी केले गेले नव्हते. मी ताबडतोब नरिमन हाऊस, कुलाबा येथे पोहोचलो. पोलिसांनी सदर इमारतीस वेढा दिलेला होता. इमारतीच्या आतून गोळीबाराचे आणि बॉम्बस्फोटाचे आवाज येत होते. आमच्याजवळ कोणतेही हत्यार नसल्यामुळे आतील अतिरेक्यांचा सामना करणे अशक्य होते.

काही कालांतराने एनएसजी आणि आर्मीचे अधिकारी तिथे आले आणि त्यांनी सर्व ऑपरेशन ताब्यात घेतले. त्यानंतर सुमारे तीन दिवस अंघोळ पाण्याविना आणि तुटपुंज्या अन्न आणि इतर सामग्रीवर आम्ही त्या जागेवर हजर राहिलो. नऊ अतिरेकी मारले गेले आणि अजमल कसाब जिवंत पकडला गेला. सदर सर्व गुन्ह्यांचा तपास करण्याकरता क्राईम ब्रान्च, मुंबई येथे एक पथक स्थापन केले गेले. त्यात माझे बॅचमेट पोलीस निरीक्षक श्री. रमेश महाले यांना मुख्य तपासी अधिकारी म्हणून नेमण्यात आले. माझ्यावर नरिमन हाऊस या केसच्या तपासाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि तपासी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. विजय शिंदे यांची नेमणूक करण्यात आली.



या तपासादरम्यान आमच्या वरिष्ठांच्या सोबत सतत मिटिंग होत होत्या आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची पुढील दिशा वेळोवेळी ठरवून दिली जात होती. अशाच एका मिटिंगमध्ये मी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला की 'हल्ला झाल्याबरोबर काही मिडिया हाऊसेस बरोबर अतिरेक्यांनी संपर्क प्रस्थापित केला आणि अतिरेक्यांनी या लोकांशी बोलणी करण्यास सुरुवात केली. हे सर्व ते टीव्ही चॅनलवर लाईव्ह दाखवले जात होते. खरे पाहिले तर या सर्व टीव्ही चॅनेल्सना अतिरेक्यांशी बोलणी करण्याचा अथवा वाटाघाटी करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता. परंतु मिडियाचे टीव्हीवरील संवेदक ही त्यांची जबाबदारी असल्याचे समजून अतिरेक्यांशी बोलत होते व ते टीव्हीवर लाईव्ह दाखवले जात होते. या संदर्भात माझ्या मनात एक शंकेची पाल चुकचुकत होती आणि ती म्हणजे या मिडिया हाऊसेसना या हल्ल्याची पूर्वकल्पना होती का ? कारण ज्या वेगाने अतिरेक्यांनी फोनवरून या मिडिया हाऊसेसशी संपर्क प्रस्थापित केला तो अचंबित करणारा होता. त्यामुळे या मिडिया हाऊसेसच्या लोकांची चौकशी करून, त्यांचे जबाब नोंदविण्याची जबाबदारी तत्कालीन सहपोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी माझ्यावर सोपवली आणि त्यानुसार मी ताबडतोब

दिल्ली येथे रवाना झालो. राजधानी एक्सप्रेसमधून सकाळी दिल्लीला पोचल्यावर मी महाराष्ट्र सदन येथे माझ्या करता बुक केलेल्या रूममध्ये दाखल झालो. त्यानंतर या मिडिया हाऊसेसच्या लोकांची अपाँटमेंट घेऊन त्याच दिवशी त्यांचे जबाब नोंदविण्याकरिता त्यांच्या कार्यालयात दाखल झालो. हा तपास, पाकिस्तानचा या हल्ल्यातील सहभाग सिद्ध करण्यास इतका महत्त्वाचा ठरेल याची मला कल्पना नव्हती. मी ज्यांच्याकडे चौकशी करायची त्या सर्वांना एकाच रूममध्ये बोलावून घेतले आणि इतर सर्वांसमक्षच त्या सर्वांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू केले. त्या समूहात काही महिलाही होत्या. त्या सर्वांना मी त्यांची वेगवेगळी चौकशी करेन अशी अपेक्षा होती, परंतु त्यांची एकत्र चौकशी करण्याचा माझा विचार मी बोलून दाखवल्यावर तेही सर्वजण आश्चर्यचकित झाले. कारण मी त्यांना सांगितले की केवळ औपचारिकता म्हणून मला त्यांचे जबाब नोंदवायचे आहेत. त्यात काही विशिष्ट हेतू नाही. आता यांची चौकशी करताना माझ्या सर्व ज्ञानाची, अनुभवाची आणि बुद्धिमत्तेची कसोटी लागणार होती. ही सर्व मंडळी अतिउच्च विद्याविभुषित आणि समाजामध्ये एक विशिष्ट स्थान असलेली मंडळी होती. मी तिथे जाताच एक सर्वसामान्य अधिकारी अशीच माझी प्रतिमा निर्माण केली होती. माझे कपडे अत्यंत साधे होते आणि माझा ॲप्रोच सुद्धा अत्यंत कॅज्युअल होता. मी त्या मिटिंगमध्ये बसताच समोरच्या प्लेटमधील काही बिस्किटं भराभर खाल्ली, पटकन चहा प्यायलो, त्यामुळे तिथल्या जमलेल्या लोकांसमोर माझी प्रतिमा ही एक मॅनर्सलेस आणि निर्बुद्ध व्यक्ती अशी करण्यात यशस्वी ठरली. कोणतीही तिखट भाषा न वापरता अत्यंत गोडीगुलाबीने मी तिथे हजर असलेल्या एक एक माणसाचे जबाब नोंद करू लागलो. मी, त्यांच्या आणि माझ्यात एक मित्रत्वाचे नाते प्रस्थापित करण्यास यशस्वी झालो. थोड्यावेळातच त्यांचा विश्वासही मी संपादन केला आणि आमचे बोलणे अत्यंत सौहार्दपूर्ण आणि मोकळेपणाने होऊ लागले. मात्र त्यावेळी तेथे हजर असलेल्या एका मिडिया हाऊसच्या सी.ई.ओ.नी इतरांना सावध केले की 'मिस्टर भिडे हे जरी आपल्याशी मैत्रीपूर्ण वागत असले तरी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे काळजीपूर्वक द्या.' कदाचित त्या सीईओंच्या लक्षात आले असेल की अंतिम गोल मी मारणारच. या त्यांच्या वक्तव्यामुळे माझा संशय अधिकच बळावला. जबाब एकापाठोपाठ एक मी घेत होतो परंतु जबाब नोंदविलेल्या इसमांना पूर्ण तपास होईपर्यंत आणि पूर्ण जबाब नोंद होईपर्यंत, त्या कक्षाच्या बाहेर न जाण्याची मी विनंती केली होती. खरेतर या सर्व चौकशी दरम्यान त्या सर्वांमधील कच्चा दुवा कोण आहे हे शोधण्याचा मी प्रयत्न करत होतो. काही जणांचे जबाब नोंद झाले होते आणि आता मी एका तरुण मुलीचा जबाब नोंदविण्यास सुरुवात केली. ही मुलगी टीव्ही चॅनेल वरती अतिरेक्यांना विचारत होती, 'तुम्हारी माँगे क्या है ?' आणि हे आम्ही आणि आपण सर्वांनी टीव्हीवर पाहिले होते. ती तरुण मुलगी प्रोफेशनल नव्हती आणि त्यामुळे ती विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अतिशय मोकळेपणाने देत होती. तिचा जबाब नोंद करत असताना, ही व्यक्ती मला माझ्या कामात यश देऊ शकेल अशी माझी खात्री झाली. तिच्या जबाबात तिचे नाव गाव व इतर शक्य असेल तेवढी माहिती मी नमूद केली. मी अचानक त्या मुलीचा जबाब नोंदविणे बंद केले, मोबाईल उचलला त्यावर काहीतरी टाईप करून माझ्या वरिष्ठांना पाठविले आणि नंतर मी सरळ मुंबईस्थित माझ्या वरिष्ठांना फोन लावून विनंती केली की मला इथे काही लोकांना तात्काळ अटक करायची आहे आणि त्यामुळे तुम्ही दिल्ली पोलिसांशी संपर्क साधून मला पुरेसे पोलीस मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, तसेच त्या पोलीस पथकात काही महिला पोलिसांचाही समावेश असावा. कारण मला काही महिलांनाही अटक करणे आवश्यक वाटत होते. आतापर्यंत जो माणूस अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात एखाद्या मित्रासारखे गप्पागोष्टी करत होता त्याने अचानक त्याचा ॲटिट्यूड बदलला होता. आता त्यांच्यासमोर बसलेला पोलीस अधिकारी हा एक कसलेला आणि योग्य अनुभव असलेला पोलीस अधिकारी प्रकट झाला होता. मी माझ्या वरिष्ठांशी बोलून फोन बंद केला आणि शांतपणे बसून राहिलो. काही सेकंदाच्या अवधीतच ज्या तरुण मुलीचा जबाब मी नोंद करीत होतो ती अचानक रडायला लागली आणि मला विनंती करू लागली की मी तिला अटक करू नये, मी तिला जे काही तिला माहिती आहे ते सांगण्याविषयी अत्यंत कडक शब्दांत सूचना वजा विनंती केली

आणि तिने कबूल केले की हा हल्ला सुरू होताच त्यांना काही ई-मेल या हल्ल्यासंबंधी माहिती देणारे त्यांचे ऑफिशियल ई-मेल आयडीवर प्राप्त झाले होते. माझे काम फत्ते झाले होते, कच्चा दुवा निखळला होता. त्यानंतर त्या मुलीने आलेल्या ई-मेलबाबत सर्व माहिती दिली. आता त्या समूहातील इतर व्यक्तींनाही गप्प बसणे अशक्य होते. त्यांनी ते ई-मेल ओपन करून दिल्यावर त्याबद्दलची माहिती मी आमचे मुंबईचे गुन्हे शाखेच्या कार्यालयात कळवली आणि पुढील तपासात हे निष्पन्न झाले की ते आलेले ई-मेल हे बरेच देश फिरून आल्यासारखे जरी दिसत असले तरी ते मूलतः पाकिस्तानातून प्रसारित करण्यात आले होते. त्यामुळे या हल्ल्यातील पाकिस्तानचा सहभाग कोर्टापुढे आणि जगापुढे मांडण्यात आम्ही यशस्वी झालो.

कोणत्याही गुन्ह्याबाबतची आपल्याला असलेली माहिती पोलिसांना देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते कायदेशीर बंधनही आहे. वृत्तपत्र, वाहिन्यांचे पत्रकारही त्याला अपवाद नाहीत. पण २६-११ च्या हल्ल्याच्या तपासात आम्हाला एक अनुभव आलो, तो मन विषण्ण करणारा होता. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी रात्री नऊ वाजून पन्नास मिनिटांनी मुंबईत विविध ठिकाणी एकाच वेळी हल्ला सुरू करण्यात आला. त्यानंतर २७ नोव्हेंबर २००८ रोजी मध्यरात्री बारा वाजून २६ मिनिटांनी पाकिस्तानातून रशियामार्गे विविध वृत्तवाहिन्यांना एक ई-मेल पाठविण्यात आला. deccanmujahideen@gmail.com या ई-मेल आयडीवरून तो समय लाईव्ह, एन.डी.टी.व्ही., एशियन न्यूज, झी नेटवर्क, सीएनएन, आयबीएन, आजतक, सहारा समय, इंडिया टीव्ही या वहिन्यांना पाठविण्यात आला. मात्र एकाही वाहिनीने पोलिसांना स्वतःहून या ई-मेलची माहिती देण्याचे सौजन्य दाखविले नाही. 'नरिमन हाऊस' इथला अतिरेकी इमरान बाबर आणि हॉटेल 'ओबेरॉय' मधला अतिरेकी फहादउल्ला या दोघांचे झालेले दूरध्वनीवरचे संभाषण 'इंडिया टीव्हीने' प्रसारित केले होते. या दोघा अतिरेक्यांनी 'इंडिया टीव्ही'शी कसा संपर्क साधला, त्याची घटनासाखळी पाहणे फार उद्बोधक ठरेल. हल्ल्याच्या काळात बहुतांश वृत्तवाहिन्या प्रेक्षकांना काही मदत हवी असल्यास आमच्याशी संपर्क साधा, अशा आशयाचे आवाहन करीत होत्या. त्यासाठी आपल्या कार्यालयांचे दूरध्वनीही पट्टीवर फिरवले जात होते. नेमके हेच दूरध्वनी क्रमांक कराचीतल्या 'लष्कर'च्या म्होरक्यांनी मुंबईतल्या अतिरेक्यांकडे पोचवले. त्यामुळेच 'ओबेरॉय' आणि 'नरिमन हाऊस'मधले अतिरेकी त्या वाहिनीशी मोबाईलवरून थेट संपर्क साधू शकले. यात आणखी एक प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो की ज्या वाहिन्यांची कार्यालये दिल्लीत आहेत, त्या वाहिन्या मुंबईत संकटात सापडलेल्यांना तिथे बसून काय मदत करणार होत्या, हा आहे. या संभाषणाबाबत संबंधित वाहिनीच्या न्यूज अँकरचे जबाब नोंदवून घेण्यासाठी पोलीस निरीक्षक रवींद्र भिडे दिल्लीला गेले होते. त्यावेळी संबंधित प्रतिनिधींना बोलतं करताना भिडे यांना या ई-मेलचा अचानक सुगावा लागला. हा ई-मेल मिळवल्यावर मग उर्वरित वाहिन्यांची नावेही समोर आली. मग हा ई-मेल पाकिस्तानामधून रशियामार्गे पाठविण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे या हल्ल्यात पाकिस्तानचाच हात असल्याचा भक्कम पुरावा आम्ही न्यायालयात सादर करू शकलो. ज्या रात्री हा ई-मेल या वाहिन्यांना मिळाला होता, त्याच रात्री त्यांनी ही माहिती पोलिसांना दिली असती तर तपासाचे काम अधिक वेगाने झाले असते. भिडे यांच्यासारख्या चाणाक्ष अधिकाऱ्याच्या नजरेला ही बाब पडली नसती तर कदाचित स्वतःहून आम्हाला याची माहिती कुणीच पुरवली नसती, असे आता मागे वळून पाहताना जाणवतं' मुख्य तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. रमेश महाले यांचे पुस्तक '२६-११ कसाब आणि मी' यातील उतारा.

२६-११ च्या अतिरेकी हल्ल्याच्या सर्व गुन्ह्यांच्या तपासात मी बरीच महत्त्वाची कामगिरी बजावली आणि ती विशेषतः गोपनीय स्वरूपाची होती. भारतात अनेक शहरात जाऊन हा तपास करावा लागला. विशेषतः दिल्ली आणि हैद्राबाद. या सर्व केसेसचा तपास करताना विविध सरकारी एजन्सिज, तसेच अमेरिकन एजन्सी एफ.बी.आय. यांच्या सोबत काम करण्याचा अनुभव मिळाला.

# ज्येष्ठ गायिका, निवेदिका : सौ. नीला रवींद्र (भिडे)

**प्रभाकर शंकर भिडे**, डोंबिवली
फोन : ९८९२५६३१५४

काही गोष्टींचा योग यावा लागतो. एक दिवस अचानक पुण्याच्या दिलीप भिडे यांचा फोन आला. ते भिडे प्रतिष्ठानचे सचिव आहेत. आम्ही सुरुवातीला प्रतिष्ठानचे संपर्क माध्यम म्हणून 'आम्ही भिडे' हे त्रैमासिक चालू केले. त्याचा एप्रिल-मे २०२२ चा अंक हा पन्नासावा आहे तो विशेषांक म्हणून काढावा. त्यामध्ये ललितलेख, कविता, मुलाखती असा मजकूर असावा. तो वाचकप्रिय होण्यासाठी (अहवाल न होता) आकर्षक पद्धतीने करावा. त्यासाठी तुम्ही दोन मुलाखती घ्याव्यात. त्यातील एक विलेपार्ले येथे राहणाऱ्या गायिका, निवेदिका, कॅसेट निर्मात्या सौ. नीला रविंद्र यांचे नाव सुचविण्यात आले.



मी त्वरित त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनीही लगेच प्रतिसाद दिला. मोबाईलवर दृकश्राव्य माध्यमाच्या लिंक पाठविल्या. नीला रवींद्र यांचे यू ट्यूब चॅनेल आहे. त्यातील बहुतेक बघितल्यावर लक्षात आले, हा त्यांचा गेल्या पन्नास वर्षांतील सांस्कृतिक/सांगितिक जीवनाचा वारसा आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक चांगल्या गोष्टी केल्या आहेत. तेव्हा एका लेखात किंवा संवादात पूर्ण ओळख किंवा कार्य सांगता येणार नाही. त्यासाठी दीर्घ मुलाखत घेऊन केलेल्या अनेक गोष्टी जाणून घेणे आवश्यक आहे. तेव्हा फोनवर बोलून व वेगवेगळी दृकश्राव्य बघून मासिकापुरता लेख लिहावा. त्यातून कमीतकमी जुजबी ओळख होईल. त्यातून हे तरी समजले की एखादा कलावंत/गायिका गाण्याबरोबर सांस्कृतिक, सांगितिक जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न कसे करते. एवढ्यासाठी हा लेख प्रपंच.

त्यांच्याशी झालेल्या संवादामधून खालील गोष्टी कळल्या. नीलाताईंची आई स्वतः गायिका होती. इतकेच नव्हे तर त्यांना अभिनयाचे अंग होते. त्यांनी पार्ले येथे पुलंच्या प्रसिद्ध 'अंमलदार' या नाटकात काम केले होते. त्यांचे वडील रसिक श्रोता असल्यामुळे त्यांचा पाठिंबा असे. त्यांच्या आईवडिलांनी नीलाची आवड लक्षात घेऊन प्रसिद्ध सतारवादक बंदिशीकार शंकर अभ्यंकर (विलेपार्ले) यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. यांचा गोड आवाज, यामुळे या शिक्षणाचा फायदा झाला. पुढे कॉलेजमध्ये इंटरकॉलेजिएट संगीताची ट्रॉफी त्यांनी सहा वर्षे कॉलेजला मिळवून दिली. एकीकडे शिक्षणात करियर करीत होत्याच. पण त्याचबरोबर संगीतसेवाही चालू होती. अशा धडपड्या व्यक्तीला देव कुठेतरी संधी देतोच. (एकीकडे त्यांनी मुंबई विद्यापीठातून एम.ए. (फिलॉसॉफी) पूर्ण केले).

त्यावेळी बाळ कोल्हटकरांनी 'देव दीनाघरी धावला' हे संगीत नाटक लिहिले. त्याचे संगीत दिग्दर्शक वसंत देसाई होते. त्याची प्रॅक्टीस चालू असताना अचानक बाळ कोल्हटकर तेथे आले आणि म्हणाले की येथे आशा काळे आल्या आहेत का ? नाटकाचे दिग्दर्शक म्हणाले नाही. अभिनेत्री आशा काळे कोल्हटकरांच्या नाटकांतील मुख्य अभिनेत्री असत. पण त्यांच्या आवाजासारखा आवाज मी ऐकला. तेव्हा दिग्दर्शक म्हणाले, तो नीला जोशी (भिडे) यांचा आवाज आहे. कोल्हटकर म्हणाले, वा ! त्यांना नाटकातील 'ऋणानुबंधाच्या जिथुन पडल्या गाठी' या गाण्याला त्यांचा आवाज योग्य वाटतो. साहजिकच त्यावेळचे प्रसिद्ध नाट्यगीत गायक उदयराज गोडबोले यांच्याबरोबर कु. नीला जोशी यांनी गाणे म्हटले. पुढे त्यांच्याच आवाजात नाटकात ऐकू येते. पण कॅसेटसाठी प्रथितयश गायिका पाहिजे म्हणून दुसऱ्या गायिकेचा आवाज आहे. पुढे त्यांनी १९६८ मध्ये आंतरविद्यापीठ गायनस्पर्धा जिंकून ट्रॉफी मिळवली.

कॉलेज शिक्षण संपल्यावर विलेपार्ले येथील जुने रहिवासी श्री. रवींद्र भिडे यांच्याबरोबर विवाह झाला. नवीन संसार सुरू

झाल्यावर आपल्या गायनकलेला त्यांना वेळ कमी मिळू लागला. पण दोन गोड कन्यांच्या जन्मानंतर त्यांनी पुन्हा आपल्या गायनाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. मुख्य म्हणजे यजमानांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. संगीताच्या पुढील वाटचालीकरिता 'मोव्हॅक' या कॅसेट कंपनीत काम सुरू केले. या कंपनीतील कामामुळे गाण्याबरोबर रेकॉर्डिंग व इतर गोष्टी त्यांना कळू लागल्या. ज्या क्षेत्रात आवड त्याच क्षेत्रात काम करण्याची संधी हा अतिशय दुर्मिळ योग आहे. या कंपनीच्या अनेक मराठी कॅसेटच्या थीम्स सौ. नीला रवींद्र यांच्या आहेत. पुढे याच कंपनीतर्फे 'अशोक पत्की' या संगीत दिग्दर्शकाबरोबर अनेक ध्वनीफितींची (कॅसेट/सीडी) निर्मिती त्यांनी केली. त्यांची यादी बघितली की मराठी माणसांची नाडी यांनी बरोबर ओळखली हे समजते. 'गीत तुझे माझे' शरद तळवलकर यांच्या सोबत गप्पांची 'पुणेरी मिसळ' तसेच 'पंढरीच्या वाटे', 'नाव तुझे मैना', 'गणगौळण' तसेच 'शनिमाहात्म्य' व इतर नाट्यसंगीताच्या निर्मिती करून त्या यशस्वी केल्या. आता त्यांना कॅसेट (ध्वनिफित) व्यवसायातील सर्व गोष्टींची माहिती झाली होती. आता स्वतःचीच कंपनी काढावी असा धाडसी विचार त्यांच्या मनात आला. नशिबाने या निर्णयास यजमानांनीपण साथ दिली. (मराठी माणसे सहसा असा विचार करीत नाहीत) यातूनच १९८० साली 'प्रथमेश ऑडिओ'ची निर्मिती झाली. आता त्यांनी प्रथमेशतर्फे मैफिल, स्वरलहरी, मनाचे श्लोक, फुलराणी, पावसाची गाणी, हट्टी राणी, ढगांचा ससा, कपिलदेव, हे अल्बम बाजारात आणले. अनेक कॅसेट/सीडींची निर्मिती सुरू झाली. त्यामध्ये स्वर ऋतुगंध बंदिशी (दोन भाग) निर्माण झाले. कौतुकाची गोष्ट म्हणजे सौ. नीला भिडे यांचे दूरदर्शनवर मुलाखती घेणे, कार्यक्रमांचे निवेदन करणे हेही चालू होतेच. या सर्व कामांमध्ये अनेक माणसांचे गमतीदार अनुभव आले.

त्यांनी निर्माण केलेल्या विविध विषयांवरील कॅसेट/सीडी बघितल्या की त्यांचे सांस्कृतिक विश्व किती समृद्ध होते याची जाणीव होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी अंदमानच्या तुरुंगात असताना 'कमला' हे काव्य लिहिले. ते खरे म्हणजे

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी अंकास हार्दिक शुभेच्छा !

श्री. गणेश महादेव भिडे
मो. ९४२११ ३६९६८

सौ. गिरीजा गणेश भिडे
मो. ९४०५७ ४७६६८
८७६७४७५०६५

स्नेहांकुर

राहण्याची उत्तम सोय एसी-नॉन एसी रूम्स उपलब्ध

श्री. गणेश महादेव भिडे
(श्री दुर्गादेवी देवस्थानचे उपाध्यक्ष)

सर्व धार्मिक कार्यक्रम केले जातील. ✻ किरकोळ व घाऊक सुपारीचे व्यापारी

मु. पो. ता. गुहागर (वरचा पाट), जि. रत्नागिरी-४१५७०३

प्रेमकाव्य आहे. सर्वात नवल म्हणजे अंदमानसारख्या भयानक जेलमध्ये होते. त्यांना तेथे प्रेमकाव्य सुचले. लिखाणाची साधने उपलब्ध नसताना त्यांनी भिंतीवर चूक किंवा खिळ्याने लिहिले दुसऱ्या दिवशी पाठ केले व खोडून पुढील काव्य लिहिले. यामध्ये 'फुलबाग' नावाची कविता आहे. ती स्वतः नीला रवींद्र गाऊन सादर करतात. त्याची कॅसेट/सीडी आहे. तसेच त्यांची एक कॅसेट/सीडी कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या काव्यावर आहे. कवितेचा विषय आहे 'मराठी माती' याचे गायन केले आहे. त्यावेळचे प्रसिद्ध लोकगीत गायक जयवंत कुलकर्णी व नीला रवींद्र यांनी केले आहे. अशीच एक कॅसेट/सीडी आहे, कविवर्य गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी यांची. त्याचे गायन केले आहे नीलाताईंची मोठी कन्या ॲडव्होकेट गौरी भिडे-मेहेंदळे हिने. तिचाही आवाज चांगला आहे. यांच्या तीन पिढ्यात उत्तम गायकी आहे. जणू काही ईश्वराचा वरदहस्त असावा ! आजी-आई-मुलगी तिघी गायिका.

अशा अनेक प्रसिद्ध गायकांच्या आवाजाच्या कॅसेट/सीडी निर्मिती वेळी अनेक गमतीजमती, अनुभव आले. असणारच. त्यामध्ये एक अनुभव आहे हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा. तो त्यांनी प्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांच्याशी मुलाखत घेताना सांगितला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे अखख्या महाराष्ट्राचे दैवत व अभिमानाचा विषय. त्यांची कॅसेट बनवावी असे योजले. त्याकरिता चांगली संहिता लिहिली. त्याचे रेकॉर्डिंग झाले. पुढे असे ठरले की त्याच्या सुरुवातीचे निवेदन बाळासाहेब ठाकरे यांच्या बोलण्याने करावे. मग त्याकरिता नीलाताई भीतभीतच त्यांच्याकडे गेल्या. त्यांनी विचारले काय काम आहे ? तेव्हा घाबरतच आपला मनोदय नीलाताईंनी सांगितला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाळासाहेब नीलाताईंना ओळखत होते. त्यांनी सांगितले की श्रीकांत ठाकरे यांच्या दूरदर्शनवरील कार्यक्रमात नीलाताईंनी गाणी म्हटल्याचे त्यांच्या लक्षात होते. बाळासाहेब म्हणाले तुमची रेकॉर्ड केलेली छत्रपती शिवाजी महाराजांची संहिता मी वाचेन. ती मला पसंत पडली तरच मी बोलेन. मी तुम्हाला आठ दिवसांनी कळवेन. पण आनंदाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशी बाळासाहेबांचा फोन आला की संहिता मला आवडली आणि मी बोलायला तयार आहे. पण मी तुमच्या स्टुडिओत येणार नाही. येथेच रेकॉर्ड करा. नीलाताईंनी ठीक आहे म्हटले. पण मग ऐकल्यावर इतरांना जो आवाजाचा (स्टुडिओमुळे) परिणाम दिसत होता तो त्यांच्या बोलण्यात दिसत नव्हता. त्यांनी बाळासाहेबांना विनंती केली की तुम्ही स्टुडिओत आलात तर तो परिणाम येईल. साहजिकच बाळासाहेबांनी स्टुडिओत येऊन रेकॉर्डिंग केले व तो परिणाम साधता आला. तसेच बाळासाहेबांनी छत्रपतींची सुरुवातीला जी ललकारी दिली जाते ती जोशपूर्ण नाही ती जोशपूर्ण पाहिजे असे सांगितले. मग बाळासाहेबांनी स्वतःच माईकसमोर उभे राहून जोरात ललकारी दिली. (राजमान्य राजश्री क्षत्रिय कुलवंत छत्रपती शिवाजी महाराज...) त्यामुळे कॅसेट/सीडी चांगली परिणामकारक झाली. असे अनेक अनुभव त्यांच्या पोतडीत आहेत.


पहिल्यांदाच नीलाताईंनी अशोक पत्की या संगीतकारासाठी जिंगल्सचे दिलेला आवाज नीलाताईंचा होता. ती एका साबणाची जाहिरात होती. पुढे त्यांनी अशोक पत्की या संगीतकाराच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या उत्पादनांसाठी जाहिरातगीते गायिली. उत्पादनासाठी त्याची फार मदत होते. अशा अनेक गोष्टी नीलाताईंनी गेल्या पन्नास वर्षांत केल्या व त्या प्रत्येकात त्यांनी यश मिळविले. इतके यश मिळवूनही त्यांच्या बोलण्यातील साधेपणा/नम्रपणा कौतुकास्पद आहे. इतरांप्रमाणे त्यांच्याही कुटुंबात अनेक दुःखं, अडचणी आल्या. पण प्रत्येकामध्ये सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यामुळे त्या त्यातून सहीसलामत बाहेर पडल्या. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य व आनंद कमी झाला नाही. दोन्ही कन्या वकील असून आईप्रमाणे गोड गळा घेऊन आल्या आहेत. असे हे सुखी व आनंदी कुटुंब. त्याचीही अल्पशी झलक.

शेवटी एवढेच सांगतो की त्यांची 'संस्कार' ही कॅसेट/सीडी मराठी मनाचा व मराठी संस्कारांचा उत्तम नमुना आहे. प्रत्येक मराठी कुटुंबाने आपल्या मुलाबाळांना ऐकवावी. त्याचा निश्चित चांगला परिणाम होईल. विलेपार्लेसारख्या सुसंस्कारित नगरीत तेवढीच चांगली सुसंस्कारित माणसे राहतात. या सर्वांना मनापासून शुभेच्छा !

# मुलाखत : एका नाट्यकलाकाराची

**प्रभाकर शंकर भिडे**, डोंबिवली
फोन : ९८९२५६३१५४

कुलवृत्ताचे काम करताना अनेक कलाकारांशी संपर्क आला. त्यामध्ये काही नाट्यकलाकार/लेखक वगैरे विविध क्षेत्रांतील भिडे मंडळी होती. काहींची मोठ्या दिलदार स्वभावामुळे जवळिक/मैत्री झाली. अशांतील प्रमुख नाव म्हणजे रमेश भिडे या नाट्य कलावंताची. नुकताच त्यांचा 'डॉ. काशिनाथ घाणेकर आणि मी' हा एकपात्री कार्यक्रम बघण्याचा योग आला. त्यांच्या सादरीकरणातून, अभिनयातून दीड-दोन तास कुठे गेले कळलेच नाही.



खरे म्हणजे २-३ वर्षांपूर्वी सुबोध भावे यांनी याच विषयावर सुंदर चित्रपट निर्माण केला होता. पण वैयक्तिक अभिनय व चित्रपटातील विविध कलाकारांनी केलेल्या डॉ. काशिनाथ घाणेकरांच्या भूमिका यामध्ये बराच फरक जाणवला. रमेश भिडे व डॉक्टरांची असलेली मैत्री यामुळे जाणवणारा अभिनयातील आपलेपणा याचा वेगळा स्पर्श जाणवला. तेवढ्यात पुढच्या महिन्यात प्रकाशित होणाऱ्या 'आम्ही भिडे' या विशेषांकासाठी पुण्याच्या दिलीप भिडे यांनी रमेशरावांची मुलाखत घेण्याचे सुचविले. त्यातून त्यांची नाट्यप्रेमाची ओळख व्हावी हीच अपेक्षा ठेवून त्यांच्याशी संवाद (गप्पारूपी) साधला. मी त्यांना पहिलाच प्रश्न विचारला की, तुमची आणि डॉ. काशिनाथ घाणेकरांची दोस्ती कशी काय जमली ? वास्तविक डॉक्टर अतिशय मनस्वी कलावंत होते. रमेश भिडे : डॉक्टरांनी अभिनयाचे धडे रामचंद्र वर्दे या प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शकाकडून घेतले. ते कोणतेही नाटक स्वीकारण्यापूर्वी रामचंद्र वर्देंचा सल्ला घेत.

योगायोगाने रमेशरावांचे सुरुवातीच्या नाटकांपैकी एक नाटक होते 'वंदे मातरम्'. ते नाटक डोंबिवलीच्या राजाभाऊ केळकरांनी लिहिले होते. त्याचे दिग्दर्शक होते रामचंद्र वर्दे. साहजिकच नाट्यजीवनाच्या सुरुवातीचे धडे रमेशरावांना वर्देकडून मिळाले. एकमेकांचे स्वभाव जुळले. साहजिकच रमेशराव दर शनिवारी मुंबईला त्यांच्याकडे जात. तेथे त्यांची गाठ डॉक्टर घाणेकरांशी पडली. डॉक्टरही वृत्तीने दिलदार, स्पष्टवक्ते, मोकळ्या मनाचे. त्यात देवाने अशी रूपसंपदा बहाल केली होती की साहजिकच माणसे त्यांच्याकडे आकृष्ट होत. त्यांची दोस्ती आयुष्यभर म्हणजे डॉक्टरांच्या निधनापर्यंत टिकली. सुदैवाने त्यांचे सुपुत्र प्रसाद भिडे अत्यंत गुणी. त्यांनी वडिलांच्या एकपात्री सादरीकरणाकरिता उत्तम रंगावृत्ती लिहून दिली. नुकताच मार्च २०२२ मध्ये ठाणे येथे प्रयोग झाला. तेथे प्रयोग बघून एका रसिक प्रेक्षकाने त्याची उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली. ती मोबाईलवर आली आहे. मग बोलता बोलता रमेशरावांच्या नाट्य प्रेम/नाट्य आवड कसे निर्माण झाले याबद्दल विचारले असता त्यांच्याशी झालेल्या संवादातून खालील गोष्टी कळल्या.

रमेशरावांचे मूळ गाव कोकणातील मुटाट, हे देवगड तालुक्यात असून सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. (त्यांचा जन्म १९५२ सालचा) कोकणातील छोटे आडबाजूला वसलेले गाव. गावात ब्राह्मणांची बरीच घरे होती. स्वातंत्र्यानंतर देशात लागू केलेल्या कुळकायद्यानुसार बऱ्याच ब्राह्मणांचे शेतीचे उत्पन्न कमी झाले. सर्वजण कनिष्ठ मध्यम वर्गात जमा. पण संस्कार चांगले, शिक्षणाचे महत्त्व जाणणारे. सुदैवाने मुटाटला एस.एस.सी.पर्यंत शाळा होती. त्यावेळी शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये हमखास नाटक बसवित. इतर मनोरंजनाची काही साधने नसल्यामुळे लोकही नाटक बघायला गर्दी करीत. रमेशराव चवथी-पाचवीत असताना (अंदाजे वय ९ वर्षे) शाळेतील शिक्षकाने एक नाटक लिहिले. नाव होते 'गृहदशेचा फेरा'. यांच्या बोलक्या स्वभावामुळे नाटकात काम करण्याची संधी मिळाली. त्यांचे नाटकातील काम प्रेक्षकांना आवडले. इतकेच नव्हे तर त्यांच्या कामाबद्दल पारितोषिकही मिळाले. शाळेच्या पुढील समारंभात त्यांना ते देण्यात आले. (गमतीची गोष्ट म्हणजे त्यांचे झालेले कौतुक बघून इतर कलाकारांनी मिळालेली बक्षिसे रमेशरावांनाच दिली.) पुढे शाळेत शिकत

असताना 'धर्मवीर संभाजी' हे व. कृ. बोडस यांचे ऐतिहासिक नाटकात काम करण्याची संधी मिळाली. त्याचेही चांगल्या कामाबद्दल कौतुक झाले. यावेळी मला अमीर खानच्या 'तारे जमीपर' या चित्रपटाची आठवण झाली. त्यामध्ये एका छोट्या मुलाची गोष्ट सांगताना आमीरखान म्हणतो, 'Every child is special' देव प्रत्येक माणसात काही चांगले गुण, वैशिष्ट्ये घालत असतो. रमेशरावांना कळले की आपली अभिनयाची आवड जोपासली पाहिजे. पूर्वी ११ वी झाल्यावर नोकरी व्यवसायासाठी कोकणवासियांना मुंबई हा एकच पर्याय उपलब्ध होता. रमेशराव प्रथम मुंबईला व काही दिवसांनी डोंबिवलीला राहण्यास आले. सुदैवाने १९७०-७५ पर्यंत मुंबईत नोकरीची उपलब्धता होती. ठाण्याला केमिकल झोनमध्ये अनेक फर्मास्युटीकल कंपन्या सुरू झाल्या होत्या. त्यामधील 'सँडोज' या औषधी गोळ्या उत्पादन करणाऱ्या कंपनीत रमेशरावांना ऑपरेटर म्हणून नोकरी मिळाली. कंपनीच्या नाट्य विभागात रमेशराव नाटकांतील भूमिका करू लागले. प्रत्येक कंपनीत नाट्य किंवा साहित्य याची आवड असलेल्या लोकांचा एक ग्रुप तयार होतो. रमेशरावांना त्यांची नाट्याभिरुची स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी ग्रुप करून अनेक नाटके सादर केली. तसेच डोंबिवलीमध्ये सांस्कृतिक वातावरण चांगले असल्यामुळे येथेही अनेक हौशी कलाकारांचे ग्रुप होते. त्यातूनच 'नाट्यब्रह्म, पुणे' संस्थेच्या श्री. घांग्रेकरांशी त्यांचा परिचय झाला. त्यांना अनेक नाटकांत कामे करण्याची संधी मिळाली.

नाट्यब्रह्म, पुणेच्या पुढील नाटकांमध्ये रमेशरावांनी विविध भूमिका केल्या. १) पारिजात तुझ्या अंगणी, २) बदला, ३) पाटलाची अवलाद, ४) देवावर मात, ही नाटके पांडुरंग घांग्रेकरांनी लिहिलेली आहेत. ५) झाला महार पंढरीनाथ (संगीत नाटक) लेखक केशव मोरे.

रमेशरावांनी नोकरी सांभाळत अनेक नाटकांत छोट्या-मोठ्या भूमिका करीतच आपली आवड जोपासली. 'तो राजहंस एक' या नाटकात त्या सुमारास वसंत शेणवी यांच्या या प्रसिद्ध नाटकात शकुनीमामा ही प्रसिद्ध भूमिका करण्याची संधी मिळाली. ती भूमिका सर्वांना आवडली. मिळालेल्या संधीचे रूपांतर सोन्यामध्ये करण्याची कला रमेशराव अनुभवातून शिकले. पुढे त्यांची गाठ मराठीतील त्यावेळचे प्रसिद्ध नाटककार श्री. मधुसुदन कालेलकर यांच्याशी पडली. त्यांच्या प्रसिद्ध नाटक 'दिवा जळू दे सारी रात', 'तो राजहंस एक'

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !

# मे. पद्माकर नरहर भिडे

**मंगलोरी कौले, कोने, सिमेंट, स्टील, हार्डवेअर, टाईल्स, कडाप्पा, मार्बल, खिडक्या, दरवाजे वगैरे इमारती सामानाचे विक्रेते.**

**भिडेवाडी, मु. पो. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. मो. ९८९०२४६२७२**

सहयोगी संस्था **श्री दत्तभारत गॅस एजन्सी, गोळवली.**

किंवा 'जग काय म्हणेल' अशा नाटकांतील भूमिका करू लागले. आस्ते आस्ते ते व्यावसायिक नाटकांत भूमिका करू लागले.

साधारण १९९५ साली बऱ्याच कंपन्यांनी स्वेच्छा निवृत्ती जाहीर केली. तोपर्यंत त्यांची सँडोजमध्ये २५ वर्षे नोकरी झाली होती. साहजिकच त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली. तसेच त्यांच्या जीवनात आणखी एक कठीण प्रसंग आला. पत्नीला कर्करोगाचे निदान झाले व थोड्या दिवसात निधन झाले. मुलाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. पण म्हणतात ना की देव जेव्हा संधीची सर्व दारे बंद करतो तेव्हा एक दार किंचित उघडतो. त्यांचा मुलगा इतका गुणी आहे की त्यानाच नाही तर सर्व भिडे मंडळींना अभिमान वाटावा. तो १० वी व १२ वी च्या परीक्षेत मेरीट लिस्टमध्ये आला. तो उत्तम कविता करतो. चांगली ग्रिटींग्ज बनवतो. त्याचे वाचन उत्तम आहे. डोंबिवलीतील अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करतो. नुकतेच त्याने माजी मुख्यमंत्री यांच्या डोंबिवलीतील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तमरित्या केले.

पुढे रमेशरावांनी 'नाट्यसंपदा' या प्रसिद्ध नाटक कंपनीतील अनेक प्रसिद्ध नाटकांत भूमिका केल्या. त्यातील प्रसिद्ध नाटके म्हणजे - 'तो मी नव्हेच' (लेखक आचार्य अत्रे). यामधील प्रसिद्ध सरकारी वकीलाची भूमिका व इतर छोट्या भूमिका करीत असत. 'अश्रुंची झाली फुले', 'इथे ओशाळला मृत्यू' (लेखक वसंत कानिटकर). तशी नाट्यसंपदाच्या इतर नाटकांत भूमिका केल्या. त्यांचा उत्तम अभिनय व प्रभाकर पणशीकरांची दोस्ती यामुळे ते एक विश्वसनीय नट म्हणून पंतांचे सहकारी होते. त्यांनी १५ वर्षे म्हणजे इ.स. २००९ पर्यंत नाट्यसंपदामध्ये भूमिका केल्या. 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे अतिशय प्रसिद्ध नाटक. पूर्वी गोवा हिंदू असोसिएशन करीत असे. पुढे इतर कंपन्याही करू लागल्या. २००७ साली रमेशरावांना या नाटकात काम करण्याची संधी मिळाली.

जसजसा काळ पुढे जात होता तसे अनेक नवीन नाटककार (लेखक) पुढे येऊ लागले. त्यातील एक प्रमुख नाव म्हणजे प्रेमानंद गजवी यांनी लिहिलेल्या 'शुद्ध बिजापोटी' या नाटकात रमेशरावांनी काम केले. पूर्वीचे बाळ कोल्हटकरांचे प्रसिद्ध नाटक म्हणजे 'लहानपण दे गा देवा' तसेच 'उमाजी नाईक' या ऐतिहासिक नाटकातील त्यांची भूमिका प्रेक्षकांना अतिशय आवडली. इतकेच नव्हे तर प्रसिद्ध संगीत नाटक 'मानापमान' यामध्ये गायिका कीर्ती शिलेदार यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. डोंबिवलीतील सर्वेश सभागृहाचे मालक श्री. जयवंत फाटक हे उत्तम नाट्य लेखन करीत. त्यांनी पाच नाटके लिहिली. त्यापैकी तीन नाटकांत रमेशराव होते. काही नाटकात त्यांना अभिनयाबरोबर व्यवस्थापकाची भूमिका पार पाडली. त्यांची नाटके म्हणजे 'सौ सोनारकी', 'शिरला तो तरला' इत्यादी. अशा प्रकारे त्यांनी आपल्या आयुष्यात तीन हजारापर्यंत प्रयोग केले.

आता चिरंजीव प्रसाद याने संस्कृतमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून सोमय्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे वडिलांचा नाटकाचा वारसा चि. प्रसाद पुढे चालवतो आहे. त्याने महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत संस्कृतमध्ये नाटक लिहिले व सादर केले. इतकेच नव्हे तर अभिनयाचे पारितोषिकही मिळवले. वडिलांची नाट्य परंपरा मुलाने पुढे चालवावी यासारखी आनंदाची गोष्ट नाही. चार-पाच वर्षांपूर्वी त्याची अनेक जुन्या-नव्या प्रसिद्ध नाटकांतील स्वगते एकत्र करून 'अंधारातील स्वगते' हा एक वेगळाच नाट्यप्रयोग लिहिला. रमेशरावांनी त्यात मुख्य भूमिका करून उत्कृष्ट सादरीकरण केले. सुदैवाने त्यांच्या दोन्ही नाट्यप्रयोग बघण्याची संधी मला मिळाली. या वयातही त्यांची अभिनय क्षमता कमी न होता ती अधिक अनुभव संपन्न व पक्व फळासारखी उत्तम झाली. आहे. पु. ल. देशपांडे यांनी एका ठिकाणी म्हटले आहे, जीवनात नोकरी किंवा व्यवसाय तुम्हाला जीवन जगवेल पण ते कशा प्रकारे जगायचे ते एखादी कला, साहित्य किंवा संगीत शिकवेल. त्याने तुमच्या जीवनात यश व आनंद प्राप्त होईल.'

मला वाटते की अंगभूत असलेले नाट्य गुण त्यासाठी मेहनत करायची तयारी याचा ध्यास असला की यश आपोआप चालून येते. मुलाच्या (लिहिलेल्या) नाटकात वडिलांनी काम करणे त्यात यश मिळविणे ही भाग्याची गोष्ट आहे. त्यादृष्टीने रमेशराव भाग्यवान आहेत. माणसाला तरी आणखी काय हवे ? पुढील पिढ्या निश्चितपणे म्हणतील की आमच्या वाडवडिलांनी नाट्यकलेचा उत्कृष्ट वारसा आमच्यासाठी ठेवला आहे. तो जतन करूया. रमेशराव व गुणी प्रसाद यांना पुढील जीवनासाठी शुभेच्छा !

# *मागे वळून पाहताना...*

'आम्ही भिडे' हे भिडे कुलाचे मुखपत्र म्हणजे संपर्काचे माध्यम म्हणून ओळख आहे. पहिला अंक २००३ मध्ये प्रकाशित झाला. त्यावेळेस हे मुखपत्र अनियतकालिक म्हणूनच सुरू केले. कारण दुसऱ्या कुलवृत्ताच्या आवृत्ती लवकरात लवकर प्रकाशित करण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे सर्व मंडळी व्यस्त होती. म्हणून २००३ ते २०१० ह्या ७ वर्षांत फक्त पाचच अंक प्रकाशित झाले. कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाल्यानंतर कार्याचा वेग थोडा मंदावला व त्या अनुषंगाने आर्थिक बळ कमी झाले. २००८ नंतर संमेलने होत होती, परंतु मिळालेल्या देणगीतून अंकाचा खर्च झेपणे कठीण होते. २०१० च्या सुमारास कोल्हापूरमधील 'प्राजक्त' ह्या एजन्सिला संपर्क केला. प्राजक्तचे मालक श्री. प्रफुल्ल डबीर यांच्याकडे पोस्टाचे लायसन्स असल्यामुळे पोस्टेज खर्च कमी झाला. त्याशिवाय श्री. डबीर यांनी डीटीपी, प्रिटींग, फोल्डींग व पोस्टाद्वारे वितरण ह्याची जबाबदारी घेतली. त्यामुळे २०११ पासून आजपावेतो आपण दर तीन महिन्यांनी 'आम्ही भिडे' नियमित व विनामूल्य वितरित करू शकतो आहे. श्री. व सौ. डबीर ह्या दाम्पत्याच्या अखंड व नियमित असलेल्या सेवेमुळे आपण एकमेकांना ह्या मुखपत्राद्वारे संपर्क साधू शकतो हे विसरून चालणार नाही.

ह्या ५० व्या सुवर्ण विशेषांकाचे औचित्य साधून आतापर्यंत प्रसारित झालेल्या अंकामधील काही लेखांचे पुर्नमुद्रण करून आपल्यासमोर ठेवतो आहे. भिडे कुटुंबामध्ये कलाकार, खेळाडू, सरकारी सनदी अधिकारी, सेना अधिकारी, सामाजिक कार्य करणारे आणि राजकारणी असे अनेक दिग्गज व गुणी मंडळी आहेत ह्यासाठी काही पुर्नमुद्रित लेख, माहितीचा धांडोळा घेत आहोत.

– *कार्यकारी संपादक*













(१) सांगली संमेलन २००३ : आम्ही भिडे अंक प्रकाशन (२) मुंडाजे संमेलन २०११ : दीप प्रज्वलन
(३) गणपतीपुळे संमेलन २०१० (४) किहीम संमेलन २००९

# दिलखुश रेडिओ...

**– प्रदीप जगन्नाथ भिडे**, मुंबई

**(प्रथम प्रसिद्धी : अंक १, सांगली अधिवेशन २००३)**

श्री. प्रदीप भिडे बरीच वर्षे दूरदर्शनवर वृत्तनिवेदन करत असूनही 'आकाशवाणी' या माध्यमाविषयीचे त्यांना असणारे आकर्षण आणि त्या माध्यमाच्या विस्तारातील अफाट शक्यतांचा ऊहापोह करणारा लेख.

सिग्नलजवळ शेजारी उभ्या राहिलेल्या गाडीतून आरोळी कानावर आली, 'महाराज, एवढं हसू काय फुटलंय ?' मी दचकून शेजारच्या गाडीकडे पाहिले. एक जुना दोस्त अनेक वर्षांनी दिसत होता. ओशाळल्यासारखे हसत मी म्हटले, 'काही नाही रे, रेडिओ ऐकत होतो. रेडिओवरच्या निवेदकाशी श्रोते फोनवरून गप्पा मारत होते. ऐकायला मजा येत होती. त्याचे हसू फुटले !' 'भेटायला हवं, दोस्ता. फोन कर', असं म्हणून त्यानं गाडी सुरू केली. दोघांच्या गाड्या आपापल्या मार्गाला लागल्या. गेली दोन-तीन वर्षे जे माध्यम कळत-नकळत माझ्या जीवनाचा भाग बनलं होतं, त्याची-माझी जवळीक मला समजून गेली. ते माध्यम म्हणजे रेडिओ. रेडिओची गंमत - रेडिओ या माध्यमाचा विलक्षण पगडा आम्ही आमच्या लहानपणी अनुभवलाय.

आई-वडील ग्रामीण भागात शिक्षक असल्याने अकरावीपर्यंतचे शिक्षण चार गावांतून झाले. खेडेगावात राहताना करमणुकीचे माध्यम रेडिओशिवाय कुठले असणार ? प्रपंच, टेकाडे भावजी, पुणे आकाशवाणीवरचे पुरुषोत्तम जोशी, त्यांचा अफलातून आवाज, आपली आवडसारखे कार्यक्रम, रेडिओच्या पत्रोत्तरांच्या कार्यक्रमात आपले नाव ऐकल्यावर आठवडाभर तरी जमिनीच्यावर चार अंगुळे चालणारे आम्ही, हा जमाना आम्ही अनुभवला. आमच्या दृष्टीने आमच्या बालपणीचा तो सुवर्णकाळ रेडिओच्या म्हणजेच आकाशवाणीच्या साथीने घालवलेला.

पण नंतर रेडिओच्या विश्वात एखादे चक्रीवादळ यावे तसे झाले. नावाने 'दूरदर्शन' असलेले माध्यम लोकांना जवळचे वाटले आणि निदान शहरी भागात तरी 'रेडिओ'ची डबडी कुठेतरी कोपऱ्यात स्थलांतरित झाली. काही घरांतून रेडिओची रवानगी स्वयंपाकघरातल्या फ्रिजवर झाली आणि सकाळी ऑफिसला जाण्याची वेळ नेमकी कळावी म्हणून 'टाईम रिमाइंडर' असे काम बिचाऱ्या रेडिओकडे आले. 'मंगल प्रभात' चालू असताना उठणे, आरोग्यसंपदा संपेपर्यंत अंघोळ आटोपायला हवी, बातम्या संपताच ब्रेकफास्ट घ्यायचा. शास्त्रीय संगीत सुरू होता होता, हातात डबा घेऊन बाहेर पडायलाच हवे. थोडक्यात 'आवाजाचे घड्याळ' म्हणून रेडिओचा उपयोग व्हायला लागला आणि हळूहळू रेडिओ' 'बापुडा' होऊन अडगळीत जाऊन अंतर्धान पावतोय की काय अशी शंका वाटायला लागली.



टेलिव्हिजनच्या झंझावातापुढे उन्मळून पडलेला रेडिओ मला अजूनही स्मरतोय. दूरदर्शन आणि आकाशवाणी, हे केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याच्या अखत्यारीतले विभाग. १९७५ ते १९९० या दरम्यान मला जेव्हा जेव्हा मुंबई आकाशवाणी केंद्रावर जाण्याचा योग येई, तेव्हा तिथल्या कामकाजावर 'आपण आता कालबाह्य झालो आहोत' याची खिन्न छाया पसरलेली दिसायची.

पुढे अर्थात उपग्रह दूरचित्रवाणीवाहिन्या आल्यानंतर तिथल्या झगमगाटापुढे दूरदर्शनचीही तशीच अवस्था होताना मी पाहात गेलो. माध्यमांची पारडी हलकी आणि जड होण्याची घटना आयुष्यातल्या चढउतारासारखीच आहे. आज हे माध्यम शिरजोर, तर उद्या ते माध्यम शिरजोर.

पण गेल्या काही वर्षात मात्र रेडिओ हे माध्यम नव्याने उसळी घेऊन पुढे येताना मी बघतोय. भारतातल्या निवडक शहरांतून 'एफ.एम.' ही रेडिओची वाहिनी 'प्रसार भारती'ने सुरू केली आणि या माध्यमाची आजवर कधीही न जाणवलेली शक्तिस्थाने लक्षात येऊ लागली.

प्रगत देशांमध्ये रेडिओ हे माध्यम दूरचित्रवाणी या माध्यमापेक्षा मोठे आहे, हे अनेकांना माहीत नसेल. पण रेडिओचे उपयोग किती अनेकविध प्रकारे लोक करून घेतात, हे जाणून घेण्यासारखे आहे. या देशातले बहुतेक सर्वच लोक कारने प्रवास करत असल्याने वाहतुकीची माहिती, ट्रॅफिक जॅम असलेला रस्ता टाळून दुसऱ्या कोणत्या रस्त्याने जाता येईल याची माहिती, तुम्ही ज्या शहरात राहता त्या शहरातील घडामोडींची बातमीपत्रे, ज्या माणसांना अनुत्साहित वाटत

असेल, डिप्रेशन आले असेल, त्यांना फोनवरून मानसोपचारतज्ज्ञाचा सल्ला देणारे कार्यक्रम - किती किती विविधता सांगता येईल. आजवर रेडिओवरील सर्व निवेदक माईकसमोर काय बोलायचे हे प्रथम लिहून काढत असत. मग तो चित्रपटांची जाहिरात करणारा कार्यक्रम असो किंवा दोन गाण्यांच्यामधील निवेदन असो. पण एफ.एम. वरील निवेदक स्वतःसमोर कुठलाही कागद न ठेवता बोलू लागले. प्रेक्षकांशी फोनवर संवाद साधू लागले. विनोद आणि चुटकुले यांची पेरणी करत गप्पा मारू लागले. नामवंतांच्या मुलाखती घेऊ लागले. निवेदकांवरील सेन्सरशिप जवळजवळ लुप्त झाली. सभ्यतेचे किमान नियम पाळून बोलण्याचे आगळेवेगळे स्वातंत्र्य या निवेदकांना लाभले. या निवेदकांना रेडिओवर कार्यक्रम सादर करण्याचा कोणताही पूर्वानुभव पाठीशी नव्हता हे महत्त्वाचे.

एफ.एम. स्टेशन्स ही केवळ कारने प्रवास करणारे लोकच ऐकत असावेत असा माझा समज होता. पण एफ.एम. वरचे मराठी निवेदक एखादा विषय घेऊन फोनवरून सर्वसामान्य लोकांशी गप्पा मारू लागले. अशाच प्रकारच्या फोन-इन कार्यक्रमातून विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी गप्पा मारत असताना फोन करून माणसे त्यांच्याशीही बोलू लागली. थोडक्यात केवळ उच्चभ्रू किंवा मध्यम वर्गातीलच नव्हे तर चाळीतील, छोट्या छोट्या वस्त्यांमधील, एवढेच नव्हे, तर व्यापारी गाळ्यांत काम करणारे कामगारही फोनवरून रेडिओवरील निवेदकांशी गप्पा मारू लागले.

हिंदी गाण्यांचे कार्यक्रम करणारे निवेदकही अशीच धमाल उडवतात. मुंबईच्या कुठल्या-कुठल्या कोपऱ्यांतून माणसे त्यांच्याशी गप्पा मारतात. कॉलेजमधील पोरे-पोरी थट्टामस्करी आणि प्रसंगी फिरक्या घेतात. एफ.एम. वरच्या निवेदकांनाही काहीसे ग्लॅमर आल्याचे जाणवत आहे.

एफ.एम.वरील प्रसारण म्हणजे कुठलाही अडथळा नसलेले स्वच्छ आवाजातील प्रसारण. जणू काही आपण घरी टेपरेकॉर्डरवर गाणे ऐकतोय तसा सुरेख आवाज ही एफ.एम.ची खासियत अर्थातच बाजी मारून जाते.

रेडिओचे बलस्थान काय ? असा प्रश्न मी मला विचारत जातो तेव्हा हेमा नावाची निवेदिका चित्रा नावाच्या सायकॉलॉजीच्या प्राध्यापकीणबाईशी बोलत असतानाच्या संवादाची मला आठवण होते. या चित्राबाई अगदी अस्खलित हिंदीमध्ये हेमाशी बोलत होत्या. आवाजात मवारी होती- काहीसा खट्याळपणा होता - पण आवाजाची जातकुळी मनावर ठसणारी होती. बोलणे खूपच अभ्यासपूर्ण होते. लहान मुले घरी कशी वाढत असतात हे सांगताना चित्राबाई अचानक आपण पाहतो. या चित्राबाईंचे आडनावही मला समजले नाही. पण त्यांचे बोलणे ऐकताना मी अगदी गुंगून गेलो होतो. मी त्यांना आयुष्यात कधी भेटू शकेन की नाही याची मला काहीच कल्पना नाही. तरीही त्या अनेक पालकांच्या मनातलं बोलताहेत असं मला जाणवलं. मुख्य म्हणजे मी गाडी चालवत चालवत ऐकत होतो. डोळे रस्त्यावर होते. समोरच्या गर्दीतून मार्ग काढण्याचे आदेश मेंदू मोठ्या कुशलतेने माझ्या हातापायांना देत होता; आणि त्याचवेळी माझ्या कर्णेंद्रियांतून चित्राबाईंचे बोलणे ऐकून गुंगून जाण्याचा आनंदही मला देत होता. 'आवाज' या माध्यमाच्या विलक्षण प्रभावाने आनंदित झालो होतो.

आपल्या सभोवतालच्या माध्यमांचे वैविध्य लक्षात घ्या. पुस्तके वाचताना त्यात फक्त डोळे सामील होतात आणि पुस्तकातील घटनांचे चित्र मनामध्ये उभे करण्यात मेंदू गुंगून जातो. मेंदूची कल्पनाशक्ती अफाट वेगाने काम करते आणि वेळप्रसंगी प्रत्यक्षातही उतरू शकणार नाही अशी चित्रमालिका मनःपटलावर उभी करत जाते. रेडिओ ऐकतानादेखील असेच काहीसे होत जाते. कान ऐकत जातात आणि त्या श्रवणाच्या माध्यमातून ज्या घटना, धागे-दोरे, दुवे मेंदूला उमजतात त्यांचे तो चित्र उभे करत जातो. दूरचित्रवाणी किंवा टीव्ही पाहताना, त्याचप्रमाणे चित्रपट पाहताना, मेंदूला चालना मिळण्याची संधीच खुंटते. रेडिमेड किंवा तयार डिश समोर येण्याचा हा प्रकार झाला. डोळे आणि कान हे दोन्ही समोर दिसणाऱ्या चित्रांच्या मालिकेतील संगती लावण्यात गुंतलेली असल्याने मेंदूची क्षमता गोठून जाते. त्यामुळे पुस्तक आणि रेडिओ ही दोन्ही माध्यमे माझ्या मते मानवी कल्पनाशक्तीला विकसित करणारी आहेत. विशेषतः बालवयात, शालेय जीवनात आणि अगदी महाविद्यालयीन काळातही पुस्तके आणि रेडिओ यांसारख्या माध्यमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. रेडिओ हे त्याची महत्त्वा तुम्हाआम्हाला नीटशी न कळलेले एक खूपच प्रभावशाली माध्यम आहे हे निश्चित. माझी सगळी जडणघडण दूरदर्शनच्या सावलीखाली होऊनही मी हे विधान करतोय. तेही अगदी जाणीवपूर्वक. रेडिओचा सुवर्णकाळ भूतकाळात जमा झालेला असला तरी आगामी काही वर्षांत हे माध्यम आपली विजयपताका नव्या जोमाने आणि उत्साहाने फडकवणार याविषयी माझ्या मनात किंचितही संदेह नाही.

# देशातील पहिली मराठी शाळा – भिडे वाड्यात

(प्रथम प्रसिद्धी : अंक २, डिसेंबर २००५)

– **दिलीप वासुदेव भिडे**, पुणे

**आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रांत चमकत आहेत, पण सुमारे १५० वर्षांपूर्वी स्त्रियांची स्थिती काय होती ?... स्त्रियांना शिक्षण म्हणजे अनर्थ असे म्हणणारे अनेक जण स्त्रीशिक्षणास विरोध करीत होते. कै. ज्योतिबा फुले आणि कै. सावित्रीबाई फुले यांनी मात्र या विरोधाला न जुमानता १८४८ साली महिलांसाठी पहिली शाळा सुरू केली आणि एक प्रकारे समस्त स्त्रीवर्गावर अनंत उपकारच केले आहेत. त्यांच्या या कार्याला साथ दिली ती आपले एक बांधव, पुणे येथील कै. तात्यासाहेब भिडे यांनी. यासंबंधीची थोडी माहिती.**

देशातील पहिली मराठी शाळा १८४८ साली सुरू झाली. ती पुण्यातील बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात. तो वाडा कै. तात्यासाहेब भिडे यांचा. म्हणजे एका भिडे कुलोत्पन्नाचा. ही आपणासर्वांना अभिमानाची गोष्ट आहेच, परंतु कै. तात्यासाहेब भिडे यांचा या कार्यात सर्व प्रकारे सक्रिय सहभागही होता. ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे महापाप, स्त्रियांना शिक्षण दिले तर अनेक अनर्थ ओढवतील अशी त्यावेळच्या अनेक लोकांची धारणा होती. त्यामुळे अशा लोकांचा स्त्रियांना शिक्षण देण्याला विरोध होता. या सर्वांचारोष पत्करून कै. ज्योतिराव फुले यांच्या पुढाकाराने आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सहाय्याने कै. तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात महिलांसाठी पहिली शाळा सुरू झाली आणि सावित्रीबाईना पहिली भारतीय महिला शिक्षिका होण्याचा मान मिळाला. १८४८ हे साल स्त्री शिक्षणाच्या चळवळीच्या दृष्टीने जगाच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले. लगेचच १८५१ मध्ये रास्ता पेठेत एक तर दुसरी शाळा १८५२ मध्ये वेताळ पेठेत सुरू झाली.

१८७६ साली कै. गोपाळराव भिडे व त्यांचे सहकारी कै. मोरेश्वर पारधी यांनी नागपुरात आपल्या राहत्या घरात मुलींची शाळा सुरू केली. अनेक लोकांनी आणि नेत्यांनी या उपक्रमास उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे १८७८ साली नागपुरात 'भिडे गर्ल्स एज्युकेशन' या संस्थेची स्थापना झाली आणि सहकारी मदतीशिवाय ही शाळा चालवली गेली.

'महात्मा फुले गौरव ग्रंथ' पान ४४५ वर यासंबंधी दिलेली माहिती अशी..... 'बुधवार वाड्यातील इंग्रजी शिकून लोकहितवादी गोपाळ हरी, सोन्याबापू भांडे, सदाशिवराव गोवंडे, दाजी नगरकर, विष्णू मोरेश्वर भिडे, कुशाबा लिमये ही मंडळी तयार झाली. त्यांचा आणि मुलींच्या शाळेचा प्रत्यक्षाप्रत्क्ष संबंध असे. भिड्यांच्या बुधवार पेठेतील वाड्यातच ही शाळा भरे.' दस्ती नामक एका शाहीराच्या त्यावेळच्या पोवाड्यातील खालील ओळी पहा -

*'ज्योतिबाची ऐका कीर्त। भिड्यांच्या वाड्यांत॥*
*शाळेमधी मुली होत्या बहुत। ब्राह्मण, शेणवी, प्रभू ज्ञात॥*

परदेशगमन, समुद्र उल्लंघन व स्त्रीचे ज्ञानार्जन ही त्या काळातील समाजाच्या मते तीन महापापे होती. असे 'महापाप' केल्यामुळे जसे टिळकांना प्रायश्चित्त घ्यायला लागले तसेच त्या काळात अनेकांना घ्यावे लागले. पण कै. आनंदीबाई जोशी या भारतातील पहिल्या स्त्री डॉक्टर रावबहादूर कै. विष्णू मोरेश्वर भिडे यांच्या घरी राहात असल्याने पर्यायाने श्री. भिडे हे सुद्धा समाजाच्या टीकेचे लक्ष्य झाले. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. आणि आपले कार्य चालूच ठेवले.

१८८४ साली **Sir William Wedemburg** यांनी स्थापन केलेल्या **High School for Indian Girls** या शाळेच्या प्रारंभीच्या कार्यात रावबहादूर विष्णू मोरेश्वर भिडे यांचा महत्त्वाचा सहभाग होता. समाजसुधारकांच्या कामात अग्रेसर असताना स्त्री विकासाच्या अनेक चळवळींत ते सहभागी झाले होते. १९६९ साली मुंबईत वेणुताई परांजपे यांनी श्री. पांडुरंग विनायक करमरकर यांच्याशी पुनर्विवाह केला. त्या काळात हे महापाप ठरत होते. अशा वेळी त्यांच्या लग्नपत्रिकेवर सही करून त्यांनी अशा चळवळींना जाहीर पाठिंबा देणारे कै. रावबहादूर भिडेच होते. त्या काळातील समाजरूढी, काही वेडगळ कल्पना, दुराग्रह यांना प्रखर विरोध करून आपले कार्य चालू ठेवणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते होते, त्यात आपले भिडे कसे आघाडीवर होते याची कल्पना येते. आपल्या सुधारित कुलवृत्ताच्या मुखपृष्ठावर बुधवार पेठेतील भिडे यांचा वाडा, ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले या सामाजिक क्रांतीच्याज जनकांइतकाच महत्त्वाचा आहे, त्याचा फोटो छापावा असा विचार आम्ही करीत आहोत.

# असेही काही समाज कार्यकर्ते भिड्यांमध्ये आहेत....

– स्व. दामोदर भिडे

(प्रथम प्रसिद्धी : अंक ३, फेब्रुवारी २००२)

आजकाल मुंबई, पुणे आणि अन्य मोठ्या शहरांतील अनेक संस्था तसेच काही माणसे सामाजिक क्षेत्रात काहीतरी काम करीत असतात. सामाजिक बांधिलकीची जाणीव सध्याच्या काळात लोकांमध्ये वाढत आहे. आपले भिडे कुलबंधू भगिनी अत्यंत निश्चितच मागे नाहीत. त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती व्हावी म्हणून 'आम्ही भिडे'च्या माध्यमातून अशा व्यक्तींचा गौरव करण्याचा आमचा प्रयत्न राहील. पुणे येथल एक सामाजिक कार्यकर्त्या सौ. माधवी रामचंद्र भिडे यांच्या कार्याचा परिचय आपण 'आम्ही भिडे क्र. १'च्या अंकात दिला गेला होता. या वेळचे सामाजिक कार्यकर्ते आहेत नागपूरचे श्री. धनंजय नारायण भिडे आणि सौ. वसुधा धनंजय भिडे. सौ. वसुधा भिडे या 'वसुधनसृजन' या नावाने वनवासी कामगारांनी बांबूपासून बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी विनामूल्य काम करतात आणि या सर्वांचा लाभ वनवासी बंधूंना व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असतात. स्व. पूजनीय गोळवलकर गुरुजींच्या जन्मशताब्दी कार्यक्रमानिमित्ताने बांबूपासून बनविलेल्या 'शतमाधव मेणबत्ती दीप' या नावाच्या सुमारे चार तास जळणाऱ्या मेणबत्त्या तयार करणे आणि त्याच्या विक्रीचे एक मोठे काम त्या करतात.

स्वतः श्री. धनंजयराव हे रा. स्व. संघाच्या विचारातून प्रेरणा घेऊन संघाच्या स्वदेशी जागरण मंच, अ.भा.वि.प.चे १९८२ ते १९८५ या काळात पूर्णवेळ प्रचारक, नंतर वि. दे. हायस्कूलमध्ये गणित शिक्षक होते. स्वदेशी जागरण मंचचे विदर्भ प्रदेश संयोजक स्वदेशी संघर्ष यात्रेच्या विदर्भातील कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. स्वदेशी जागरण मंचचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य होते. मेळघाट (कुपोषण पीडित विभाग) ग्राम लवाद (जि. अमरावती) तसेच तेथील 'संपूर्ण बांबू केंद्र' या संस्थेचे अध्यक्ष, बांबूला इंजिनिअरींग मटेरियलचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्नशील अशा अनेक कार्यात अग्रेसर आहेत. गुजराथ भूकंपानंतर ६३५ घरे विस्थापितांसाठी बांधण्याचे काम, ............. बांबू कारगिरी शिकवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्नशील, बांधकाम व्यवसायात कार्य, वर्तमानपत्रात सतत लेखन, व्यक्तिगत विकास विषयक शिबिरांचे आयोजन अशा अनेक प्रकल्पांत ते अग्रेसर आहेत.

अशा या सतत सामाजिक कामांचे व्रत घेतल्याल्या श्री. व सौ. भिडे या दोघांना आपण सर्व भिडे कुलबंधूंकडून हार्दिक अभिनंदन, शुभेच्छा व शाब्बासकी देऊया.

***

## एक मोठे व स्तुत्य संशोधन कार्य

– स्व. विद्याकर भिडे

आपल्या भिडे कुलबंधूंपैकी एक सड्ये वृंदावन शाखेचे का. ल. भिडे (सध्या वास्तव्य सोलापूर) यांनी भिडे कुलवृत्ताच्या नवीन आवृत्तीचा सखोल अभ्यास करून एक मोठे संशोधन कार्य केले आहे.

सर्व भिडे मंडळींपैकी शैक्षणिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रांतील एकूण भिडे किती ? त्याची सांख्यिकी माहिती त्यांनी संकलित केली आहे. पदवीधर, पदविकाधारक, अभियांत्रिकी, कला, शास्त्र, वाणिज्य, वैद्यक इत्यादी शाखावार तसेच शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, उद्योजक, शास्त्रज्ञ, न्यायाधीश कोण व किती यांचे संकलन भिडे कुलाच्या सर्वगामी कर्तृत्वाचा सुंदर आलेखच सिद्ध केला आहे. त्यांनी जरी याला 'एक नसता उद्योग' असे म्हटले असले तरी 'हा एक उद्योग त्यांनी केला नसता' तर एकत्रित संकलित माहिती जिज्ञासूंना मिळणे अशक्यच झाले असते. त्यांच्या या 'उद्योगा'ने भिडे कुलबंधूंचे सर्व क्षेत्रातील कर्तृत्व एका दृष्टिक्षेपातच साकार होते. त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

**सर्व जाहिरातदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

# भिड्यांच्या उल्लेखनीय बाबी आपल्याला माहीत आहेत का ?

– **दिलीप वासुदेव भिडे**, पुणे

**(प्रथम प्रसिद्धी : अंक ३,फेब्रुवारी २००९)**

१) १८४८ साली २५७, बुधवार पेठ, पुणे-२ ह्या ठिकाणी तात्यासाहेब भिडे ह्यांच्या वाड्यात सावित्रीबाई आणि जोतिराव फुले ह्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्या भिडे वाड्यातील पहिल्या शाळेच्या पटावर सर्वप्रथम दाखल झालेल्या मुलींची नावे -

१) कु. अन्नपूर्णा जोशी - वय ५ वर्षे, २) कु. सुमती मोकाशी - वय ४ वर्षे, ३) कु. दुर्गा देशमुख - वय ६ वर्षे, ४) कु. माधवी थत्ते - वय ६ वर्षे, ५) कु. सोनू पवार - वय ४ वर्षे, ६) कु. जानी करडिले - वय ५ वर्षे.

२) १८५१ च्या नोव्हेंबरमध्ये सरकारने नेमलेल्या दक्षिणा पारितोषिक समितीने नवे ग्रंथ वा भाषांतरे करणाऱ्यांना एकूण १३०० रुपयांची बक्षिसे दिली. त्या पारितोषिक विजेत्या ग्रंथकारांमध्ये शंकरशास्त्री गोखले, कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि लोकमान्य टिळकांचे वडील गंगाधर रामचंद्र टिळक ह्यांचेबरोबर विष्णू मोरेश्वर भिडे हेही होते.

३) १८६५ मध्ये पुण्याचे नारायण जगन्नाथ भिडे उर्फ नाना भिडे यांनी मुंबईत एका विधवेशी पुनर्विवाह केला. त्याप्रसंगी विष्णू मोरेश्वर भिड्यांनी लोकनिंदेला घाबरणाऱ्या नारायण भिड्यांना कळविले होते की, 'आपण पुनर्विवाह केला आहे याची धैर्याने खात्री द्याल तर मी स्वतः ४० सद्गृहस्थ बरोबर घेऊन तुमच्या पंक्तीला भोजन करेन'. कारण विष्णू मोरेश्वर हे त्या काळी विधवा विवाह चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते.

४) १८७६ साली कै. गोपाळराव भिडे व त्यांचे सहकारी कै. मोरेश्वर पारधी यांनी नागपूरमध्ये आपल्या राहत्या घरात मुलींची शाळा सुरू केली. अनेक लोकांनी व नेत्यांनी या उपक्रमास उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे १८७८ साली 'भिडे गर्ल्स एज्युकेशन' या संस्थेची स्थापना झाली आणि ही शाळा त्या काळी सरकारी मदतीशिवाय चालवली गेली हे विशेष होय.

५) पुण्यातील दै. सकाळ १ जानेवारी, १९३२ रोजी सुरू झाला. परंतु त्याच्या जन्माआधीच 'सकाळ'च्या कामामध्ये लोकांना सहभागी करून घेण्यासाठी स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेतून आलेल्या ४ हजार नावांतून 'सकाळ' हे नाव निवडण्यात आल. हे नाव फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी काशिनाथ लक्ष्मण भिडे याने सुचविलेले होते व त्यासाठी त्याला पहिले बक्षिस देण्यात आले.

---

# धन्य असा पुत्र !

– **विजय अनंत भिडे**, पुणे
मो. ९८३३०४५४६६३

**(प्रथम प्रसिद्धी : अंक १८,जानेवारी २०१४)**

आजकालचा तरुण हा 'करिअर ओरिएन्टेड' आहे. समाजात मिसळून वावरायला तयार नसतो. अर्थात् हा सर्वस्वी त्यांचा दोष आहे असे मी म्हणत नाही. कारण सर्वच बाबतीत समाजात प्रदूषण वाढत आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचं वाढतं वर्चस्व हा ही एक भाग त्यामध्ये आहेच ! पण आहेत, या तरुण वर्गातही काही अपवाद आहेत. माझ्या पुतण्याचा उल्लेख मला आवर्जून करावासा वाटतो. श्री. सुशांत सुनिल भिडे, रा. चिंचवड. जन्म : १३ जानेवारी १९८९. आई-वडील चिन्मय मिशनचे कार्य करीत असल्यामुळे लहापणापासूनच त्याच्यावर कळत नकळत 'चिन्मय मिशन'चे संस्कार होत होते. शालेय जीवनात आदर्श विद्यार्थी, नाट्यस्पर्धा, तबलावादन यामध्ये बक्षिसे अशी चौफेर टोलेबाजी चालू असताना, अचानकवयाच्या १६ व्या वर्षी सुशांतचे पितृछत्र नियतीने क्रूरपणे हिरावून घेतले. २००५ साली श्री. सुनिल गोविंद भिडे यांचा मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघाती मृत्यू झाला. पुढे काय लिहायचे काही सुचत नाही. परंतु माझ्या वहिनींनी श्रीमती सविता भिडेव श्री. व सौ. गोविंद गजानन भिडे (आजी-आजोबा) यांनी या गुणी मुलाचे शिक्षण पूर्ण केले. पुढे येथून बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन ही पदवी प्राप्त केल्यानंतर सुशांत याने टीसीएस या कंपनीत दहा महिने नोकरी केली. एकीकडे चिन्मय मिशनचे कार्य पण चालूच होते. एक दिवस सकाळी मला सविता वहिनींचा फोन आला, सुशांत

पवई (मुंबई) येथील 'चिन्मय मिशन'च्या आश्रमात वेदांताचा कोर्स करण्यासाठी रवाना झाला. हा आमच्यासाठी एक धक्काच होता. प्रत्येक माणसाचे आयुष्य विधात्याने लिहून ठेवलेले असते. त्याप्रमाणे घडत असते. फक्त आपणाला ते नवीन असते कारण सामान्य माणसे त्या ताकदीची नसतात. दोन वर्षांचा वेदांताचा कोर्स पूर्ण केल्यानंतर (इंग्रजी माध्यमातून) ब्रह्मचाऱ्याची दीक्षा घेतली आणि आता संपूर्ण वेळ 'चिन्मय मिशन'च्या कार्याला वाहून घेतले आहे. सध्या खारघर येथील आश्रमात वास्तव्यास असून 'वेद चैतन्य' या नावाने त्यास या वर्तुळात ओळखले जाते. मराठी, हिंदी व इंग्रजी या माध्यमातून तो वेद, उपनिषदे यांचे क्लासेस घेतो व प्रवचने देतो. प्रतिकूल परिस्थितीत भौतिक विश्वाचा मोह न ठेवता, एकुलता एक असूनसुद्धा असा मार्ग निवडायचा ह्याला पूर्वपुण्याई, संस्कार आणि मनोनिग्रह याशिवाय दुसरे काही असूच शकत नाही. शेवटी एवढेच म्हणवेसे वाटते,

'धन्य ते माता-पिता आणि धन्य असा पुत्र !'

---

## पुनर्भेट !

**(प्रथम प्रसिद्धी : अंक ६, जानेवारी २०११)**

**सौ. प्रिया सुनील भिडे,** पुणे-४११००४

चार महिन्यांपूर्वी मला घरच्या फोनवर फोन आला. 'आंटी मै रिमझिम बात कर रही हूँ। आप मणी जैन को जानती है ? मी अवाक्, घाईघाईने म्हणाले, वो तो मेरी फ्रेंड है पर आप ? रिमझिम मणीची भाची, काही महिन्यांपासून पुण्यात शिक्षणाला आली आहे. मणी माझी खास मैत्रीण अमेरिकेला असते, तिने रिमझिमला सांगितले 'मेरी फ्रेंड प्रिया भिडे पूना मे है, उसके पती का नाम सुनील है। तुम उसे ढूंढो'. मी फीजीओथेरपीस्ट असल्याने तिने काही हॉस्पिटलमध्ये चौकशी केली पण माहिती मिळाली नाही. तिने सहजच कॉम्प्युटरवर शोध घेतला आणि आनंदाची गोष्ट म्हणजे तिला 'आम्ही भिडे' वेबसाईट सापडली ! वेबसाईटवर माझा पत्ता व फोन नंबर मिळाला. मणीला तिने पत्ता व ई-मेल ॲड्रेस कळवला आणि आमचा संपर्क झाला. आम्ही ८५ पासून मैत्रिणी, होस्टेलमधे रूमपार्टनर होतो. ४/५ वर्षापासून पत्ते व फोन बदलल्याने संपर्क तुटला होता. विशेष करून वाढदिवसांच्या दिवशी तिची प्रकर्षाने आठवण होत असे. 'आम्ही भिडे' च्या वेबसाईटमुळे आमची पुनर्भेट झाली हे वेबसाईटचे यश आहे. ती तयार करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्यांचे अभिनंदन व आभार.

---

## कौतुक

**(प्रथम प्रसिद्धी : अंक १६, जुलै २०१३)**

**ले. क. सुनील भिडे,** ९६२३०१७४४४

राज्यभरात दुष्काळाच्या झळीची जाणीव फक्त विचारातच नाही तर ती कृतीत आण्याचे काम भिड्यांच्या सुनेने म्हणजे डॉ. सौ. वसुधा विद्याधर भिडे, पुणे यांनी केले. दुष्काळी भागातील टँकरच्या मदतीकरिता त्यांनी आपल्या भागात आवाहन करताच महिलांकडून उत्स्फूर्तपणे मदत मिळाली. दुष्काळग्रस्त वाड्या-वस्त्यांवर टँकर पुरविण्याच्या सहाय्यामध्ये आपणही खारीचा वाटा उचलूया. या दृष्टीने त्यांनी सहकारनगर भागातील महिला संस्थांशी संपर्क साधून मोठा मेळावाही आयोजित केला. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी व जनावरांसाठी चारा किती गरज आहे, हे त्यांनी मेळाव्यात सांगितले. त्यांच्या या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. नुसती हळहळ व्यक्त करण्यापेक्षा आपल्यालासुद्धा कृती करणे आवश्यक आहे, हे सांगितल्यावर अगदी थोड्या कालावधीत एक लाख रुपयांच्यावर निधी जमा झाला आणि जनकल्याण समितीतर्फे टँकर पुरवठा टाक्यांच्या वाटपाच्या कामासाठी हा निधी सुपूर्द केला. यामध्ये राष्ट्रसेविका समितीच्या शाखा किंवा कला क्रीडा केंद्र, प्रबोधन संस्कार केंद्र इत्यादी संस्थांच्या माध्यमातून भरीव मदत मिळाली. ही बाब भिडे परिवारस कौतुकास्पद आहे. वयाच्या ८० व्या वर्षीसुद्धा सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून त्यांनी केलेले काम अभूतपूर्व असून नवीन पिढीने त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी सेच आहे.

***लहरोंसे डरकर नैय्या पार नही होती,***
***कोशिश करनेवालोंकी हार नही होती ।***

# चारमडी (मृत्युंजय) नदीवरील जलविद्युत प्रकल्प... एक यशस्वी भगिरथ प्रयत्न (मुखपृष्ठ कथा)

(प्रथम प्रसिद्धी : अंक ५, डिसेंबर २०१०)

– **नारायण भिडे**, मुंडाजे

अनुवाद - **चिंतामणी भिडे**, ठाणे

**संकल्पनेचा उगम**

दक्षिण कर्नाटकातील नेत्रावती नदीच्या 'चारमडी' या उपनदीवर एक चार मेगा वॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प उभा राहिला आहे. या चारमडी नदीला मुंडाजे गावातील चित्पावन कुटुंबे 'मृत्युंजय' नदी म्हणतात. मुंडाजे गावातील चार भागांमध्ये पसरलेल्या चित्पावन कुटुंबांची शेती व बागायत याच 'मृत्युंजय' नदीच्या पाण्यावर होते. मुंडाजेच्या चित्पावनांची ती जीवनदायिनीच आहे. १९९७ साली अशी एक अफवा उठली की चारमडी नदीचे पाणी अडवून ते मंगळूरकडे वळविण्यात येणार आहे. जागरुक गावकरी पाहणी करण्यास आलेल्या तंत्रज्ञांना ताबडतोब भेटले. तेव्हा असे कळले की नदीवर जलविद्युत प्रकल्प उभारता येईल की नाही यासाठी पाहणी चालली होती. हा प्रकल्प आपणच का उभारू नये, असे आमच्या मनात आले व कायद्याचे ज्ञान आणि घरच्यांचा पाठिंबा यांच्या जोरावर एक पब्लिक लिमिटेड कंपनी स्थापन करून हा प्रकल्प उभारण्याचे आम्ही ठरवले.

**अडथळे -**

१) **शासन** - अशा प्रकारच्या प्रकल्पांना राज्य व केंद्र शासनाची मान्यता लागते. कर्नाटक राज्य शासनाकडून १२ विविध प्रकारच्या मंजुरी घ्याव्या लागतात. त्या प्रत्येक प्रकारच्या मंजुरीची एक-एक स्वतंत्र कहाणी आहे. त्या सर्वांचा इथे उल्लेख करणे शक्य होणार नाही. एक गोष्ट मात्र नक्की की पावला-पावलावर द्याव्या लागणाऱ्या चिरीमिरीसाठी तयारी आणि प्रचंड चिकाटी या गोष्टी असणारेच हे प्रकल्प करू शकतात.

२) **जमीन** - राज्य शासनाकडून मंजुरी मिळाल्यावर पुढला महत्त्वाचा अडथळा होता जमीन मिळविण्याचा. शासनाच्या फलोत्पादन व बागकाम खाते आणि वनखाते या दोन्ही खात्यांनी प्रकल्पाच्या जमिनींवर हक्क सांगितला होता. या दोन्ही खात्यांशी चार वर्षे झगडल्यावर शेवटी भाडे करारावर जमीन देण्याचे दोन्ही खात्यांनी मान्यकेले. त्यासाठी दोन्ही खात्यांकडून स्वतंत्र आदेश घ्यावे लागले. **'Herculean Task'** या इंग्रजी शब्दानेच त्याचे वर्णन करता येईल. वन खात्याच्या मंजुरीकरिता फाईलची केंद्रीय वनखात्याकडे दोनदा पाठवणी झाली व एकदाची जमीन आमच्या ताब्यात आली.

३) **तंत्रज्ञान** - अशा प्रकारचे छोटे जलविद्युत प्रकल्प हे गुंतागुंतीचे व विशेष ज्ञान लागणारे असतात. बऱ्याचदा, शंभरातील नव्याण्णव सल्लागारांकडून फसवणूक होण्याची शक्यता असते. सुरुवातीला आम्हीही काही लाख रुपयांना फसवले गेलो. पण त्यामुळे कठीण मार्गाने का होईना, आमचा तांत्रिक बाजूंचा अभ्यास खूप झाला.

४) **सुरुवातीची कामे** - जमिनीची पाहणी करण्यापासून ते नदीच्या पात्राचे मोजमाप, पावसाच्या प्रमाणाच्या पूर्वीच्या नोंदी, प्रकल्पाची रूपरेषा, पाणी वाहून नेण्याचे काम करणारी प्रणाली, जनित्रांचा आकार व प्रकार इत्यादी महत्त्वाच्या व न टाळता येणाऱ्या पण महत्त्वाच्या गोष्टींचा अभ्यास करावा लागला. तंत्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मलाही खूपकाही शिकायला मिळाले.

५) **अर्थसहाय्य** - अशा प्रकारच्या प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर भांडवल लागते. छोट्या उद्योजकांना झेपणारे हे काम नव्हे. एवढा पैसा आमच्याकडे नव्हता. अशा वेळी अमेरिकेतील एकाकंपनीला प्रकल्पाची संपूर्ण माहिती सादर केली. या माहितीने प्रभावित होऊन त्यांनी आमच्याशी हातमिळवणी केली. माझी संस्थापक संचालकपदी नेमणूक झाली व भांडवलही उभे राहिले. या संपूर्ण प्रकल्पाला सुमारे २८ कोटी एवढा खर्च आला. १८३ दिवसांच्या विक्रमी वेळात २००७-०८ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. वर्षातून साधारणतः ४ ते ६ महिने यातून वीज निर्मिती होते. तालुक्यातील हा पहिलाच प्रकल्प यशस्वी होताच पाठोपाठ छोट्या प्रकल्पांची मालिकाच सुरू झाली. सुदैवाने त्या प्रत्येक प्रकल्पात माझा या ना त्या मार्गाने सहभाग झाला.

**प्रकल्पाचे फायदे** - १) शहराकडे धाव घेणाऱ्यांसाठी एक आदर्श निर्माण झाला. २) वाढत्या विजेच्या मागणीला तोंड देण्यासाठी प्रदूषणमुक्त हरित ऊर्जा प्रकल्प झाला. ३) स्थानिक नैसर्गिक स्त्रोतांचा व स्थानिक मानव संपत्तीचा वापर झाला. ४) स्थानिकांना रोजगार व उद्योगधंद्यांच्या संधी उपलब्ध झाल्या. ५) शेवटचे पण महत्त्वाचे म्हणजे, परिसरात समृद्धी आली.

**भिडे प्रतिष्ठानचे आधारवड कै. दामुकाका भिडे यांनी संघ प्रार्थनाकार न. ना. भिडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या महान कार्याचा उल्लेख करण्याबरोबर संघ प्रार्थना अर्थासह द्यावी अशी मनोमन इच्छा व्यक्त केली होती.** (प्रथम प्रसिद्धी : अंक १३, ऑक्टोबर २०१२)

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दभूमे सुखं वर्धितोऽहम्।
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते॥१॥

हे वत्सल मातृभूमी। मैं तुझे निरंतर प्रणाम करता हूँ। हे हिन्दूभूमि ! तूने ही मुझे सख में बढाया है। हे महामंगलमय पुण्यभूमि तेरे हि कारण मेरीया काया अर्पित हो। तुझे मैं अनन्त बार प्रणाम करता हूँ।

प्रभो शक्तिमान् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरन् त्वान् नमामो वयम्
त्वदीयाय कर्याय बद्धा कटीयम्
शुभामाशिषन् देहि तत्पूर्तये।
अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम्
सुशीलं जगद्येन नम्रं भवेत्
श्रुतं चैव यत् कण्टकाकीर्णमार्गम्
स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत्॥२॥

हे सर्वशक्तिमान परमेश्वर ! हम हिन्दुराष्ट्र के अंगभूत घटक, तुझे आदरपूर्वक प्रणाम करते है। तेरेही कार्य के लिए हमने अपनी कमर कसी है। उसकी पूर्ती के लिए हमें शुभ आशीर्वाद दें। विश्व के लिए अजेय ऐसी शक्ति, सारा जगत् विनम्र हो ऐसा विशुद्ध शील तथा बुद्धिपूर्वक स्वीकृत हमारे कण्टकमय मार्ग को सुगम करें, ऐसा ज्ञान भी हमें दें।

समुत्कर्षनिःश्रेयसस्यैकमुग्रम्
परम् साधनं नाम वीरव्रतम्।
तदन्तस् स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम्।
विजेत्री च नस् संहता कार्यशक्तिर्
विधायास्य धर्मस्य संरक्षणम्
परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्
समर्था भवत्वाशिषा ते भृषम्॥३॥

अभ्युदय सहित निःश्रेयस की प्राप्ति का वीरव्रत नामक जो एकमेव श्रेष्ठ ऊग्र साधन है, उसका हम लोगों के अन्तःकरण में स्फुरण हो। हमारे हृदय में अक्षय तथा तीव्र ध्येयनिष्ठा सदैव जागृत रहे। तेरे आशीर्वाद से हमारी विजयशालिनी संगठित कार्य शक्ति स्वधर्म का रक्षण कर अपने इस राष्ट्र को परम वैभव की स्थिति पर ले जाने में अतिंव समर्थ हो,

॥ भारत माता की जय॥

---

# भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू

(प्रथम प्रसिद्धी : अंक ३०, जानेवारी २०१७)

– **दिलीप भिडे,** सचिव/विश्वस्त, पुणे.
मो. ९६५७५४१२३६

भिडे प्रतिष्ठानची निर्मिती होऊन सुमारे १७ ते १८ वर्षे झाली. पंधरा वर्षांपूर्वी लावलेल्या रोपाचा आता वटवृक्ष झाला. संगणकाच्या युगात नवी दिशा, कार्यकर्त्यांची वृद्धी, कामाचा वाढता पसारा, प्रतिष्ठानच्या पारदर्शक व्यवहारामुळे लोकांशी निर्माण झालेला सुसंवाद, ह्यांमुळे प्रतिष्ठानची वृद्धी होत आहे ह्याबद्दल दुमत नाही. परंतु आजपावेतो मात्र भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू झालेली नाही. सुमारे २ ते ३ वर्षांपूर्वी आम्ही भिडे अंकामध्ये आवाहन केले होते. सध्या गेली अनेक वर्षे पुणे व ठाणे येथील कार्यालयांसाठी अनुक्रमे श्री. शशिकुमार व श्री. चंद्रकांत भिडे ह्या कार्याध्यक्षांच्या औदार्यामुळे प्रतिष्ठान त्यांच्या मालकीच्या जागा विनामूल्य वापरत आहे. ह्याशिवाय प्रतिष्ठानच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकांसाठी सुद्धा नेहमीच मदत करीत असतात त्याबद्दल प्रतिष्ठान त्यांचे ऋणी आहे. परंतु मुद्दा असा आहे की, आपण किती वर्षे त्यांना त्रास द्यायचा ? ह्या दृष्टिकोनातून पुण्यामध्ये मध्यवस्तीच्या ठिकाणी किमान १०० चौ.फुटांची तसेच मुंबई येथे डोंबिवली, ठाणे, कल्याण ह्या उपनगरांत पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर, नाममात्र भाड्याने अथवा कोणी दानशूर भिडे कुलोत्पन्न प्रतिष्ठानकरिता जागेची देणगी देणाऱ्यांनी सुद्धा

विचार करावा. १०० चौ.फुटापेक्षा अधिक मोठी जागा उपलब्ध असेल तर भिडे कुलातील शिकणारे विद्यार्थी/ विद्यार्थिनी किंवा बाहेरगांवहून येणाऱ्या भिडे व्यक्तींची सुद्धा त्या ठिकाणी सोय होईल असा सर्वंकष विचार करून हे आवाहन केले आहे. कार्यालयात कामासाठी येणाऱ्या व्यक्तीला आणि काम करणाऱ्या आमच्या सारख्या कार्यकर्त्याला सुद्धा सोईचे होईल. सुमारे २ ते ३ वर्षांपूर्वी 'आम्ही भिडे'च्या अंकात ह्या संबंधी आवाहन प्रसारित केले होते. परंतु पुन्हा एकदा आपण सर्वांनी ह्याचा विचार करावा असे मला वाटते. २०१८ ला म्हणजे पुढील कुलसंमेलनापर्यंत भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू निर्मिती करायची असा निर्धार करू या.

## शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सुवर्णकन्येचे मनोगत

**(प्रथम प्रसिद्धी : अंक ८, जुलै २०११)**

**कु. मानसी सुहासचंद्र भिडे** (पुणे)

२००८-०९ चा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मला मिळाल्याचे समजले त्यावेळेस खूप आनंद झाला आणि स्केटिंगच्या खेळासाठी जे कष्ट घेतले त्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. गेल्या ५ वर्षात भारततर्फे केलेला राष्ट्रीय उच्चांक, सुवर्ण पदके या मुळे २०१० मध्ये नामांकना नंतर हा पुरस्कार मला मिळेल याबद्दल मला खात्री वाटत होती. हा पुरस्कार मिळण्यामागे माझे कष्ट, मेहनत व जिद्द तर आहेच, या शिवाय माझी आई डॉ. गीता आणि माझे आजोबा श्री. सुधाकर कोकीळ यांनी माझ्या यशापयशाच्या वेळेस दिलेल्या मानसिक आधाराची शिदोरी महत्त्वपूर्ण ठरते. तसेच माझे वडील श्री सुहासचंद्र यांनी मानसिक आधारा बरोबरच खेळासाठी आर्थिक बळही पुरविले. माझे गुरू श्री अशोकराव गुंजाळ यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन, चॅम्पियन स्केटिंग क्लब, सिंबॉयसिस शाळा, फर्गसन् महाविद्यालय या सर्वांनी केलेली मदत व सहकार्य यामुळेच मी या पुरस्काराच्या यशापर्यंत पोहोचू शकले. अजून मला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत देशाचे नांव झळकवायचे आहे. त्याचबरोबर आईस स्केटिंग क्षेत्र सुद्धा खुणावत आहे.

दैदिप्यमान कामगिरीसाठी परिश्रम व मेहनतीबरोबरच यशाचे शिखर गाठण्याची जिद्द असली पाहिजे. प्रामाणिकपणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल केल्यास यश व पुरस्कार आपल्यामागे आपोआपच चालत येतील. त्याकरिता कोणताही शॉर्टकट् न घेता चिकाटीने प्रयत्न करणे ही बाब भावी पिढीला नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

मला मनोगत व्यक्त करण्याची संधी 'आम्ही भिडे ' मधून मिळाली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते. आपल्या सर्वांचे आशीर्वाद आणि परमेश्वराचे पाठबळ सतत राहो हीच प्रार्थना !

## भिडे कुल संमेलने

संकलन :**श्री. दिलीप भिडे,** पुणे.
मो. ९६५७५४१२३६

नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानची स्थापना झाल्यापासून सर्व भिडे मंडळींना एकत्र येण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा एवढेच माध्यम होते.त्यामुळे त्याच दिवशी ज्येष्ठांचा सत्कार व विद्यार्थी गुणगौरव हे कार्यक्रम त्याच्याअंतर्गत एक दिवसाचे होत असत. परंतु २००३ मध्ये झालेल्या ५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून ज्येष्ठ सत्कार व विद्यार्थी गुणगौरव हे कार्यक्रम वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये न घेता भिडे कुल संमेलन हा कार्यक्रम वेगळ्या दिवशी ठेवून त्यामध्ये त्यांचा अंतर्भाव असावा असे ठरले. त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सध्याचे पदाधिकारी श्री. कुमार भिडे ह्यांनी विशेष पुढाकार घेऊन सांगलीचे रविकाका, विवेक, सौ. अंजली भिडे, श्यामराव व विकास ह्या भिडे मंडळींनी उत्स्फूर्तपणे सहभागी

होऊन सांगली येथे २० ऑक्टोबर २००३ रोजी पहिले भिडे संमेलन संपन्न झाले. वास्तविक सांगली येथील संमेलन ४ थे. परंतु वेगळ्या दिवशी परंतु वार्षिक सभेव्यतिरिक्त झालेले हे पहिले भिडे कुल संमेलन. विशेष म्हणजे ह्याच संमेलनामध्ये 'आम्ही भिडे' ह्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले.

भिडे कुल संमेलन तारीख, ठिकाण व अध्यक्ष ह्या बाबतचा इतिहास देण्याचे कारण म्हणजे डोंबिवली भिडे कुल संमेलनात शेवटच्या सत्रामध्ये झालेल्या परस्पर संवाद व चर्चा ह्या कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेल्या भिडे मंडळींना आतापर्यंत झालेल्या कुलसंमेलनांबद्दल माहिती असणे अपेक्षित होते. परंतु उशिरा का होईना ही माहिती आपण प्रसारित करीत आहोत. ह्याबद्दल आपल्याकडे काही आठवणी, प्रतिक्रिया असतील तर त्याचा तपशील 'आम्ही भिडे' अंकात जरूर प्रसारित करू.

| अ.क्र. | वर्ष | ठिकाण | तारीख | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १. | १९९९ | अभिरुची, पुणे, भिडे बाग | १७ जानेवारी | डॉ. सतीश व डॉ. सौ. अश्विनी भिडे, नागपूर |
| २. | २००२ | रत्नागिरी, गुरुकृपा कार्यालय | २१ एप्रिल | श्री. नाना भिडे (योजक), रत्नागिरी |
| ३. | २००२ | पुणे, नू.म.वि.विद्यालय | २० ऑक्टोबर | श्री. मनोहर गोपाळ भिडे, माभळे (अध्यक्ष, बँक ऑफ इंडिया) |
| ४. | २००३ | सांगली, भिडे कार्यालय | ३० नोव्हेंबर | श्री. प्रदीप ज. भिडे, मुंबई (अध्यक्ष, भिडे प्रतिष्ठान) |
| ५. | २००५ | पुणे, तळेगाव दाभाडे | ११ डिसेंबर | डॉ. वि. ग. भिडे (कुलगुरू, पुणे विद्यापीठ), पुणे |
| ६. | २००७ | पुणे, चाफेकर हॉल | २३ डिसेंबर | श्री. श्रीधर गोपळ भिडे, मुंडाजे, कर्नाटक आणि श्री. संजय शंकर भिडे, मुंबई |
| ७. | २००९ | किहीम (अलिबाग), वक्रतुंड बंगला | १ फेब्रुवारी | डॉ. गोविंदराव भिडे, मुंबई |
| ८. | २०१० | गणपतीपुळे, रत्नागिरी | १५ व १६ जानेवारी | डॉ. विवेक भिडे (सरपंच, गणपतीपुळे), रत्नागिरी |
| ९. | २०११ | मुंडाजे, कर्नाटक लक्ष्मी-नारायण मंदिर | १६ जानेवारी | श्री. प्रदीप व डॉ. शीला भिडे, दिल्ली (आय.ए.एस. सनदी अधिकारी) |
| १०. | २०११ | पुणे (चित्पावन) टिळक विद्यापीठ | २५ डिसेंबर | मेजर जनरल संजय वामन भिडे, पुणे |
| ११. | २०१३ | सातारा, हॉटेल सुरूबन | १२-१३ जानेवारी | श्री. दत्तात्रय भिडे, सातारा |
| १२. | २०१४ | डोंबिवली | ४-५ जानेवारी | श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे, मुंबई |
| १३. | २०१५ | संगमेश्वर, रत्नागिरी लक्ष्मी-नारायण | १६-१७ जानेवारी | डॉ. सौ. मधुरा अतुल भिडे, माभळे/पुणे |
| १४. | २०१६ | नाशिक, पिंपळगांव, आशीर्वाद हॉल | २३-२४ जानेवारी | ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक |
| १५. | २०१७ | वनदेवी मंदिर, मुळगांव, गोवा | २१-२२ जानेवारी | श्री. प्रभाकर भिडे, रायबंदर, गोवा |
| १६. | २०१८ | दुर्गादेवी मंदिर, गुहागर | ६-७ जानेवारी | श्री. मनोहरपंत भिडे, माभळे, संगमेश्वर |
| १७. | २०१९ | राजमती भवन, सांगली | १२-१३ जानेवारी | डॉ. सुचेता भिडे-चाफेकर व स्वागताध्यक्ष श्री. चंद्रशेखर भिडे, सांगली |
| १८. | २०२० | गोखले हॉल, पनवेल | ४-५ जानेवारी | श्री. विजय भिडे पनवेल व स्वागताध्यक्ष श्री. मनोहर भिडे |

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !



# श्री. वसंत गंगाधर भिडे

पुष्पांजली सोसायटी, बी विंग, तिसरा मजला,
गांधी चौक, केळकर टॉवरच्यासमोर,
बाजारपेठ, कल्याण (पश्चिम)

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !

## श्री दत्तगुरु ऑटोमोबाईल्स्

सर्व प्रकारच्या कार्सचे सर्व्हिसिंग काळजीपुर्वक व
ओरिजनल स्पेअर पार्टस वापरुन केले जाईल.

- सर्व्हिस अँन्ड डेन्टींग पेटींग
- ओरिजनल स्पेअर पार्टस
- फ्री पिकअप अँन्ड ड्राप
- टेफ्लॉन कोटींग
- इन्टेरिअर क्लिनिंग
- अँन्टी रस्ट कोटींग उपलब्ध
- एसी सर्व्हिस
- इन्शुरन्स रिन्युवल
- जुन्या गाड्यांची खरेदी आणि विक्री

आम्ही गाडी सर्व्हिसिंगसाठी फक्त प्रिमीअम सिंथेटीक ऑईल वापरतो फक्त रु. २९९९/- पासुन पुढे







एसी सर्व्हिस,
इन्शुरन्स रिन्युवल,
जुन्या गाड्यांची खरेदी
आणि विक्री

**श्री दत्तगुरु ऑटोमोबाईल्स्**
यशराज हॉटेलसमोर, पारी कंपनी रोड,
अनुगंगा वॉशिंग सेंटर मागे, धायरी, पुणे - ४११ ०४१.
sandeepbhide38@gmail.com, hdeshmukh6983@gmail.com

- अधिक माहितीसाठी संपर्क -
संदीप भिडे - 9158837156
ऋषिकेश देशमुख - 8983477847

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !

# सौ. अंजली (भिडे) कुलकर्णी

नक्षत्र ज्योतिष अलंकार
आणि मंत्र भास्कर

कॉम्प्युटराईज्ड जन्मकुंडली बनविणे
विवाहविषयक सल्ला आणि कुंडली मिलन
पारंपारिक व कृष्णमूर्ती ज्योतिष शास्त्रामध्ये
भविष्य कथन उपाय योजना व मार्गदर्शन

१२, नारायण निवास, मामलेतदार वाडी,
पथ क्र. ६, मालाड (प), ४०००६४.
**मो. ९००४० ५७१३५**

With Best Comliments From :

# MARS
## TEXTURES

Painting & Textures Contractors

**Ajit Bhide**
**Mo.: 98220 53**231

**Shreekant Ranbhor**
**Mo.: 94**223 09380

Office : Bld. No.2, Flat No. 2,
Daulat Co-op. Soc., Karishma Square,
Karve Road, Pune - 411038

Telefax : 020-25442013
email : marstextures23@rediffmail.com

# कोवळ्या वयात !

– सौ. प्रतिभा जयंत भिडे
मो. ९८३३२८४६९०

ही गोष्ट आहे एका दहा वर्षांच्या शहरी वातावरणातील मुलाची अथर्वची. त्याचे आई-वडील शर्वरी आणि शंतनु हे दोघेही वेल एज्युकेटेड आहेत दोघेही नोकरी करतात. अथर्व त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. त्याचे त्यांच्या दृष्टीने खूप चांगल्या परिस्थितीत संगोपन करण्यात येत आहे. असा त्यांचा तरी दावा आहे. तरीही अथर्व त्यांच्या मनाप्रमाणे वागत नाही असा आरोपही आहे. इतर काही त्याच्या बरोबरच्या मुलांच्या तुलनेत अथर्व मागे पडत आहे. त्यासाठी रोज ओरडा आणि कानउघडणीला तो सामोरा जात असतो. शंतनु, शर्वरी त्याला आपल्या कष्टाचे आणि त्याच्या वागण्याचे तीक्ष्ण वाग्बाण मारून घायाळ करत असतात.

आज शर्वरी रोजच्यापेक्षा अर्धा तास जरा लवकरच घरी आली. दरवाजा बंद होता. तिने बेल वाजवली. घरातून व्हिडिओ गेम आणि त्याच्यात रममाण झालेल्या अथर्वच्या ओरडण्याचा मोठा आवाज बाहेरपर्यंत येत असतो. जाहीर आहे त्याला बेलचा आवाज ऐकू येत नाही. शर्वरी शेवटी आपल्या पर्समधून लॅचची चावी काढून लॅच उघडून आत येते. लगेच व्हिडिओ गेम बंद करते. मोठ्या आवाजात व्हिडिओ गेम चालू होता म्हणून ती अथर्वला ओरडते. तिच्या बोलण्यापेक्षा गेम बंद झाला म्हणून अथर्व पाय आपटत रडतो ओरडतो पण शर्वरी त्यालाच एक धपाटा देते. अथर्व त्या रागातच बेडरूममध्ये जायला वळतो. जाताना 'मला भूक लागलीय काहीतरी खायला दे. मी शाळेतून आल्यापासून काहीच खाल्लं नाहीये' असं सांगतो. आई म्हणते, 'म्हणून काय लोकांना त्रास होईल असं वागशील ? शेजारी तक्रार करतील. आपण सोसायटीत राहतो'. त्यावर अथर्व घुश्शात सांगतो, 'घरात एकट्याने कंटाळा येतो आणि मला एकट्याला भीती पण वाटते. म्हणून मोठ्याने व्हिडिओ गेम लावून आवाज मोठा करतो' असे सांगतो.

आई म्हणते 'आता थांब इथेच खायला हवय ना ? आणि घाबरायचं कशाला ? तू आपल्याच घरात आहेस. तुझ्यासाठी दुकटं कोण तुला सोबत आणणार ? आम्ही तुझ्यासाठीच पैसे कमवायला बाहेर जातो. नोकरी करतो' ची टेप चालू करते. 'चल हात धुवून ये खायला आत्ता मॅगी करून देते' असे सांगते.



त्यावर अथर्व चिडतो. 'रोज मॅगी खाऊन कंटाळा आलाय. आई दुसरे काहीतरी का करत नाहीस गं ?' असं विचारतो. 'अथर्व उद्यापासून नक्की काहीतरी वेगळं करीन हं,' असं सांगून शर्वरी त्याला जवळ घेते आणि समजावते. अथर्वचा रागाचा पाराही उतरतो.

आई आणि अथर्व रात्रीचं जेवण झाल्यावर दोघे बेडरूममध्ये येतात. अथर्वचं डोकं मांडीवर घेऊन शर्वरी त्याला थोपटत असते. अथर्व तिला विचारतो, 'आई, बाबा कधी येणार ? मला बाबांशी बोलायचंय. टीचरचा निरोप सांगायचाय. बाबा रोज उशिरा का येतात गं ? मला भेटतच नाहीत.' त्यावर शर्वरी म्हणते, 'तुला जे काही निरोप सांगायचा असेल ना तो तू मला सांग ना, बाबा आले की मी बाबांना सांगेन.' पण अथर्व मी स्वतः सांगणार आहे असे म्हणतो. बाबांची वाट बघून बघून शेवटी झोपी जातो. शंतनू रात्री उशिरा घरी येतो. तो रागातच असतो. बेडरूममध्ये आल्याबरोबर शर्वरीला सांगतो, 'अथर्व खूपच बेजबाबदार झालाय. गेले तीन दिवस त्याच्या टीचर त्याच्याजवळ आपल्याला भेटायला बोलावल्याचा निरोप देतायत, पण पठ्ठ्याने एकदाही सांगितलं नाही. आता झोपला. त्याला उठवून असा फोडून काढतो म्हणत त्याला उठवायला जातो. मला सर्वांसमोर मान खाली घालावी लागली. टीचरचा ऑफिसमध्ये फोन आला. त्या मला ओरडल्या. मला एकदम इन्सल्टींग वाटलं. त्याला दोन कानाखाली दिल्याशिवाय सुधारायचा नाही' म्हणत पुढे होतो. पण शर्वरी मधे पडते. शंतनुला थांबवते आणि सांगते, गेले तीन दिवस अथर्व तुझी वाट बघतोय पण तूच उशिरा येतोस मग तो काय करेल ? मला म्हणाला टीचरचा निरोप बाबांना द्यायचा आहे पण मला न सांगता तुलाच सांगणार म्हणून हटून बसलाय. तुला उशीर होतो म्हणून तो झोपी जातो. तू त्या निमित्ताने तरी त्याला भेटशील असं त्याला वाटलं असेल. बिचारा ! तू त्याला

कधीच भेटत नाहीस. ऑफिसला जातोस तेव्हा तो उठलेला नसतो आणि येतोस तेव्हा तो झोपलेला असतो. आता असं कर, उद्या रजा घे. आपण दोघेही त्याच्या टीचरला भेटूया. अरे, माझ्यावर सुद्धा अथर्व रागावलाय. मी त्याला कमी मार्क्स बद्दल विचारलं आणि व्हिडिओ गेम मोठा आवाज करून खेळत होता म्हणून ओरडले म्हणून रुसून बसला होता.

अथर्वला घेऊन शर्वरी-शंतनू शाळेत जातात. त्याला वर्गात सोडून टीचरला स्टाफरूममध्ये जाऊन भेटतात. टीचर 'त्याचा अभ्यास खूप कच्चा आहे. परीक्षेत मार्क खूपच पूवर आहेत, शिवाय तो ऐकत नाही, इतर मुलांचे डबे खातो, त्यांना मारतो, चावतो, होमवर्कही करत नाही. अशा तक्रारी करतात. आता त्याचा अभ्यास भरून काढला नाही तर पास कसा होणार तो ? अभ्यासात त्याचे हल्ली लक्षच नसते. त्याचे काही बिनसले आहे का ?' असे विचारतात. टीचर शेवटी त्याच्याकडे जरा लक्ष देण्याचा सल्ला देतात. पण त्याला उत्तमातल्या उत्तम क्लास लावल्याचे शंतनू टीचरला सांगतो. टीचर त्याच्या अपुऱ्या वह्या दोघांना दाखवते.

त्याच्या प्रायव्हेट क्लासच्या टीचरना शंतनू-शर्वरी जाऊन भेटतात. 'तुमचा क्लासचा अथर्वला काहीच उपयोग होत नाहीये. त्याला मार्क्स कमी असतात. तुम्ही त्याचा अभ्यास नीट घेत नाही' असे बोलतात.

त्याचे क्लासचे टीचर एक उत्तम कौन्सिलर असतात. ते आधी शंतनू-शर्वरीच्या सगळ्या तक्रारी ऐकून घेतात. मग त्यांना विचारतात, 'अभ्यासाव्यतिरिक्त अजून अथर्वला कुठे कोणत्या क्लासला पाठवता ? शर्वरी सांगते, 'सकाळी ड्रॉईंगच्या क्लासला रात्री स्वीमींगला आणि शनिवार-रविवारी तबल्याच्या आणि बॅडमिंटनला पाठवतो. सर सात हजार रूपये महिन्याला या साऱ्यावर आम्ही खर्च करतो. केवळ त्याची प्रगती कुठे कमी पडू नये म्हणून. तरी त्याला काहीच त्याची किंमत नाही हो ! तिथेही हा दांड्या मारतो असे म्हणतो.'

सर विचारतात, 'मग स्कॉलरशिपच्या परीक्षेला तरी बसवलाय की नाही ?' शंतनू म्हणतो, 'बसवलं पण तो कसला अभ्यास करतोय ? शाळेचा अभ्यास करणेही त्याला जमत नाही. स्कॉलरशिप काय सोडवणार डोंबल ?' शंतनू त्यांना सांगतो, 'सर तुम्ही उत्तम कौन्सिलर आहात ना, मग अथर्वला समजावा ना ! त्याचेही कौन्सिलिंग करा. मी वाटल्यास त्याचे वेगळे पैसे देईन. हां पण तो मार्गावर आला पाहिजे. फारच विचित्रासारखा वागतो हो.' शर्वरीही त्याच्या हो ला हो म्हणून त्याच्यात सूर मिसळते.

टीचर कपाळाला हात लावतात, हसतात आणि म्हणतात, 'मला अंदाज होताच. आपण काय करता, २४ तास पण पुरे पडणार नाहीत. तुमच्याकडे पैसा आहे म्हणून तुम्ही त्याचं आयुष्य का बिघडवत आहात ? तुमच्या महत्त्वाकांक्षेच्या ओझ्याखाली तो चिरडून मरून जाईल हो. आता तुम्ही सांगा... सांगा ना किती घेता अभ्यास ...?

'टीचर हे अती होतंय. आम्हाला वेळ असता तर तुमच्याकडे कशाला पाठवला असता पैसे भरून क्लासला ?' शंतनू रागाने बोलतो.

टीचर म्हणतात, 'मग तर त्याला तुम्ही एक शब्दही बोलू नका. तो खूपच हुशार आहे असं मला वाटतं. त्याचा खूप अभ्यास चांगलाच आहे. त्याला पन्नास टक्के जरी मार्क्स मिळाले ती तो नव्वदी पार गेला असं समजा.

आता जरा तुमचं बालपण आठवून बघा म्हणजे तुम्हाला त्याची किती वाईट परिस्थिती आहे याचा अंदाज येईल. तुम्ही काय खायचात काय करायचात, किती खेळायचा, आई-वडिलांच्या सान्निध्यात, त्यांच्या सहवासातले क्षण, त्यांची माया, प्रेमाची ऊब आणि प्रदूषण नसलेल्या हेल्दी वातावरणात वाढला असाल ना ? तुमच्या मुलाचं नशीब किती फुटकं आहे बघा. जन्माला आल्यापासून पाळणाघरात वाढला असेल. तीन वर्षांपासून त्याची करिअरच्या नावाखाली डायरेक्ट मिल्ट्रीत भरती. हो की नाही ? तिथंपासून तुमच्या महत्त्वाकांक्षेच्या वाटेवर धावतोय बिचारा. यापेक्षा किती सहनशक्ती ठेवणार जरा विचार करा आणि सांगा. त्याच्या या परिस्थितीला कारणीभूत कोण आहे ते ? तो जिवंत हाडामासाचा जीव आहे, यंत्र नाही. त्याला एक कोवळं मन आहे, त्यालाही काही वाटत असणार, त्यालाही तुमच्याकडून पैशाव्यतिरिक्त काही अपेक्षा असतील की नाही ? त्या कोवळ्या जिवाची ससेहोलपट केल्याबद्दल फटके खरे तर तुम्हाला पडायला हवेत.'

शंतनू-शर्वरीचा पारा एकदम नॉर्मल होतो. दोघेही खजिल होतात. सर पुढे बोलत असतात. 'मान्य आहे, एकाच्या उत्पन्नात भागत नाही. घराचे हप्ते असतात, शाळांच्या फीस, डोनेशन सगळे मान्य आहे. पण या सगळ्यात त्याच्या बालवयात त्याचं बालपण कुठे बसवायचं याचा नीट विचार

**(पान ४३ वर)**

# मनोगत...

– श्रीमती सुमती वामन भिडे,
कर्वेनगर, पुणे ५२. फोन ०२०-२५४४११६१

सर्व प्रथम आपल्या भिडे कुलाच्या 'आम्ही भिडे' ह्या ५० व्या विशेषांकाला सर्व कार्यकर्त्यांना अनेक शुभेच्छा. ह्या सुवर्ण विशेषांकानंतर हिरक आणि शतकपूर्तीचा विशेषांक अनेक वर्षे आणि पिढ्यान्‌पिढ्या सुरू राहू दे आणि पुढील पिढीतील मंडळीसुद्धा सुरू ठेवतील ही माझी सदिच्छा आपल्या पाठीशी सदैव आहे.

मला संगमेश्वर येथे २००५ मध्ये झालेल्या भिडे कुल संमेलनात कला पुरस्कार प्रदान करण्यात आला. परंतु त्यावेळेस माझ्या यजमानांची तब्येत बरी नसल्यामुळे हा पुरस्कार घेण्यासाठी जाता आले नाही. परंतु भिडे प्रतिष्ठानचे तीन पदाधिकारी माझे निवासी येऊन मला सन्मानाने हा पुरस्कार प्रदान केला. आपल्याच भिडे कुटुंबाकडून हा मिळालेला पुरस्कार म्हणजे माझ्या दृष्टीने ही आनंदाची बाब आहे. आजमितीला माझे वय ९२ वर्षे आहे. परंतु लिखाणाची ऊर्मी मात्र कायम आहे. 'आम्ही भिडे' अंकामध्ये माझे लेख व कविता प्रसिद्ध झालेल्या आपण वाचल्या असतीलच. ह्यामध्ये एक वैचारिक नाते निर्माण झाले आहे. नात्यातील नातीगोती, ताणले तरी तुटत नाही आणि जोडले तरी तुटत नाही असे अनेक प्रकारचे लेख प्रसिद्ध झाल्यावर भिडे कुलातील व्यक्ती, नातेवाईक ह्यांचे प्रतिसाद आवर्जून येत असतात. माहेर, ललना, गृहलक्ष्मी अशा अनेक मासिकांसाठी लेखन केले आहे. तसेच लघुकथा, प्रवासवर्णने लिहिली असून अनेक पारितोषिकेसुद्धा मिळाली आहेत. प्रपंच प्रकाशनतर्फे कथासंग्रह, त्यानंतर ताजवा व अक्षरलेणी असे अनेक लेखन माझ्याकडून झाले आहे. लेखनाची आवड जोपासून आजमितीला नव्वदीनंतर सुद्धा लिखाण करत आहे. ह्या लेखनाबरोबरच 'काबुलीवाला' ह्या नाटकाचे हिंदीतून भाषांतर केले. मिळणारी बक्षिसे, पुरस्कार ह्यापेक्षासुद्धा लेखनाच्या माध्यमातून मनाला खूप आनंद मिळतो आहे.

आजपावेतो भिडे प्रतिष्ठानकरिता कार्य करणाऱ्या तसेच जबाबदारी घेऊन निःस्वार्थपणे झोकून काम करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते ह्यांचे बद्दल नेहमीच आदराची भावना आहे. 'आम्ही भिडे' अंक हा कार्याचा एक भाग आहे. त्या दृष्टीने माझ्यासह माझे कुटुंबीय सुद्धा ह्या कार्यामध्ये खारीचा वाटा देत आहेत. कोणतीही संस्था चालवायची म्हणजे मानवी बळाबरोबरच आर्थिक बळसुद्धा लागते. त्यादृष्टीने माझे दिवंगत यजमानांनी व मी देणगी, पुरस्कृत पुरस्कार ह्या माध्यमातून मदत केली आहे. अशा अनेक वेगळ्या प्रकारे ह्या कार्यात हातभार लावत आहोत. भिडे कुलाच्या उन्नतीकरिता आणि प्रगतीसाठी हे सुरू असलेले कार्य असेच पुढे सुरू राहो ही सदिच्छा !



---

**कोवळ्या वयात !** ( पान ४२ वरुन पुढे चालू)

करूनच त्याच्याविषयी तक्रारीचा सूर वाजवायला हवा. त्याचे इतर सगळे क्लास ताबडतोब बंद करा. फक्त त्याची आवड असेल तिथेच पाठवा. आपल्या महत्त्वाकांक्षेच्या ओझ्याखाली त्याला चिरडू नका. शरीर वाढताना मानसिक आरोग्य, शारीरिक व्यायाम या सगळ्याची मुलांना गरज असते. तुम्हाला करता आले नाही म्हणून तुम्ही त्याच्या माथी तुमच्या सगळ्या अपेक्षा काय म्हणून मारता हो ? त्याला त्याच्या मनाप्रमाणे पोषक वातावरणाची गरज आहे. प्रेमाची गरज आहे. तुमच्या पैशांची आणि भरमसाठ क्लासेसची नाही.'

शंतनू-शर्वरी खूपच खजिल होतात. टीचरना सांगतात, 'आम्ही चुकलो. बरं झालं तुम्ही आमचे डोळे उघडलेत. नाहीतर आम्ही आमच्या लाडक्या अथर्वला आमच्या मुलाला मुकलो असतो. व्हेरी व्हेरी थँक्स टू यू. सॉरी फॉर अवर बिग मिस्टेक. सर पुन्हा अशी चूक होणार नाही.'

सरांनी शंतनू आणि शर्वरीला सांगितले, 'तुम्हाला इन्व्हेस्टमेंट करायचीच असेल तर त्याच्या हेल्दी आयुष्यात करा. त्याला हेल्दी आहार आणि विहार मिळू द्या. मग बघा तुमचा अथर्व एक सजग नागरिक होऊन या देशाची धुरा आपल्या तरुण आणि मजबूत खांद्यांवर वाहू शकेल असाच होईल. बेस्ट ऑफ लक, मेनी मेनी विशेस फॉर युवर किड !'

दोघेही निश्चय करूनच घरी येतात.

# क्रीडा गौरवांकित भिडे दाम्पत्य

– सौ. मीना सुभाष पुरोहित–भिडे
कोल्हापूर. मो. ९६२३१००४५२

माझा धाकटा भाऊ कै. गिरीश प्रभाकर भिडे हा एक अष्टपैलू खेळाडू. लहानपणापासूनच त्याला खेळाची आवड. लहानपणी बेलग्रेड (युगोस्लाव्हिया) येथे असतानाच त्याला खेळाची गोडी लागली. तेथे त्याने फुटबॉलचे प्रशिक्षण घेतले. पुण्यात आल्यावर चिल्ड्रेन्स अकादमी या शाळेकडून दोन ज्युनिअर राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा खेळला. त्यात त्याने वैयक्तिक ५५ आणि टीमचे ५७ असे गुण केले. हे अद्यापपर्यंत न मोडले गेलेले रेकॉर्ड आहे. बी.एम.सी.सी. कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर त्याने लॉन टेनिसमध्ये विशेष प्राविण्य मिळविले. पुणे विद्यापीठाकडून त्याने टेनिस, बास्केटबॉल व फुटबॉल या खेळांचे प्रतिनिधित्व केले. एका शैक्षणिक ७४-७५ या वर्षात तीन खेळात निवड होऊन प्रतिनिधित्व केल्यामुळे त्याला स्पेशल गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात आले. तो डिपार्टमेंट ऑफ रेव्हेन्यू, सर्व्हिस टॅक्स मधून असिस्टंट कमिशनर म्हणून निवृत्त झाला. नोकरीत असताना सुद्धा त्याने खेळणे सोडले नाही. त्याने आपल्या खात्यातर्फे अनेक ठिकाणी प्रतिनिधित्व केले.

अशा अष्टपैलू खेळाडूची पत्नी रेखा गिरीश भिडे व माझी वहिनी, हिला नुकतेच जागतिक महिला दिनानिमित्त संवाद, पुणे, सोहन मंगल फौंडेशन आणि कोहिनूर ग्रुपतर्फे 'क्रीडा राज्ञी जीवनगौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. रेखाने वयाच्या १२ व्या वर्षीच हॉकी स्टीक हातात घेतली आणि तिचे आयुष्यच हॉकीमय झाले. ती वयाच्या १५-१६ व्या वर्षी प्रथमच आंतरराष्ट्रीय सामना खेळली. १९७४ च्या हॉकी वर्ल्ड कपमध्ये खेळल्यानंतर तिने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामन्यांत चमकदार कामगिरी केली. भारतीय महिला हॉकी संघाची मॉस्को ऑलिम्पिकमध्ये १९८० साली ती उपकर्णधार होती. तिला १९७८ साली महाराष्ट्र सरकारच्या छत्रपती पुरस्कार व १९७९-८० मध्ये केंद्र सरकारच्या अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानंतर तिने महिला हॉकी महाराष्ट्र संघटना आणि हॉकी



महाराष्ट्राच्या अध्यक्ष, हॉकी इंडियाच्या उपाध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. तसेच राष्ट्रीय हॉकी संघाच्या निवड समितीवरही काम केले. ती ज्युनिअर आशिया कपसाठी भारतीय महिला हॉकी संघाची मॅनेजर होती. हॉकीसाठी प्रशिक्षक होण्यापासून व्यवस्थापनापर्यंत अनेक जबाबदाऱ्या तिने यशस्वीपणे सांभाळल्या. प्रशिक्षणाची आणि तांत्रिक बाजू भक्कम करण्यासाठी आवश्यक आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमही तिने पूर्ण केले. अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूचा मान तिला मिळाला. ती भारतीय सेंट्रल रेल्वे मधून सिनियर स्पोर्टस् ऑफिसर म्हणून आता निवृत्त झाली आहे. रेल्वेमध्ये काम करताना तिने अनेक ठिकाणी स्पर्धेत रेल्वेचे प्रतिनिधित्व केले.

या दाम्पत्याचे थोरले चिरंजीव अलोक लॉन टेनिस खेळाडू असून ते अनेक सामन्यांत खेळले आहेत. सध्या सिंगापूर येथे टेनिस प्रशिक्षण देत आहेत. धाकटे चिरंजीव शोमित क्रिकेट खेळतात. अशा रितीने कै. प्रभाकर रामचंद्र भिडे यांची तिसरी पिढीही खेळात प्राविण्य मिळवित आहे. माझे वडील कै. प्रभाकर रामचंद्र भिडे हे भारतीय सैन्यात होते. ते उत्तम हॉकीपटू म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी आपल्या खात्याकडून अनेक हॉकी स्पर्धांत भाग घेतला होता.



(डावीकडून डॉ. सौ. संध्ये देशपांडे, सौ. स्वाती पोंक्षे, श्री. धनंजव चितळे, डॉ. थत्ते आणि सौ. मृदुला थत्ते (भिडे)

चिपळूणच्या सौ. मृदुला रत्नाकर थत्ते (भिडे) यांनी लिहिलेल्या 'भगवद्गीता मंजुषा' (श्रीमद् भगवद्गीतेचा मराठी पद्यात्मक भावानुवाद) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा चिपळूणच्या लोकमान्य टिळक वाचनालयाच्या बाळशास्त्री जांभेकर सभागृहात प्रख्यात प्रवचनकार आणि संत साहित्याचे अभ्यासक श्री. धनंजय चितळे ह्यांच्या हस्ते झाला. गीतेचे अनेक अभ्यासक आणि गीताप्रेमी याप्रसंगी उपस्थित होते. या पुस्तकाचा सर्वसामान्य मराठी अभ्यासकांना नक्कीच फायदा होईल असा विश्वास वाटतो. अधिक माहितीसाठी ८८३०७३२६०० ह्या क्रमांकावर संपर्क करावा.



## डॉ. सौ. प्रतिभा जयंत भिडे

प्रसिद्ध कवयित्री, लेखिका, नाटककार व गीतकार डॉ. सौ. प्रतिभा जयंत भिडे, ठाणे यांना महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते 'कर्तव्यम प्रेरणा २०२२' हा पुरस्कार राजभवन, मुंबई येथे देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. प्रतिभाताई यांचे मावळते चांदणे, अलवार क्षण, विभ्रम, संधीप्रकाशाची रेघ इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. पौराणिक संगीत नाटके, 'संगीत शिवलीला', 'नो किडस् नो किचन' अशी नाटके तसेच 'ओंबील ललित लेख संग्रह' 'फुलपाखरे आम्ही सारे' बालकविता संग्रह अशी विविध पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याची नोंद घेत त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. भिडे प्रतिष्ठान व परिवाराकडून त्यांना हार्दिक शुभेच्छा.

# हार्दिक अभिनंदन

## श्रीमती रेखा गिरीश भिडे



क्रीडा क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या, आपल्या भिडे कुलातील तसेच पहिल्या भारतीय महिला ऑलिम्पिक हॉकी संघाच्या कर्णधार श्रीमती रेखा गिरीश भिडे, पुणे यांना ८ मार्च, २०२२ रोजी महिला दिनाच्या निमित्ताने 'क्रीडा राज्ञी' जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संवाद, पुणे या संस्थेतर्फे क्रीडा क्षेत्रातील एकूण १६ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. २००५ मध्ये भिडे प्रतिष्ठानच्या कला पुरस्काराने त्यांना तळेगावच्या भिडे संमेलनात गौरविण्यात आले होते. प्रसिद्ध व्हालीबॉलपटू आणि अबकारी खात्यातील माजी आयुक्त स्व. गिरीश भिडे यांच्या त्या पत्नी आहेत.

## सौ. अंजली (भिडे) कुलकर्णी



सौ. अंजली (भिडे) कुलकर्णी, मालाड, मुंबई यांची ब्राह्मण सभा, मालाड कार्यकारिणीवर पुढील तीन वर्षांकरिता बिनविरोध निवड झाली. विशेष म्हणजे ब्राह्मण सभा मालाडच्या कार्यकारिणीवर सलग तिसऱ्यांदा त्यांची निवड झाली. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून सौ. अंजली ह्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !

## श्री. रामचंद्रबुवा भिडे



श्री हरी किर्तनोत्तेजक सभेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ किर्तनकार श्री. रामचंद्रबुवा भिडे यांची निवड झाली. कार्यकारी व पदाधिकारी मंडळाची निवडणूक नुकतीच घेण्यात आली. या संस्थेची स्थापना २५ नोव्हेंबर १८८३ रोजी कै. काशिनाथशास्त्री केमकर यांनी केली होती. किर्तन, प्रवचन, पुराणांचे अध्यापन करुन विद्यार्थी घडविणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून श्री. रामचंद्रबुवा भिडे ह्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !

# मला मिळालेला पुरस्कार

– सौ. संपदा राजेंद्र भिडे,
दादर.

पुरस्कार किंवा बक्षीस म्हटलं की व्यक्ती कितीही मोठी असली तरी आनंद हा होतोच. माझ्यासारख्या भावुक मुलीला तर बाबांनी एक ड्रेस घेतला तरी आकाश ठेंगणे होत असे. तिला आपल्याच भिडे कुटुंबाकडून मिळालेला पुरस्कार हा आयुष्यभर लक्षात राहणारा होता. सांगली संमेलन २०१९ मध्ये मला मिळालेला 'आदर्श कार्यकर्ता पुरस्कार' आयुष्यात कधीही विसरता येणार नाही असा तो क्षण. मी पूर्णपणे भारावून गेले होते. ज्यांच्या मार्गदर्शनाने मी प्रतिष्ठानमद्ये काम करत होते आणि ज्यांचे खूप प्रोत्साहन मिळाले ते सन्माननीय विश्वस्त व्यासपीठावर बसले होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. कुमार भिडे आणि प्रमुख अतिथी डॉ. सुचेता भिडे चापेकर यांच्याकडून मला पुरस्कार मिळाला. कै. दामुकाकांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या सौ. नेहा सातर्डेकर यांनी पुरस्कृत केलेला हा पुरस्कार माझ्यासारख्या वयाने आणि अनुभवाने कमी असलेल्या प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्याला जाहीर झाला ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. ज्यांनी कुलवृत्ताच्या माहिती संकलनासाठी आणि प्रतिष्ठानसाठी स्वतःला अक्षरशः वाहून घेतलं, त्यांनी आखून दिलेल्या वाटेवर मला थोडंसं काम करायची संधी मिळाली हे मी माझे भाग्यच समजते.

२०१३ साली प्रतिष्ठानच्या मुंबई विभागीय संमेलनात श्री. अजय भिडे यांनी मला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करायची संधी दिली आणि मी प्रतिष्ठानशी जोडली गेले. वयाने, शिक्षणाने, अनुभवाने, सामाजिक प्रतिष्ठेने थोर भिडे मंडळींशी ओळख झाली. त्यांचे मार्गदर्शन मिळाले आणि संस्थेचे काम जवळून पाहता आले.

मनोगत व्यक्त करायला सांगितल्यावर काय बोलायचं हे ठरवलं होतं पण स्मित हास्य करीत फोटो काढणाऱ्या माझ्या नवऱ्याला पाहिलं आणि तोंडातून निघणारे शब्द डोळ्यांतून कधी वाहू लागले ते कळलंच नाही. पुढचं काही आठवत नाही पण टाळ्यांचा आवाज ऐकला आणि मी भानावर आले. व्यासपीठावरून खाली उतरायच्या आधीच माझ्या मैत्रिणींनी येऊन अभिनंदनाचा वर्षाव केला. सर्व महिला समिती सदस्यांनी आणि माझ्या मैत्रिणींनी मला कौतुकाने साडी भेट दिली. काय सांगू, एवढा आनंद एकत्र करून ठेवायला माझ्या मनाचा कप्पा छोटा पडू लागला. माझ्या सर्व मैत्रिणींचे धन्यवाद मानायला माझ्याकडे आजही शब्द अपुरे पडत आहेत. वास्तविक मी वाणिज्य शाखेची पदवीधर आहे. सार्वजनिक संस्थांमध्ये कसं काम होतं ते पाहिलं नव्हतं. तसेच कधी सरकारी ऑफिसमध्ये जायची वेळ आली नाही. पण देवाची कृपा असेल तर काय शक्य नाही ? म्हणतात ना, 'मूकं करोति वांचालम् पंगुम लंगयते गिरीम्' आज धर्मादाय आयुक्त कार्यालयात मी प्रतिष्ठानची प्रतिनिधी म्हणून काम करते. ही माझ्यासाठी विशेष बाब आहे. कै. दामुकाकांच्या स्मरणार्थ मिळालेला हा पुरस्कार म्हणजे जबाबदारी सुद्धा आहे. काम पूर्ण होत नाही तोपर्यंत पाठपुरावा करणे, निरपेक्षता, विशाल जनसंपर्क, साधेपणा अशा त्यांच्या दैवी गुणसिंधुमधले काही बिंदू जरी मला जपता आले तरी मी आयुष्यात बरंच काही कमावलं असे वाटेल. हा पुरस्कार आणि माझ्या मैत्रिणींनी मला प्रेमाने दिलेली साडी ह्या सुखद अनुभव देणाऱ्या गोष्टी मी माझ्या मनाच्या तिजोरीत कायमच्या जपून ठेवल्या आहेत.



## नम्र सूचना

ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही, त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे. तसेच एकाच नावाने एकाच पत्त्यावर अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.

**दिलीप भिडे, पुणे** ..................... ९६५७५४१२३६
**ले.क. सुनिल भिडे, पुणे** .............. ९६२३०१७४४४
**प्रशांत भिडे, सातारा** .................. ९४२३०३०५२७
**प्रदीप ज. भिडे, डोंबिवली** ............ ९८९२५०४०४२

# श्री व्याडेश्वर देवाची कथा

संकलन : **ले.क. सुनिल वासुदेव भिडे,**
पुणे. मो. ९६२३०१७४४

श्री व्याडेश्वर माहात्म्य ह्या पोथीप्रमाणे व्याडेश्वराचे पहिले देऊळ १२ व्या शतकात बांधले असावे. मात्र श्री व्याडेश्वर शिवलिंगाची उत्पत्ती फार प्राचीन काळची असून त्याची कथा ह्या श्री व्याडेश्वर माहात्म्य पोथीत आहे. जमदग्नी पुत्र परशुरामाने कोकणभूमीची निर्मिती केल्यानंतर अनेक ऋषीमुनी या भागात येऊन राहिले. त्यापैकी व्याडी ह्या मुनींनी याची स्थापना केली. त्यानंतर श्रीराम व श्रीकृष्ण यांचे अवतार झाल्यानंतर कलियुग सुरू झाले. या कलियुगात शककर्ता शालिवाहन राजा होऊन गेला. या भूमीमध्ये लहान लहान भूभागांवर राज्य करणारे अनेक राजे होते, त्यात गुहांनी युक्त अरण्यातील किल्ल्यात राहणारा कायुराणा नावाचा राजा होऊन गेला. त्याचा मुलगा साकुराणा हा मोठा वीर होता. साकुराणा राजाच्या काळात ह्या व्याडेश्वर शिवलिंगाभोवती सगळीकडे बांबूची बेटे व अरण्य होते व व्याडेश्वराचे अस्तित्व कोणालाही माहीत नव्हते. या व्याडेश्वराच्या शेजारी या राजाच्या घोड्यांचा तबेला होता. काही गाई सुद्धा तेथे ठेवल्या होत्या. यातील तांबूस रंगाची कपिला नावाची गाय रोज विशिष्ट ठिकाणी जाऊन आपला पान्हा सोडत असे. त्यामुळे तिचे दूध निघत नसे, म्हणून तबेल्याच्या अधिकाऱ्याने गायींवर देखरेख ठेवणाऱ्या गुराख्यावर या गाईचे दूध चोरून पितोस असा आरोप केला. मी दूध पित नाही असे त्याने शपथेवर सांगितले. परंतु कोण दूध पिते याचा मी शोध लावतो असे गुराख्याने अधिकाऱ्याला सांगितले. गुराख्याने केलेल्या निरीक्षणानुसार गाय बांबूच्या बेटात एका खडकावर दुधाचा अभिषेक करते हे त्याने पाहिले. त्याला आलेल्या रागामुळे गाईला यथेच्छ बडविले व त्या खडकावरही प्रहार केला. तेव्हा त्यातून आलेले रक्त पाहून गुराखी घाबरला. त्यानंतर ही सर्व घटना गुराख्याने अधिकाऱ्याला आणि अधिकाऱ्याने राजा साकुराणाला सांगितली. राजा सकुराणाने आपल्या सेवकांना त्या खडकाच्या चारही बाजूंनी खणण्याचा हुकूम दिला. खूप खोलवर खणल्यावर सुद्धा पाषाण जरासुद्धा हलला नाही व तेथून अनेक नाग बाहेर येऊ लागले. ह्या बाबतीत सर्व मंत्र्यांसह विचारविनिमय केल्यानंतर हा खडक म्हणजे व्याडमुनींनी स्थापन केलेले शिवलिंग ते हेच असावे. वाड म्हणजे तबेल्याच्या जवळ हे लिंग मिळाले म्हणूनही याचे नाव वाडेश्वर (व्याडेश्वर) ठेवून त्या ठिकाणी सुंदर मंदिर बांधले.

नंतर साकुराणा राजाने आपल्या त्रिकम नावाच्या मंत्र्याला एक मंदिर बांधावे असे सांगितले. तेव्हा खैराचे लाकूड आणून सुताराकडून हे मंदिर बांधण्यास सुरुवात केली. त्यावेळी जाईलाल राजाचा पुत्र जयश्रीराणा हा बुद्धीलदुर्ग (सध्याचे अडूर गावाजवळील बुधल हा भाग) येथे राज्य करीत होता. तो साकुराणाचा मित्र होता. जयश्रीराणाने उत्तम प्रतीची लाकडे बोटीमधून पाठवली. त्या लाकडातून देवळ्या, तोरण, तुळया, दरवाजे, मोठे खांब यांच्या साह्याने मंदिर तयार झाले. या मंदिराचा गाभारा दगडांनी बांधला. तटबंदीकरून चंडेश आणि नंदीकेश यांची स्थापना केलीव त्याच्या बाजूने हनुमान, विष्णू, सूर्य आणि महिषासूरमर्दिनीचीही छोटी मंदिरे बांधली. अभिषेकासाठी दोन विहिरी खणल्या. अनेक ब्राह्मण, वैश्य, शूद्र, क्षत्रिय तसेच मंत्री यांनी देवाच्या पूजेसाठी अनेक उपकरणे व देणग्या प्रदान केल्या. एका कथेप्रमाणे त्याकाळी गुहागरला राणे व अडूर येथे जागकर खाकी हे सरदार होते. त्यांनी हे मंदिर प्रथम बांधले. असे असले तरी कदाचित व्याडेश्वर माहात्म्यात उल्लेख असलेले सांकुराणा व जयश्रीराणा हेच राणे व जागकर खाकी असावेत असे वाटते.

अजून एका कथेप्रमाणे पूर्वी या भागात वाड नावाचे ब्राह्मण राहात होते. त्यांनी ह्या मंदिराची स्थापना केली म्हणून वाडेश्वर नाव पडले. ह्या वाड आडनावातून पुढे बापये, बर्वे, कोल्हटकर ही आडनावे तयार झाली असे म्हणतात. जुने मंदिर असले तरी सध्याचे मंदिर ३०० ते ३५० वर्षांपूर्वीच बांधलेले आहे. परंतु त्याचाही नेमका इतिहास मिळत नाही. असे समजते की ह्या मंदिराचा गाभारा पेठे घराण्यातील एका बाईने बांधला व सभामंडप कोणी परचुरे यांनी बांधला.

पेशवाईच्या काळात श्री व्याडेश्वर देवाला ५ खंडी भात, ८ नारळाच्या झाडांचे उत्पन्न व रु. ५/- दरवर्षी मिळत असत. आदिलशाही काळापासून किंवा त्याही अगोदर श्री व्याडेश्वर देवाच्या येथे होळी साजरी केली जात असे. त्या होळीत ग्रामस्थांचे मानाचे नारळ टाकले जात. असे एकूण १४ नारळ सन १६४३ पर्यंत टाकले जात.

॥ ॐ नमो भगवते श्री व्याडेश्वराय। भूतनाथाय। भूतबाधा नाशय नाशय।

कष्टं चूरय चूरय। मनोबांधितं पूरय पूरय। ॐ ऱ्हीं श्री व्याडेश्वराय नमः॥ ॐ॥

***(सौजन्य – 'देवदर्शन', जि. रत्नागिरी, श्री. व सौ. कुंटे)***

भिडे प्रतिष्ठानचे माजी लेखापरीक्षक श्री. विजयराव रघुनाथ भिडे व त्यांचे बंधू श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे यांनी आपले वडील स्व. रघुनाथ व्यंकटेश आणि आई स्व. मालती रघुनाथ भिडे, ठाणे यांचे स्मरणार्थ भिडे प्रतिष्ठानकडे शैक्षणिक निधी म्हणून विद्यार्थिनींसाठी प्रत्येकी रोख रु. ११,००० असे एकूण २२,००० रुपये दरवर्षी ते देत आहेत. त्यांनी विद्यार्थिनींसाठी पुरस्कृत केलेल्या रकमेतून ही मदत देण्यात आली.

**शैक्षणिक मदत २०२०-२१**

| | |
|---|---|
| १) कु. भाग्यश्री मंदार भिडे, पनवेल | रु. २,००० |
| २) कु. मंजिरी मंदार भिडे, पनवेल | रु. २,००० |
| ३) कु. नियती मंदार भिडे, पनवेल | रु. २,००० |
| ४) कु. अश्विनी अशोक भिडे, पुट्टुर, कर्नाटक | रु. ३,००० |
| ५) कु. चैताली संजय भिडे, सांगली | रु. ३,००० |
| ६) कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली | रु. २,००० |
| ७) कु. आस्था केदार भिडे, पुणे | रु. २,००० |
| ८) कु. प्रणिती अमित फाटक, पुणे | रु. २,००० |
| ९) कु. क्षितिजा गणेश भिडे, पुणे | रु. ४,००० |

**शैक्षणिक मदत २०२१-२२**

| | |
|---|---|
| १) कु. प्रणिती अमित फाटक, पुणे | रु. ४,००० |
| २) कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली | रु. ५,००० |
| ३) कु. क्षितिजा गणेश भिडे, पुणे | रु. १३,००० |



**सावरकर जयंतीनिमित्त माझ्याकडून सावरकरांच्या चरणी शब्दपुष्प**

## महाकवी सावरकरः

भाषाप्रभुः, इतिहासकारः, नाटककारः, महाकवी इति तेषां गुणाः वयं कदापि तेषां गणितुं न शक्नुमः। किन्तु स्वदेशस्य कृते स्वस्य जीवनं तेन कर्पूरम इव ज्वालितम्। यथा वयं देवेभ्यः पुष्पस्य अर्पणम् कुर्मः तथैव सुलभतया, सहजतया, तेन स्वस्य जीवनं एव देशस्य कृते अर्पितम्। तेन काव्यानि न केवलं निर्मितं अपि तु जीवितं। तेन लिखितानि काव्यानि अस्माकं कृते अद्भुतम् उपहारं एव अस्ति, सत्यं खलु ? तेषां तनुवेल् नामक काव्ये सुप्रभातस्य तथा च विविधनां पुष्पाणां मोहकवर्णनं अस्ति।

तेषां वर्णनकौशल्यं अतीव सुन्दरं। यथा उपमा कालिदासस्य तथैव उपमा विनायकस्य इति वयं वक्तुं शक्नुमः। किन्तु ते स्वस्य सुख्यातिः कर्तुं कदापि न इच्छितः।

परित्राणाय साधूनां।
विनाशाय च दुष्कृतां॥
धर्मसौंस्थापनार्थाय।
संभवामि युगे युगे॥

सत्यमार्गेण एव वयं यश प्राप्तुं शक्नुमः। एतत् मार्गे एव सावरकरः अगच्छत्। एतत् पृथिव्यां द्वौ एव महायोद्धाः ये देशसेवा कर्तुं सागरतरणं अकुरुताम् ते नाम भगवान हनुमन्तः तथैव स्वातन्त्रवीर सावरकरः। जीवनस्य अन्तेऽपि तेन आत्मार्पणस्य मार्गम् स्वीकृतं।

तेषां जीवनस्य कृते मम शतशः नमनः !

**– करुणा भिडे, डोंबिवली**

**नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

# एक सत्कार : आनंद आणि दुःख

– चंद्रकांत गोविंद भिडे, मुंबई
फोन : ०२२-२४३८०५६०

एक गोष्ट खरी आहे की कोणालाही त्याच्या ॲपियरन्स वरून काही बोलू नये आणि जज करू नये. (काही सुंदर सुभाषिते आहेत - 'You may judge a flower or a butterfly by its look but not the human being'. 'Never judge a book by its cover'. 'Keep your mouth shut and pen dry until you know the facts'.) एके दिवशी बँकिंग इंडस्ट्रीतील एका मोठ्या असोसिएशनच्या सेक्रेटींचा मला फोन आला. मला म्हणाले, भिडे असोसिएशनचा आज सेमिनार आहे. दोन दिवसांपूर्वी आमच्या कमिटीच्या मिटिंगमध्ये आयत्यावेळी असं ठरलं की बँकिंग इंडस्ट्रीसाठी तुम्ही केलेल्या योगदानाबद्दल तुमचा सन्मान करायचाय तरी तुम्ही आज संध्याकाळी ६ वाजता नक्की या असं म्हणून त्यांनी हॉटेलचे नाव सांगितले आणि म्हणाले दुसऱ्या मजल्यावर हॉलमध्ये सेमिनार आहे. बँकिंग इंडस्ट्रीमधील, १००-१५० टॉप एक्झिक्युटिव्हज् या सेमिनारला येणार आहेत. मी त्यांना म्हटलं, Sir, I will definitely attend the seminar since you are honouring my work. ५.१५ च्या सुमारास तिथे पोहोचलो. सेक्रेटरीची भेट झाली. ते म्हणाले, Good, Chandrakant, I am very happy that you have come. You sit there. After some time somebody will come and he will take you inside. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी एके सोफ्यावर बसलो. पाच/दहा मिनिटांनी आमचे साहेब जे सेमिनारसाठी आले होते त्यांनी मला बसलेला बघितलं आणि माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, भिडे तुम्ही इकडे काय करताय ? मी त्यांना काही सांगणार तेवढ्यात ते म्हणाले इथे कुणाला भेटायला आला असाल तर आत्ता भेटू नका. आज येथे बँकिंग इंडस्ट्रीमधून टॉप एक्झिक्युटिव्हज सेमिनारला येणार आहेत. हे काय असला ड्रेस घालून तुम्ही या मोठ्या हॉटेलमध्ये कसे आलात ? (मी नेहमी ऑफिसमध्ये घालून जायचो तसा फुलशर्ट, पॅन्ट आणि बूट घालून ऑफिसमधून डायरेक्ट गेलो होतो.) त्यानंतर साहेबांनी मला असा झापला आणि माझा उद्धार केला की काही विचारू नका. कुठे कसं जायचं साधे मॅनर्स आईवडिलांनी शिकवले नाहीत वाटतं ? यूसलेस. कोणाला भेटायचं असेल तर नंतर भेटा आणि यापुढे कुठल्या मोठ्या ठिकाणी जायचे असेल तेव्हा माझी परवानगी घेतल्याशिवाय जात जाऊ नका. कळलं ? चला आता निघा. काय बोलणार ? 'Boss is not always right, Boss is Boss.'

मी हॉटेलच्या खाली बाहेर बाजूला उभा राहिलो आणि आता काय करायचं असा विचार करू लागलो. हॉटेलच्या गेटसमोर गाड्या थांबत होत्यो, एक्झिक्युटिव्हज उतरून आत जात होते. ५-७ मिनिटांनी एका गाडीतून आमच्या बँकेचे चेअरमन उतरले. आत जाणार तेवढ्यात मी त्यांना हाक मारली आणि हातानी बोलावले. (माझे आणि साहेबांचे संबंध एकदम चांगले होते.) ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, Yes Mr. Bhide ? मी त्यांना म्हटलं, Sir, there is some problem. त्यांना म्हटलं, Sir, Association is going to felicitate me today in the seminar. Secretary called me today in the morning and invited me to attend this seminar. As per his invitation I am here. I met him also, In between Mr. xyz, my boss from our Bank came to me (then I told our Chairman everything.) ते मला म्हणाले, Mr. Bhide, I am shocked. Wait wait, don't go. I will come within five minutes. पाच मिनिटांनी असोसिएशनच्या सेक्रेटरीला बरोबर घेऊन ते खाली आले. सेक्रेटरी मला म्हणाले, Mr. Bhide, we have invited you. Association is honouring you. Please don't go, असं म्हणून माझा हात धरून मला वर घेऊन गेले. वर गेल्यावर थोड्यावेळाने चेअरमन त्यांच्याबरोबर मला हॉलमध्ये घेऊन गेले. आमच्यासाठी पहिल्या रांगेत जागा ठेवली होती. सेमिनार सुरू व्हायच्या आधी सेक्रेटरी मला आणि चेअरमनना भेटून गेले. जवळजवळ एक तासाभरानंतर सेमिनार कंडक्ट करणाऱ्यांनी अनाऊन्स केलं, Now we are going to felicitate someone who has done outstanding work in the field of Banking. He has compiled about 40 books on various subjects e.g. housing loan, clean loan, gratuity, provident fund, disciplin-

ary action, service conditions of Award Staff as well officers Staff etc. Discipline and Appeal Regulations, Compilation of Indian Banks' Association Personnel Sub-Committee Decisions, Compilation of subject wise Case Laws, maintenance of about 550 subjects wise files. Compiled 8 volumes of Manual of Staff Circulars of Union Bank of India where he is working. Maintenance of all Government of India, Ministry of Finance, Banking Division Circulars issued since 1954, Reserve Bank of India Circulars, IBA Circulars, Union Bank's Staff Circulars, Instructions Circulars which requires regular updating. He is also an Artist. He has drawn many pictures on the manual typewriter. His art is appreciated by Mario Miranda, R.K. Laxman, Behram Contractor (Busybee), Sunil Gavaskar etc. Kamgar Kalyan Mandal, Government of Maharashtra swarded him 'Best Worker' Award. All this I am telling you because he is working in a very humble position as a Typist/Clerk in Union Bank of India in Industrial Relations Department, Head Office. He is a very simple and very nice person. I now request Chairman of Union Bank of India to please bring Mr. Chandrakant Bhide on the stage. असं अनाऊन्स केल्यावर चेअरमनसाहेब मला बरोबर घेऊन स्टेजवर गेले. फुलांचा गुच्छ आणि शाल देऊन माझा सत्कार करण्यात आला. मी माझ्या छोट्या thanks giving भाषणात असोसिएशनचे आभार मानले आणि युनियन बँकेने नेहमी प्रोत्साहन दिल्याबद्दल बँकेला धन्यवाद दिले. नंतर सेक्रेटरीबरोबर स्टेजच्या पाठीमागे गेलो. त्यांना म्हटलं मी निघतो तेव्हा ते म्हणाले, भिडे सेमिनार संपल्यावर डिनर आहे तेव्हा डिनर करून जा. आमचे चेअरमन पण म्हणाले, Bhide have dinner and then go. मी त्यांना म्हटलं, Sir, after so much insult by my boss, I am not in mood, I woun't enjoy, please allow to leave. Please excuse me. असं म्हणून मी तिथून निघालो. जाताना सेक्रेटरींचे सत्कार केल्याबद्दल परत आभार मानले. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ च्या सुमारास चेअरमन ८ व्या मजल्यावर आमच्या डिपार्टमेंटमधे आले आणि माझ्याकडे येऊन बसले. २-३ मिनिटे गप्पच होते. नंतर मला म्हणाले, Chandrakant, forget whatever happened yesterday. मी त्यांना विचारलं, Sir, would you like to have tea ? तेव्हा ते म्हणाले, definitely I will have. असं म्हणून माझ्याबरोबर कॅन्टीनचा ग्लास मधला चहा घेतला. जाताना मला म्हणाले, Chandrakant, today at 1.00 O'clock meet me downstairs we are going out for lunch. o.k ? काय बोलणार ? त्या दिवशी आम्ही रिदम हाऊस जवळील खैबर हॉटेलमध्ये लंच घेतला. आयुष्यातील काही प्रसंग कधीच विसरले जात नाहीत.

## जानेवारी ते मार्च २०२२ देणगीदार

| | | रुपये | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, अंमळनेर | ९०० | आजीव सभासद (भाग) |
| २) | श्री. विजयराव रघुनाथ भिडे, ठाणे | ११,००० | शैक्षणिक देणगी |
| ३) | श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे | ११,००० | शैक्षणिक देणगी |
| ४) | श्री. रवींद्र प्रभाकर भिडे, पुणे | १०,००० | देणगी (मातोश्री स्मरणार्थ) |
| ५) | श्री. विजय विष्णू भिडे, सांगली | १,००० | आजीव सभासद |
| ६) | सौ. सुजाता विजय भिडे, सांगली | १,००० | आजीव सभासद |
| ७) | कु. चैताली संजय भिडे, सांगली | १,००० | आजीव सभासद |
| ८) | श्रीमती दीपाली दिलीप भिडे, पुणे | १,००० | आजीव सभासद |
| ९) | श्रीमती दीपाली दिलीप भिडे, पुणे | १,००० | देणगी |
| १०) | श्री. अश्विन विष्णू भिडे, पुणे | २५,००० | पत्नीच्या स्मरणार्थ शैक्षणिक देणगी |
| ११) | श्री. उमेश अरुण भिडे, ठाणे | ५३,००० | हितचिंतक : आई-वडीलांच्या ५३व्या वाढदिवसानिमित्त |

# धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना

– **प्रो. जयराम भिडे,** सोलापूर.
मो. ८६६८६१२७५२

ऋतू कोणताही ही असो पहाटेचे फिरणे मी शक्यतो चुकवत नाही. सध्याच्या वाढलेल्या थंडीत नेहमी फिरण्यास येणारा मित्र परिवार आता कमी झाला आहे. त्यामुळे एकटाच फिरण्याचा आनंद घेत निघालो होतो. वातावरणात सगळीकडे एक निरव शांतता होती. या शांततेत झाडे, पक्षी आणि प्राणी धुक्याची दुलई ओढून शांतपणे निसर्गाच्या कुशीत झोपले होते आणि माझ्यासारखा एखादा चालत होता निसर्गाच्या सान्निध्यात. याच विचारात फिरत असताना झाडावर बहरणाऱ्या झाडांच्या कळ्या, फुले वसंत ऋतुच्या आगमनाची जाणीव करून देत होती. हे सर्व पाहात असताना आपसुकच मनातले शब्द ओठांवरती आले 'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना...' या गीताचे शब्द मला कॉलेज जीवनात असताना झालेल्या सांस्कृतिक संस्काराची आठवण करून देत होते. त्या काळी कविवर्य जगदीश खेबुडकर 'गावरान मेवा' हा कार्यक्रम सादर करायचे. त्यांच्या चित्रपटसृष्टीच्या अनुभवांवर आधारित कार्यक्रम होता. यात ते या गाण्याचा किस्सा सांगत. हे गाणे आदरणीय बाबुजी श्री. सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केले आहे. श्री. खेबुडकर पन्हाळ्यावर असताना बाबुजींचा त्यांना फोन आला आणि बाबुजींनी सांगितले मी एक चाल तयार केली आहे. या चालीवर गीत लिहून द्या. साधरणपणे गीत आधी लिहिले जाते आणि त्यास नंतर संगीतकार चाल लावतात. इथे उलटा प्रकार होता. आधी चाल आणि नंतर गीत. बाबुजींनी फोन वरूनच त्यांना चाल 'ड' च्या भाषेत सांगितली आणि प्रत्येक शब्दांत किती अक्षरे असावीत याचे बंधन घातले.

डाडा डडाडा डाडा डडाडा
२ ३ २ ३

इतक्या अटी आणि शर्ती असल्या तरी पन्हाळ्याचा रम्य परिसर आणि कवीची प्रतिभा यातून एक द्वंद्व गीत जन्माला आले.

धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना
२ ३ २ ३

शब्दरूप आले मुक्या भावनांना

तुझ्या जीवनी नीतीची जाग आली
माळरानी या प्रीतीची बाग आली
सुटे आज माझ्या सुखाचा उखाणा

तुझा शब्द की थेंब हा अमृताचा
तुझा स्पर्श की हात हा चांदण्यांचा
उगा लाजण्याचा किती हा बहाणा

चिरंजीव होई कथा मीलनाची
तृषा वाढते तृप्त या लोचनांची
युगांचे मिळावे रूप या क्षणांना

जुन्या द्वंद्व गीताचे चित्रीकरण आजच्या कोरोना काळातील 'दो गज की दुरी'... हा नियम कटाक्षाने पाळून होत असे. दो गज अंतर बरोबर आहे का ? हे मोजण्याकरता नायक अधूनमधून नायिकेचा पदर धरत अंतर मोजे नाहीतर झाडाला धरून तू या झाडाला मी त्या झाडाला म्हणत योग्य अंतर राखत. हा विनोदाचा भाग सोडला तर हे गीत समजण्याकरता चित्रपटाची कथा समजून घेणे गरजेचे. 'धाकटी बहीण' या चित्रपटात वाईट मार्गास लागलेल्या नायकास सुधारण्याचे आव्हान नायिका स्वीकारते. त्यात यशस्वी होते आणि हे सर्व घडत असताना ते एकमेकांच्या प्रेमात पडतात. या गीताचे रसग्रहण करण्याइतका मी मोठा नाही पण या गीताविषयी माझ्या भावना व्यक्त करत आहे. गीतातून चित्रपटाची कथाच उलगडते.

'तुझ्या जीवनी नीतीची जाग आली
माळरानी या प्रीतीची बाग आली
सुटे आज माझ्या सुखाचा उखाणा'

वाम मार्गास लागलेला नायक योग्य मार्गावर येत आहे... हे या कडव्यात 'नीती' हा शब्द वापरून सहजपणे सांगितले आहे आणि हे सर्व घडत असताना त्यांचे प्रेम फुलत आहे...

'प्रीतीची बाग आली' या चपखल शब्दांत व्यक्त केले आहे.

शेवटी प्रेम म्हणजे तरी काय असतं ?

नजरेने नजरेला कळतं ते प्रेम
स्पर्शाने जाणवते, फुलते ते प्रेम
शब्दा शब्दांत व्यक्त होते ते प्रेम

हेच भाव पुढील कडव्यात खेबुडकरांनी दोनच ओळीत व्यक्त केले आहे.

‘तुझा शब्द की थेंब हा अमृताचा
तुझा स्पर्श की हात हा चांदण्यांचा’

तर असे हळुवार अमृतासम प्रेम ज्यांना लाभेल ते प्रेमी आणि त्यांचं प्रेम अजरामर होणारच. म्हणून कवी शेवटच्या कडव्याची सुरुवात करताना म्हणतात

‘चिरंजीव होई कथा मीलनाची’

**सन २००८ साली प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या कुलवृत्तांताची एक प्रत ५०० रुपये.**
**संपर्क**
**ले.क. सुनिल वा. भिडे, ९६२३०१७४४४**
**किंवा माधव भिडे ९७६३७२७६८८**

## माध्यम

जमते जे जे काही, ठरवून जरूर करावे,
अनुभव आपुले, इतरांना प्रेरणा ठरावे
सहज होईल तेवढी, करावी मानव सेवा,
जन्मून एवढे करावे, हाच हो ठेवा
जरा नेमके बोलून पाहू, कष्टही येथे,
विचारास चालना मिळे, अन मन पालटते,
तुमचा एक विचारही बदले दृष्टी कुणाची
केवळ माध्यम तुम्ही इच्छा भगवंताची.
असेच जोडून सारे विश्वच एक करूया
पीडा कुणाची कळली तर हो जरा धावूया
हे मोलाचे ठरते, मदतही अल्पच पाही,
मार्ग सापडे कुणा, तुम्हा मिळे पुण्याई
समाधान व्हावे ऐसी सारी करून कर्मे
सहजपणे जे साधे, ते ते करूच नेमे,
शक्ती बुद्धी देईलच, गुरुराजा पाठी,
उंच उभारू नवी ध्वजा ही विजयासाठी !

**– हेमंत भिडे,** जळगाव

**Shama Bhide**
Direct: +91-99207 64824
Email: **shama.bhide@travelkarholidays.com**

# Travelkar Holidays

**कुटुंब आणि लहान मुलांसमवेत उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी रोमांचक स्थळी जाण्यासाठी सज्ज व्हा...!**
**इंटरनॅशनल आणि डोमेस्टिक हॉलिडे टूर्स, कॉर्पोरेट डेस्टिनेशन इव्हेंटस्, फॅमिली कस्टमाईज्ड टूर्स,**
**लक्झरी हॉटेल्स आणि रिसॉर्टस्, सर्वोत्तम भाडे, आंतरराष्ट्रीय क्रूझ आणि व्हिसा साहाय्य यावर ऑफर.**



डोमेस्टिक हॉलिडे टूर्स



इंटरनॅशनल हॉलिडे टूर्स

# गिरनार दर्शन : आनंद निधान

**– सौ. अनघा (भिडे) सातर्डेकर,**
पुणे. मो. ९००४०७८४३३

गेल्या वर्षी म्हणजे २०२० च्या जानेवारीत चतुरंग मधील काही मित्र मंडळींनी गिरनार दर्शन यात्रेचा प्रस्ताव ठेवला. आमच्या नवरोबांनी 'गिरनार कुठे आहे आणि हे काय असतं ?' या पहिल्याच प्रश्नात स्वतःची विकेट स्वतःच काढून माझ्या हातात दिली. मग गिरनारची थोडक्यात माहिती देऊन जाता येईल का अशी शक्यता चाचपणी सुरू झाली. चतुरंगमधील काही बुजुर्ग मंडळी आणि काही तरुण हरहुन्नरी मित्र जाणार आहेत असे कळल्यावर आहोंनी लगेच रुकार भरला आणि मी जातोय, तुझं काय ? असा सवाल केला. माझं जाणं लेकाच्या बारावीच्या प्रिलिम्समुळे जरा अवघड वाटत होतं. इच्छा तर होती पण तरीही मन पटकन तयार होत नव्हतं,मी म्हटलं, 'श्री गुरुदेवदत्तांनी तुला बोलावलंय तेव्हा नक्की जाऊन ये, मला अजून बोलावणं आलं नाहीये म्हणून माझं मन काही रेटत नाहीये. ३-४ महिने आधी तयारी सुरू झाली, बुकिंग्स झाली, १० हजार पायऱ्या चढायच्या दृष्टीने मानसिक आणि शारीरिक तयारी झाली आणि तब्बल २१ जणांची गिरनार यात्रा 'श्रीगुरुदत्ताच्या आशीर्वादाने सुफळ संपूर्ण झाली. त्यांची यात्रा झाल्यावर त्यांचे फोटो, अनुभव कथन, प्रवासातली उत्कंठा, १० हजार पायऱ्या चढताना लागणारा कस, रोमहर्षक अनुभव हे सगळं ऐकून मी खूप मोठं आणि सुंदर काहीतरी मिस केलंय ही जाणीव मला खट्टू करून गेली.

पुढे २ महिन्यात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला आणि प्रवास, पर्यटन या गोष्टी असाध्य होऊन बसल्या. यावर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये चतुरंगच्या काळेकाकूंनी पुन्हा गिरनार यात्रा करायचा मानस बोलून दाखवला आणि गेल्या वर्षी ज्यांना इच्छा असून जमलं नाही त्यांनी विचार करा असा निरोप दिला. झालं, माझं विचारचक्र पुन्हा सुरू झालं. कधी, कसं, कुठल्या महिन्यात जाणं सोयीचं, कमी जोखमीचं असा सगळा विचार सुरू असताना पुन्हा एकदा कोरोनाने घेरलं आणि गिरनार यात्रेचे विचार धुरासारखे विरून गेले. पुन्हा एकवार सगळी अनिश्चितता आणि असुरक्षितता दाटून आली आणि गिरनार वारी काही घडत नाही असं जाणवून गप्प गुमान बसले.

पण म्हणतात ना, 'गिरनार दर्शनाचा योग'च यावा लागतो तसं काहीसं झालं. दुसऱ्या लॉकडाऊन नंतर लसीकरण मोहीम, पुनश्च हरिओम म्हणत सगळं हळूहळू पूर्ववत होऊ लागलं आणि पुन्हा एकदा काळेकाकूंना गुरू आज्ञा झाली. 'चलो गिरनार' त्यांचा फोन आला. जायचं का दिवाळीच्या आधी किंवा नंतर ? नंतर म्हणजे कार्तिकी/त्रिपुरारी पौर्णिमेला गर्दी होऊ शकेल तर ऑक्टोबर मध्येच का नको ? पण पुन्हा एकदा माझं जाणं होणार की नाही असं वाटू लागलं. माझ्या एका ऑनलाईन कोर्समुळे वीकएंड बिझी झाल्याने त्यांना म्हटलं काकू, सुट्टी घेऊन जाणं मला जास्त सोयीचे म्हणजे वीकएंडचा कोर्स अटेंड करता येईल. त्यांनी अजून कोण मेंबर यायला उत्सुक आहेत, त्यांना वर्किंग डे चालेल का ? तिकिटे उपलब्ध आहेत का अशी सगळी चाचपणी करून लगेच आमचं इच्छुकांचं ट्रेन बुकिंग सुद्धा करून टाकलं. अशा प्रकारे शेवटी आपला गिरनार दर्शनचा योग जुळून येतोय ही खात्री पटली. तिकिटे बुक झाली तेव्हा लक्षात आलं अवघ्या एक महिन्याच्या आत आपली यात्रा होणार आहे तेव्हा तयारी करणं गरजेचं आहे. नाही नाही म्हणता आठ जणांचा ग्रुप तयार झाला, बाकी सामान काय न्यावं, खाण्याचे पदार्थ, राहायची सोय, तिकिटे अशा सगळ्या गोष्टी व्हॉटस्अप ग्रुपने सोप्या केल्याच होत्या.

'अहोंनी' आता माझा सराव घ्यायला सुरुवात केली. रोज सकाळी ६.३० ते ८ मध्ये घराजवळची एक छोटी टेकडी चढून २ कि.मी. चालून पुन्हा म्हातोबा टेकडी चढायची असा दिनक्रम सुरू केला. कितीही दमले असले, झोप उघडत नसली तरीही मला उठवून न्यायचंच हा चंग त्यांनी बांधला होता. त्यामुळे मी सुद्धा आव्हान स्वीकारल्यासारखी झपाटून उठून जात होते. संध्याकाळी पुन्हा पाऊण तास चालायची प्रॅक्टिस म्हणजे एकूण किमान ७-८ किमी., १० हजार पावलं चालायचा सराव न चुकता सलग २ आठवडे केला. जायच्या आधी शेवटचे चार दिवस 'नी-कॅप' लावून चढायची/उतरायची सवय केली. बघता बघता जायचा दिवस उजाडला. पुण्याहून मुंबई कॅबने आणि बांद्रा टर्मिनस वरून वेरावळ

एक्सप्रेसने प्रवास करून दुसऱ्या दिवशी पहाटे ५.३० ला जुनागडला पोचलो. हॉटेलला पोचून अंघोळ, नाश्ता उरकून आम्ही गिरनार दर्शनाला निघालो. पहिल्या पाच हजार पायऱ्यांपर्यंत आता रोप-वे अर्थात केबल कारची सेवा सुरू झालेलीआहे. एका कारमध्ये एकूण आठ माणसे बसू शकतात एवढी प्रशस्त असते. एका माणसाचं जाऊन येऊन रु. ७००/- मात्र तिकीट आहे.

आमच्यासकट आमच्या जवळचं बॅगेज स्कॅनिंग झालं आणि आमच्या जवळच्या बिसलेरी पाण्याच्या बाटल्या काढून टाकल्या गेल्या. कारण एकच की वर डोंगरावर प्लास्टीक कचरा होऊ नये म्हणून. पण पुढे गेल्यावर कळलं की इथल्या कॅफेटेरीयामधून पाणी/बिसलेरी विकत घेतलं जावं ही त्यामागची छुपी अपेक्षा आहे. अहोंच्या आणि इतरांच्या अनुभवातून कळल्याप्रमाणे कमीतकमी वजन पाठीवर घेऊन जावं जेणेकरून वर चढताना त्रास होणार नाही. म्हणून आम्ही घरची पाण्याची छोटी बाटली, एक छोटा टॉवेल, वेट टिश्यूज, थोडा पोटाला मानवेल असा हलका खाऊ आणि लिम्लेट, ऑरेंज, मँगो बाईटच्या गोळ्या असं सगळं घशाला कोरड पडू नये म्हणून घेतलं होतं.

जरी रोप-वे मुळे अर्धा टप्पा सहज पार झाला असला तरीही वरच्या पाच हजार पायऱ्या कस लागणाऱ्या होत्या. आम्ही साधारण ९.१५ ला रोप-वे मध्ये बसून अवघ्या १०-१२ मिनिटात वर अंबामाता मंदिराजवळ पोचलो. गिरनारच्या पायथ्याशी आपल्याला चढायला मदत होईल म्हणून काठ्या मिळतात जिच्या आधाराने वर चढणं सोपं होतं. प्रत्येकाला पेलवेल अशी काठी निवडून आम्ही जिथून पायऱ्या सुरू होत होत्या तिथे आलो. पहिल्या पायरीची पूजा करून श्री गुरुदेवदत्तांना आम्हाला सुखरूप वर घेऊन जायची प्रार्थना केली. असं म्हणतात की एक एक पायरी सर करून जाताना तुमच्या षड्‌रिपूंना प्रेम, मोह, क्रोध, लोभ, मद, मत्सर यांना खाली ठेवून श्रीगुरुदेवदत्तांना शरण जावं. भल्याभल्यांना गिरनार चढणं शक्य होत नाही असं ऐकलंय पण म्हणून आपण माज न करता, स्वतःपेक्षा दत्तगुरुंवर विश्वास ठेवून चढायचा प्रयत्न करावा. हा विचार मनात ठेवून नामस्मरण करत चढाई सुरू केली. खरं तर चढाई म्हणता येणार नाही कारण गोरक्षनाथ मंदिरापासून पुढे जवळपास दीड दोन हजार पायऱ्या आधी उतरून एक डोंगर पार करावा लागतो. मग पुढे अडीच तीन हजार पायऱ्यांचा चढा टप्पा पार करून अजून एक डोंगर चढून मग गुरुशिखराचा सुळका चढायचा असतो. त्यामुळे थोडंसं चढून मग बऱ्याच पायऱ्या उतरून जायच्या असल्याने आपोआप थोडा वेग येत गेला. आता कमंडलू कुंड जे उजव्या हाताला थोडं खाली उतरून जावं लागतं त्या कमानीपाशी आम्ही पोचलो आणि पुढे चढणीचा एक अवघड टप्पा सुरू झाला. पुढच्या सगळ्या पायऱ्या नागमोडी वळणं घेत अगदी उंच उभ्या होत होत्या. पुढे पुढे जाताना एका वेगळ्याच ध्यासाने पछाडल्यासारखे आम्ही एक डोंगर उतरून पुढचा चढू लागलो. एकीकडे काठीने स्वतःचा तोल सांभाळत, चढताना सभोवार पसरलेल्या विस्तीर्ण डोंगररांगा बघताना स्वतःची खुजेपणाची तीव्र जाणीव होते. आणि मग सरळ वर बघूनही दृष्टीस न पडणाऱ्या परंतु अत्युच्च गुरुशिखरावर विराजमान झालेल्या श्रीदत्तगुरुंच्या दर्शनाची ओढ खुणावत आपल्याला अलगद वर ओढून नेते. साधारण दीड दोन तासात म्हणजे अकराच्या सुमारास आम्ही शिखरावर पोचलो आणि समोर साक्षात परब्रह्म असतानाही डोळ्यांना अखंड धार लागावी आणि सगळं धूसर होऊन दिसेनासं व्हावं तसं काहीसं झालं. आपण खरोखर वर पोचलोय का की एक स्वप्न बघतोय इतका अविश्वास वाटावा आणि सरळ त्याच्या पायाशी लोटांगण घालून नतमस्तक व्हावं. गुरुशिखरावर उमटलेली दत्तगुरुंची पावले आता गंधाच्या बोटांनी ठसठशीत रेखाटली आहेत आणि मागे त्रिमूर्ती दत्ताची लोभसवाणी हसरी मूर्ती - आपलं लक्ष खिळवून ठेवणारी. आपली नजर ठरत नाही आणि चढताना झालेल्या श्रमांनी घामेजल्या चेहऱ्यावर फुललेलं आत्यंतिक समाधान जाणवून एकदम शांत निर्विकार होतो. कोणतीही उत्कंठा, आसक्ती उरत नाही, कसलेच विचार येत नाहीत आणि झालेल्या प्रवासाचा शीण जाणवत नाही.चढण्याचे कष्ट जाणवत नाहीत की काही मागायची सुद्धा आठवण होत नाही. सगळ्या जाणिवा पुसट व्हाव्यात आणि काया-वाचा-मने नितळ, कोऱ्या झालेल्या आपल्याला एका वेगळ्याच विश्वात गेल्याचा आभास निर्माण होतो. तिथल्या हवेत, वातावरणात अत्यंत सकारात्मक स्पंदन लहरी आहेत, पादुकांची आणि मूर्तीची आभा, तिथलं अदृश्य तेजोमय वलय तिथे एक वेगळीच ऊर्जा निर्माण करतं. असं म्हणतात की

आपल्या जवळची एखादी पोथी, धर्मग्रंथ, नवीन अंगठी अशा वस्तू दत्तगुरूंच्या चरणी अर्पून त्यांचा आशीर्वाद घेऊन यावा. आमची गिरनार वारी ज्यांच्यामुळे साध्य झाली त्या काळेकाकूंनी दत्तगुरूंसाठी स्वतः हाताने विणलेली लोकरीची केशरी शाल आणली होती ती अर्पण केली. आपल्याला जे वाटेल, रुचेल ते यथाशक्ती यथामती तिथे अर्पण करावं, गुरुंच्या चरणी लीन व्हावं आणि फक्त आणि फक्त समाधान आणि असीमित ऊर्जा घेऊन परत यावं इतकंच !!

खरं तर आपण काहीच करत नसतो - जे काही घडतं ते त्यांच्या आज्ञेने आणि आशर्वादाने म्हणूनच त्यांची आज्ञा होणं महत्त्वाचं आणि ती झाली की मग कसलीच अडचण उद्भवत नाही याचा साक्षात अनुभव घेणं म्हणजे गिरनार दर्शन ! आम्ही दर्शन घेतलं तो दिवस गुरुवार आणि गुरुपुष्यामृत योग असल्याने 'अजि म्या धन्य जाहले' अशी सगळ्यांची अवस्था होती. असं असूनही गर्दी नव्हती आणि म्हणून शांतपणे वेळ घेऊन दर्शन झालं. त्या अपूर्व समाधानाने तृप्त झालेलो आम्ही काही वेळ पायऱ्यांवर विसावलो. गुरुशिखर गाठण्याचे ध्येय समोर असल्याने आमची तहानभूक हरपली होती आणि जेव्हा थोडे सैलावलो तेव्हा भुकेची तहानेची जाणीव झाली. थोडे भूक लाडू तहानलाडू खाऊन आम्ही उतरायला सुरुवात केली. येताना 'कमंडलू कुंड' येथे प्रसादाचा लाभ घेऊन पुढे जावं असं ठरल्याने भराभर उतरून तिथवर पोचलो. 'कमंडलू कुंड' येथे दर सोमवारी पहाटे अखंड धुनी प्रज्वलित होते पण आम्ही गेलो तो गुरुवार असल्याने धुनी दर्शन होणार नव्हते. तुलनेने गर्दी कमी होती आणि आम्ही ठरल्याप्रमाणे तिथल्या साध्या प्रसादाच्या जेवणाचा आस्वाद घेतला. हे सगळं होईस्तोवर दुपारचे साडेबारा-एक वाजून गेले होते.आता आमची खरी कसोटी होती. कारण येताना शिखर गाठायच्या नादात भराभर उतरलेल्या पायऱ्या आता परत चढायच्या होत्या आणि थोड्या थोडक्या नाही तर दीड-दोन हजार. त्यासुद्धा अगदी उंच उभ्या सलग ५०-७५ असतील असे उभे च्या उभे चढ, अगदी बऱ्यापैकी जेवून भर दुपारी रणरणत्या उन्हात चढणं म्हणजे आमच्या निग्रहाची परीक्षा होती.

आमच्यातल्या २ जणींना उन्हाचा आणि चढण्याचा त्रास होऊ लागला म्हणून त्यांनी शेवटी डोली केली आणि उरलेले सगळे जसं जमेल तसं एक एक चढण पार करत धापा टाकत परतीच्या मार्गाला लागलो. चढताना किंवा उतरताना खूप जास्त पाणी पिऊ नये म्हणतात त्यामुळे तोंड सुकले, कोरड पडली तर चघळायला लिमलेटच्या गोळ्या, आवळा कँडी, मिंट असं काही ना काही सोबत होतंच. पण भर दुपारी टळटळीत उन्हं आणि घामाघूम झाल्याने तहानलेले सगळे घोटभर पाणी पिऊन घसा ओला करत काठीच्या साह्याने वर चढत राहिलो. सोबतीला अखंड स्वामी नाम आणि श्रीगुरुदेव दत्तांचा आशीर्वाद होताच त्यामुळे पुढचा खडतर टप्पा दीड-दोन तास अखंड चढणीचा डोंगर चढून आता पुढे पुन्हा काही पायऱ्या उतरून जायचं होतं. उतरताना काठी टेकत थोडं तिरकं उतरल्याने गुडघ्यांवर ताण येत नाही. नाहीतर उतरताना काहींना गुडघे दुखीचा त्रास होऊ शकतो. अर्थात 'नी-कॅप' यासाठीच गरजेच्या असतात. मग पुन्हा पुढचा डोंगर उतरून आम्ही अंबामाता मंदिराजवळ अंदाजे दोन-अडीचपर्यंत पोचलो. इथून रोप-वेने खाली उतरायच्या आधी अंबामातेचे दर्शन घेतले. इथे देवीचं रूप बघून का कोण जाणे मला 'श्रीयोगेश्वरी अंबाजोगाई'ची आठवण झाली. काहीतरी साधर्म्य जाणवलं. शेवटी काय 'आदिशक्ती'च ती तिची रूपे अनेक. तिला मनोभावे नमस्कार करून आमचं गिरनार दर्शन सुखरूप पार पाडल्याबद्दल तिचे आभार मानले आणि पुन्हा पुन्हा आम्हाला बोलावून घ्यायची इच्छा व्यक्त केली. उतरताना रोप-वेने अवघ्या १०-१२ मिनिटात आम्ही खाली पोचलो. केबल कारमधून डोंगर उतरणीवर खालच्या पायऱ्या आणि जैन मंदिराचा विस्तीर्ण परिसर दिसत होता. एकीकडे खोल दऱ्या, पसरलेल्या भव्य डोंगररांगा, हिरवेगार घनदाट जंगल, दुपारचे चकाकते, ढगांच्या आडून लपंडाव खेळणारे ऊन आणि दुसरीकडे आठ माणसे बसू शकतील अशी प्रचंड दोरखंडाला बांधलेली भली मोठी केबल कार जिला इथे 'उडन खटोला' म्हणतात त्यात बसून वेगावर स्वार होऊन जमिनीकडे झेपावणारे आम्ही काही मिनिटांचा हा प्रवास इतका रोमांचकारी होता - एवढ्या उंचीवरून एखाद्या पक्ष्याप्रमाणे भरारी घेऊन खाली जमिनीवर येण्यात काही वेगळीच खुमारी होती. गिरनार रोप-वे आणि गिरनार पर्वताचं miniature model अर्थात एक प्रतिकृती बनवलीय. अतिशय सुरेख आहे ती आणि इतर परिसर सुद्धा छान रंगीबिरंगी फुलझाडांनी सजवलेला, स्वच्छ नीटनेटका ठेवला आहे. खाली आल्यावर

भाड्याने घेतलेल्या काठ्या परत करून आम्ही हॉटेल मुक्कामी परतलो. गिरनार वारी म्हणजे एकूणच साधारण पाच हजार पायऱ्या चढणं आणि उतरणं हे दहा हजार पायऱ्या चढून उतरण्याच्या शिवधनुष्यापेक्षा थोडं सोपं झालंय ते रोप-वे मुळे. थोडी चालायची, चढायची प्रॅक्टीस असली तरीही पाय दुखतात पण असह्य असा त्रास होत नाही, कुणाचे गुडघे, कुणाच्या पोटऱ्या तर कुणाच्या मांड्या दुखत होत्या पण त्या दुखऱ्या पायांपेक्षा इच्छापूर्तीच्या आनंदाने, समाधानाने गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशी परतीच्या प्रवासाला लागलो ते आमचं श्रीदत्तदर्शनाचं आनंदनिधान सोबत घेऊनच...जय गिरनारी.

गिरनार यात्रेनंतर अनेकांनी फोन करून गिरनार दर्शनाची चौकशी केली त्यामुळे इथे काही बेसिक टिप्स देत आहे...

१) ज्यांना गिरनार चढून जायची इच्छा आहे त्यांनी आधीपासून थोडा चालायचा, चढायचा सराव अवश्य करावा, त्यामुळे प्रत्यक्ष गेल्यानंतर फारसा त्रास होत नाही. २) वर जाताना कमीत कमी सामान पाठीवर घेऊन जावे ज्याने चढताना त्रास होणार नाही. दिवसा जाणार असल्यास टोपी, गॉगल, सनकोट असे उन्हापासून रक्षण करणारे सामान अवश्य न्यावे. ३) थोडा हलका आहार करून चढायला सुरुवात करावी आणि पाणी अगदी घोटभर प्यावे अन्यथा पोट दुखू शकते. जवळ लिम्लेटच्या गोळ्या, आवळासुपारी, मिंट अशा गोष्टी चघळण्यासाठी जरूर न्याव्यात कारण तोंड सुकून घशाला शोष पडू शकतो. लाडू किंवा दाणे असा सुका खाऊ किंवा सुका मेवा सुद्धा नेऊ शकता. ४) जर रोप-वे ने जाणार असाल तर सॅकमध्ये आपल्या घरची पाण्याची बाटलीच घेऊन जावी त्यात इलेक्ट्राल पाऊडर किंवा ग्लुकॉन डी घेऊन जावं. बिसलेरी नेऊ नये. रोप-वेच्या तिथे काढून टाकण्यात येते. ५) वर चढताना काठी अवश्य घ्यावी. सुरुवातीला थोडी अडचण वाटते पण पुढचे अवघड चढ आणि उतरताना तोल सांभाळण्यासाठी अत्यावश्यक असते. ६) चढताना किंवा उतरताना शक्यतो बसू नये किंवा अगदी काही मिनिटे टेकावं ज्यामुळे चालण्याची लय बिघडत नाही किंवा आपला स्टॅमिना कमी होत नाही. जास्त बसल्याने पाय भरून येण्याची शक्यता असते. ७) पूर्ण दहा हजार पायऱ्या चढायच्या असल्यास रात्री सुरुवात करावी. पहाटे चारला देऊळ उघडतं तेव्हा पोचून येताना रोप वे ने येणं शक्य असतं. ८) रोप-वे ची वेळ सकाळी सात ते संध्याकाळी ५ अशीआहे आणि शुल्क जाऊन यायचे माणशी रु. ७०० आहे. ९) गुरुशिखरावर फक्त पादुका (पदचिन्हे) आणि त्रिमूर्ती दत्तात्रेय आहेत. आपण इथून एखादा प्रसाद घेऊन जाऊन तिथे थोडा काढून ठेवून तोच प्रसाद म्हणून वाटू शकता जेणेकरून मध्ये कुठे प्रसाद विकत घेऊन जायची गरज पडणार नाही. १०) आपल्या जवळची कोरी वस्तू - जपमाळ, पोथी, नवीन खड्याची अंगठी वगैरे नेऊन 'पदस्पर्श' करून आणता येतो. त्यानंतर ती वापरायची सुरुवात करावी असे म्हणतात. ॥ श्री गुरुदेव दत्त - श्री स्वामी समर्थ ॥

## गणपतीची इंग्रजी आरती

**(चाल :** सुखकर्ता दुखहर्ता)

ऑलमायटी गणपती - यू आर ओन्ली वन।
ॲट द बिगिनिंग युवर - पूजा इज डन॥ध्रु०॥
प्रे गॉड - प्रे गॉड
सन ऑफ पार्वती इज गॉड गणपती।
शंकर इज फादर ऑफ मंगलऽमूर्ती॥
ॲज हिज स्टमक - इज काईड।
ऑलसो नोज करेक्टली - प्रेयर माईंड ॥१॥
प्रे गॉड - प्रे गॉड
वी आर प्रीटी ग्रीडी सेल्फीश मेन।
फरगेट रिमेंबर यू ॲज पर सिझन॥
ऑल दो व्हेरी बिझी यू रन क्विकली।
सॉलव्हींग अवर प्रॉब्लेम व्हेरी इझिली॥२॥
प्रे गॉड - प्रे गॉड
ऑलमायटी गणपती यू आर ओन्ली वन।
ॲट द बिगिनिंग युवर पूजा इज डन॥
प्रे गॉड - प्रे गॉड
प्रथमारंभी गजाननाला नमस्कार करुनि
भक्तीभावे वंदुनि मिषा सुमने अर्पुनि चरणी
कासेकर भक्त करिती उत्सव एकजुटीनी
शब्द झोंबला जरी कुणाला धरु नये कुणी राग
परस्परांच्या प्रेमाने फुलतो अनुराग
मनामध्ये करावया आठवणींची फुलबाग

रचना - **कै. नाना गवंडे,** मु. कासे, जि. रत्नागिरी
(सौजन्य - **श्री. विश्वास पाटणकर,** डोंबिवली)

# नर्मदा परिक्रमा एक अनुभूती

– सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे
मो. ९७६३०७९१३१

नर्मदा मैय्याबद्दल खूप ऐकले होते. नर्मदा परिक्रमा काहीजण चालत करतात, तर काही वाहनाने करतात. नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्यास लागणारे ३ ते ४ महिने हा प्रवास झेपेल की नाही ह्याबद्दल साशंक असल्यामुळे वाहनाने का होईना, परंतु करायची असा मनोनिग्रह करून आम्ही समवयीन सहा मैत्रिणी ह्या ट्रीपमध्ये सहभागी झालो. नर्मदा परिक्रमा का करायची त्याची आख्यायिका अशी आहे की, एकदा गंगामैय्या व नर्मदामैय्या तपश्चर्येला बसल्या होत्या. गंगामैय्याची तपश्चर्या पूर्ण झाल्यावर तिने मला तुमच्यात सामावून घ्या असा शंकराकडे वर मागितला. म्हणून गंगामैय्याला शंकराच्या जटेमध्ये स्थान मिळाले. नर्मदामैय्याची तपश्चर्या पूर्ण झाल्यावर तुम्ही तुमच्या पंचायतनासकट माझ्यामध्ये सामावून जा असा वर तिने मागितला. त्यामुळे नर्मदामैय्यामध्ये सर्व देवांचा वास असल्यामुळे परिक्रमा ही फक्त नर्मदामाईचीच करायची असते. प्रवास व अध्यात्माची एक उत्तम अनुभूती हे माझ्या सारख्यांचे सुंदर स्वप्न असते. ते स्वप्न आपल्यातील एक श्री. शरदचंद्र व त्यांच्या अर्धांगिनी सौ. प्राची भिडे यांच्या गायत्री ट्रॅव्हल्सने पूर्ण केले हे सांगायला खूप आनंद होतो. १५ ते १६ वर्षांचा ह्या दाम्पत्याचा नर्मदा परिक्रमेचा अनुभव, उत्तम नियोजन व चोख व्यवस्था ह्यामुळे पुढील वर्षी नर्मदा परिक्रमेची व गायत्री ट्रॅव्हल्स आयोजित ५० वी नर्मदा परीक्रमा यात्रा पूर्ण करतील.

एकूण १८ दिवसांच्या ह्या ट्रीपमध्ये पुणे-इंदोर-पुणे रेल्वेने आणि इंदोर ते इंदोर बसने प्रवास होता. बसप्रवास, निवास व भोजन व्यवस्था उत्तम आणि अगदी घरच्यासारखी होती. प्रत्येक ठिकाणी स्थळांची माहिती देण्यासाठी गाईडची व्यवस्था, जेवण बनवण्यासाठी अनुभवी आचारी, प्रवासासाठी एक ३५ सीटर गाडी. उपवासाचे दिवशी उपवासाचे पदार्थ होते. बहुतेक दररोज भोजनात पुरणपोळीसह मिष्टान्नाची मेजवानी. इच्छित स्थळी संध्याकाळी पोचल्यावर दुसऱ्या दिवशी किती वाजता निघायचे, किती तासांचा प्रवास व कुठे कुठे जायचे ह्या नियोजनाबाबत माहिती देण्यात येत होती. पोचल्यावर जेवण बनविणारे, जेवण तयार होईपर्यंत सत्संग होत असे. आजपावेतो अर्धशतकी यात्रेचा अनुभव ह्या भिडे



**श्री. शरदचंद्र व सौ. प्राची भिडे**

दाम्पत्याला असल्यामुळे सर्वकाही सुकरपणे होत होते. श्री. शरदकाका भिडे ७७ वयाचे असले तरी मनाने कणखर, शिस्तप्रिय असे व्यक्तिमत्त्व. सगळीकडे लक्ष देऊन आपली परिक्रमा नियोजनानुसार कशी पार पडेल ह्याकडे जातीने लक्ष देत असत. सर्वांच्या मनाची आणि तब्येतीची काळजी आवर्जून घेत होते. त्यांच्या अर्धांगिनी प्राचीताई तर आमची मैत्रीण, बहीण व आई ह्या सर्वांच्याच भूमिका करत होत्या. आमचे जेवण, नाष्टा, आसन व्यवस्था, निवास व्यवस्था सांभाळताना धार्मिक कार्य पण करून घेत होत्या. दररोज वेगवेगळा नाष्टा व जेवण देऊन १८ दिवस आमचे खूप लाड केले. बरोबर असलेला सेवक वर्ग अनेक वर्षे त्यांचेच बरोबर काम करत असल्याने त्यांच्याबरोबर ह्या दाम्पत्याचे नाते कौटुंबिक असे होते. गायत्री ट्रॅव्हल्सबरोबर असलेल्या सेवकांनी ह्या दाम्पत्याबद्दल सांगितले की कोविडच्या लॉकडाऊनच्या काळात सर्व काही बंद होते. त्या काळात ह्या दाम्पत्याने आम्हाला आमचे गावी आर्थिक मदत निरपेक्षपणे पाठविली. हे अनंत उपकार आमच्यावर आहेत असे ते सांगतात. कामाचा मोबदला तर प्रत्येकजण देत असतोच तरी पण त्यामध्ये आपुलकी व विश्वास असणे हे सर्वच ठिकाणी बघायला मिळत नाही. अमूक व्यक्तीला नर्मदा परिक्रमेला यायचे आहे परंतु सध्या पैसे कमी आहेत. त्या व्यक्तीला पुरेसा अवधी देऊन न अडवता नर्मदा परिक्रमा पूर्ण करवितात हे विशेष नमूद करावेसे वाटते. म्हणून गायत्रीबरोबर परिक्रमा पूर्ण करणे एक अनुभव व अनुभूतीच म्हणावी लागेल.

# श्री योगेश्वरीदेवी आंबेजोगाई, जि. बीड

संकलन
**– सौ. पूनम अमित भिडे**, पुणे

श्री योगेश्वरीदेवी ही बहुसंख्य चित्पावन ब्राह्मणांची कुलदेवता आहे. सर्व चित्पावन मंडळींची मूळ गावे कोकणात मग त्यांची ही कुलस्वामिनी मराठवाड्यात कशी ? असा प्रश्न अनेकांना पडतो. ह्या संबंधीची पौराणिक कथा आहे. ती अशी की, कोकणातील योगेश्वरीचे लग्न तिच्या आई-वडिलांनी परळीच्या वैजनाथाशी ठरविले. मात्र तिला ते मान्य नव्हते. आपण हे लग्न टाळायचेच, करायचे नाही असा तिचा ठाम निश्चय होता. तरीसुद्धा आई-वडिलांच्या दडपणाखाली ती वऱ्हाडाबरोबर आंबा गावी आली. आंबा गावापासून परळी वैजनाथ जवळ आहे, तेथे वऱ्हाड थांबले. दुसरे दिवशी लग्नासाठी हे सर्व परळीला जाणार होते. दुसरे दिवशी योगेश्वरीने वेळ काढायचा म्हणून लवकर आवरेना. शेवटी लग्नाची वेळ झाली तरी ती तयार होईना. तिकडे परळीला वैजनाथ व त्यांचे वऱ्हाडही वाट पाहून थकले. लग्नाचा मुहूर्त टळून गेल्यावर वैजनाथाला राग आला आणि त्या रागातच तो आंबा येथे गेला. योगेश्वरीला आपल्याशी लग्न करायचे नाही हे पाहून वैजनाथ संतापला व त्याने शाप दिला की तुम्ही सर्वजण दगड होऊन जाल. त्याप्रमाणे सर्व वऱ्हाडाचे हत्ती, घोडे व योगेश्वरीच रूपांतर पाषाणात झाले. लग्न मोडले व योगेश्वरीला जे पाहिजे होते ते झाले आणि ही देवी कायमची कुमारिका राहिली. बहुधा ह्याच कथेमुळे कोकणस्थांमध्ये बोडण कालवताना कुमारिकेचे महत्त्व आहे. आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या स्त्रीचा कोणताही समाज आदर करतो. तिला देवस्वरूप देतो हेच येथे दिसून येते. ही योगेश्वरी समस्त चित्पावनांची कुलदेवता झाली. ह्या मंदिरापासून काही अंतरावर योगेश्वरीचे वऱ्हाड म्हणून एक लेणे दाखवितात तेथे हत्ती, घोडे व अनेक माणसे दगडात कोरली आहेत.

हे खूप मोठे हेमाडपंथी मंदिराचा सभामंडप ४० ते ४५ फूट लांब असून तीन दरवाजे आहेत. बाजूच्या दोन दारांतून आल्यानंतर दोन्ही बाजूंना कठडे, मधला लांब भाग सुमारे १२ फूट, ३० दगडी कोरीवकाम असलेले खांब, त्यावर उलटे नाग, काही ठिकाणी आधारशीला व तेथेच काही किर्तीमुखे कोरलेली आहेत. नेहमीच्या हेमाडपंथी मंदिराला वरती ९ झुंबरे असतात तशी रचना येथे नाही. मधल्या भागात घुमटाकार पद्धतीचे छत, तसेच उजव्या बाजूच्या खांबांना लागून विष्णू, गणपती, देवी अशा मूर्ती आहेत. गाभाऱ्याच्या प्रवेश दरवाजावर ३-३ सेविका, गणेशपट्टी नाही तेथे फूल कोरले आहे. ३ फूट उंच चौथऱ्यावर मागील भिंतीला लागून श्री जोगेश्वरीचा तांदळा, ह्या तांदळ्याला चांदीचे कुंकू, डोळे, मुख लावले आहे. वरच्या बाजूने चांदीची वेणी, मागे चांदीचे चंद्र, सूर्य व चांदीची आयुधे खोचलेली आहेत.

मंदिराच्या येण्याच्या मार्गावर उंच प्रवेशद्वार व नगारखाना असून मुख्य तटभिंतीबाहेर दीपमाळ आहे. मंदिराचे मुख्य द्वार आता रस्त्याच्या विरुद्ध मागील बाजूला गेले असून बाजूचे द्वार मुख्य झाले आहे. पेशवाई पद्धतीची उंच दीपमाळ असून त्याचे पलीकडे ३ ते ४ समाध्या व पलीकडे खूप मोठी चौकोनी पायऱ्या असलेली बाव आहे. या सर्वांचे बाहेर एक मोठी तटभिंत असून तेथे २ महादेवाची व एक मारुतीचे अशी ३ देवळे आहेत. यादव नृपती सिंधण व त्याचा मंत्री खोलेश्वर यांनी अंदाजे इसवीसनाच्या १३ व्या शतकात दिलेला एक शीलालेख उपलब्ध आहे. या शीलालेखामध्ये सकलेश्वर व इतर देवालये बांधल्याचा तसेच खोलेश्वराने योगेश्वरीच्या मंदिराला दिलेल्या सुवर्ण, रत्ने, तेलाणी गाव इत्यादी देणग्यांचा उल्लेख आहे. त्याच्या काही पराक्रमी कृत्यांची नोंद या लेखात केली आहे. हा लेख विष्णुवृद्ध गोत्रीय धनेश्वर पुत्र माधव याने तयार केला असून त्रिलोचन याने लिहिला आहे. या लेखात यादव नृपती (२) खोलेश्वर-माधवाचा पिता(५) त्रिलोचन लेख कोरणारा यांची नावे आलेली आहेत. लिंबा गणेश येथील गणपती मंदिर प्रसिद्ध आहे. परळी येथील वैजनाथाचे आणि आंबेजोगाई येथील योगेश्वरीचे दर्शन घेण्यापूर्वी ह्या गणपतीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.

***(सौजन्य – 'देवदर्शन', जि. रत्नागिरी, श्री. व सौ. कुंटे)***

# घर

– सौ. योगिनी मा. भिडे,
पुणे. मो. ७५८८२३५८८०

'घर' या विषयावर विचार करताना लक्षात आले की या विषयाची व्याप्ती खूपच मोठी आहे. घर म्हटल्यावर विविध प्रकारची घरे, घरातील माणसे, घरातील माणसांचे एकमेकांशी नातेसंबंध, घरातील सामान, घराशी संबंधित गाणी, कविता, घराचे शेजारी, एक ना दोन, घराशी निगडित अनेक विषय मनात घर करू लागले. शेवटी यापैकी एकाच विषयावर लिहावे असे मनाशी पक्के केले. खरंच, अन्न वस्त्र, निवारा या प्रत्येक प्राणिमात्राच्या मूलभूत गरजा. या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येकजण झगडत असतो. निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी घर बांधले जाते. प्राणी, पक्षी सुद्धा विविध प्रकारची घरे बांधतात. मुंग्यांचे वारूळ, नाग, साप यांचे वारूळ, पक्ष्यांची घरटी, वैशिष्ट्यपूर्ण असा सुगरणीचा खोपा, मधमाश्यांचे पोळे, उंदराचे बीळ ही त्यापैकीच काही घरे. काही प्राणी, पक्षी निसर्गनिर्मित निवाऱ्यांचाच घर म्हणून उपयोग करतात. वाघ, सिंह गुहेत राहतात. माकडे झाडावर राहतात. कीटक दगडांच्या कपारीत वास्तव्य करतात. काही पक्षी झाडांच्या ढोलीत राहतात. मासे पाण्यातच राहू शकतात. त्यातसुद्धा काही मासे गोड्या पाण्यात तर काही मासे समुद्राच्या खाऱ्या पाण्यात राहतात. जेव्हा माणूस प्राणी, पक्षी पाळतो तेव्हा तो त्यांच्यासाठी घरे बांधतो. पाळीव पक्षी पिंजऱ्यात ठेवले जातात. घोड्यांसाठी तबेला, पागा, गाईगुरांसाठी गोठा, कोंबड्यांची खुराडी असे निवारे तयार केले जातात. माणूस वनस्पतींसाठीसुद्धा घरे तयार करतो. गुलाब, तुळस यांसारखी झुडपे तो कुंडीत लावतो. फळझाडे, फुलझाडे यांच्यासाठी बागा तयार करतो. जसे की आंब्याची आमराई, द्राक्षांच्या वेलांसाठी मांडव टाकून तयार केलेली द्राक्षांची बाग, ज्वारी, गहू, बाजरी, मका यांसारखी धान्ये तो शेतात पेरतो.

माणूसही विविध प्रकारची घरे बांधून त्यात राहतो. भौगोलिक परिस्थितीनुसार माणसाच्या घरांचे स्वरूप बदलते. कोकणातील घरे उतरत्या छपतराची असतात. सतत भूकंपाचा धोका असणाऱ्या जपानसारख्या देशात तर चक्क पुठ्ठ्याची घरे बांधतात. भटके लोक तंबूत राहतात. घराच्या आकारानुसार, बांधणीनुसार घरांना वेगवेगळी नावेही दिली आहेत. झोपडी, राजवाडा, बंगला, महाल, फ्लॅट, वाडा ही त्यापैकीच काही नावे. अवकाशात आकाशयात्रींना वास्तव्य करता यावे म्हणून सर्व सोयींनी युक्त अशा अवकाशस्थळांचा वापर केला जातो. ही अवकाशस्थळे अवकाशात सतत फिरत असतात. ही अवकाशस्थळे म्हणजे अवकाशयात्रींचे अवकाशातील घरच.



साधूसंतांसाठी तर 'अवघे विश्वचि माझे घर' असते. घर म्हणजेच गृह किंवा आलय. घरात घेतली जाते घरातील घटकांची काळजी. तसेच घरातील घटकांना मिळते पूर्ण सुरक्षितता. आता पाहू अशीच काही घरे.

**ग्रंथालय** – ग्रंथालयात विविध प्रकारचे ग्रंथ व्यवस्थित ठेवले जातात. ते खराब होऊ नयेत, त्यांना वाळवी लागू नये म्हणून विविध उपाययोजना केल्या जातात.

**वाचनालय** – वाचनालयात वाचकांना वाचता यावे म्हणून सर्व सोई असतात.

**भोजनालय** – भोजनालयात उत्तम प्रकारचे जेवण ग्राहकाला देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**रुग्णालय** – रुग्णालयात घरी ठेवून बरे होऊ न शकणाऱ्या रुग्णांना दाखल केले जाते. त्यांच्यावर योग्य ते औषधोपचार केले जातात.

**कार्यालय** – विविध प्रकारची कामे करण्यासाठी विविध कार्यालये असतात.

**महाविद्यालय** – महाविद्यालयात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण दिले जाते.

**मंत्रालय** – मंत्रालयातून सर्व मंत्री आपापले कामकाज करतात.

**देवालय** – देवालय म्हणजेच देवाचे घर.

**शिवालय** – शिवालय म्हणजे शंकर या देवतेचे घर.

**मंगल कार्यालय** – मंगल कार्यालयात लग्न, मुंज, साखरपुडा, बारसे इत्यादी मंगल कार्ये करण्यासाठी सर्व सोई असतात.

**अनाथालय** – अनाथालयात अनाथ मुले, मुली राहतात.

**कारागृह** – कारागृहात विविध प्रकारचे कैदी शिक्षा भोगत असतात. त्याचवेळी ते कैदी सुधारावेत, त्यांचा चांगला

विकास व्हावा म्हणूनही प्रयत्न केले जातात.

**विश्रामगृह, अतिथीगृह** – अतिथींसाठी विश्रामगृह, अतिथीगृह बांधले जाते. जेव्हा सरकारी नोकर कामानिमित्त परगावी जातात तेव्हा ते सरकारी अतिथीगृहात राहतात.

**प्रसुतीगृह** – प्रसुतीगृहात पूर्ण काळजी घेऊन नवीन बाळांना जन्म दिला जातो. आईची व बाळाची योग्य ती काळजी घेतली जाते.

**नाट्यगृह** – नाट्यगृहात प्रेक्षकांना नाटके बघता यावीत म्हणून विविध सोई असतात.

**चित्रपटगृह** – चित्रपटगृहात चित्रपट बघण्याची सोय असते.

**सभागृह** – सभागृहात विविध प्रकारच्या सभा घेतल्या जातात.

**उपहारगृह** – उपहारगृहात अनेकविध पदार्थांचा आस्वाद घेता येतो.

**स्वच्छतागृह** – लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी सर्व आवश्यक सोईंनी युक्त अशा स्वच्छतागृहांची गरज असते.

तर अशी ही विविध प्रकारची घरे. प्रत्येक घराचे स्वरूप वेगवेगळे असले तरी प्रत्येक घराचा उद्देश मात्र त्या घरातील घटकाला निवारा मिळावा हाच असतो. हा उद्देश पूर्ण करणारे घरच खऱ्या अर्थाने घर म्हणता येईल.

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !

आमचे आई-वडील
सौ. सुप्रिया सुभाष भिडे
श्री. सुभाष वामन भिडे
यांच्या ५०व्या विवाह वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा !

*केदार सुभाष भिडे*
*अमित सुभाष भिडे*
(मो. ९९३०००४०२०)
१८/ब, अंकुर सोसायटी,
लिबर्टी गार्डन रोड नं.४,
मालाड (पश्चिम), मुंबई-४०० ०६४.

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !



॥ सद्गुरवे नमः ॥

प्रोप्रा. : सौ. मृण्मयी श्रीपाद भिडे
९४२३५९१३४०
८६९८५३७८५२
९८२२६०६३६०

आपलं सोलापूर
चादरींचे दालन व खाद्योपयोगी वस्तू भांडार
शॉप. नं.३, विनायक अपार्टमेंट, तपोधाम कॉलनी, आंबी रोड,
शिवाजी चौकाजवळ, तळेगांव दाभाडे, पुणे-४१०५०७.

- सोलापुरी चादरी
- कॉटन बेडशीटस्
- दिवाण सेट • गालीचे
- सतरंज्या • दोहर
- कॉटन बॅग्ज
- प्रवासी बॅग्ज
- लेदर पर्सेस
- कॉटन साड्या
- ड्रेस मटेरियल
- कॉटन शर्टस् • स्वेटर
- टॉवेल • नॅपकीन
- साडी कव्हर
- शर्ट कव्हर
- विविध मसाले
- सुप्रसिद्ध सोलापूर शेंगा चटणी (लसूण/विना लसूण)
- पापड, लोणची

*With Best Compliments From....*

PERMAFINISH® DOORS

— REVOLUTIONIZING —
# FRP DOORS
Through Innovations!



Entranza

FRP Moulded Shutters,
Frames, Pergolas,
Architectural products

**Since 1984**

Contact Person
& Number:
Bhushan Tiwari
+917045727976

Advance FRP
4 Avinash Bhuvan Dixit Cr Road 1,
Vile Parle East, Mumbai 400 057
Ph: 022 26175636

advancefrp@gmail.com | www.permafinishdoors.com

BHARAT BILLPAY

टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

# सर्व प्रकारच्या बिलांकरीता टीजेएस्बी बँकेची सुलभ, विश्वासार्ह आणि सुरक्षित बिल भरणा सुविधा!




- वीज
- गॅस
- पाणी
- टेलिफोन / मोबाईल
- डी.टी.एच / केबल
- शिक्षण शुल्क
- हॉस्पिटल
- विमा
- फास्टॅग रिचार्ज
- कर्जाचे मासिक हफ्ते

इतर संकलन सुविधा उपलब्ध

*नियम व अटी लागू.

www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466

IQCS IRQAO ASCB(E)

# NIKITA BOILERS

(www.nikitaboilers.com) (nikitaboilers@gmail.com)

***We*** *introduce ourselves as pioneers and leading manufacturer of a system for Abatement of smoke produced from burning dead bodies on Wood-Pyres. Very first System of this kind was installed by us at Mumbai Jagannath ShankarSheth Hindu Cemetery, Chandanwadi, Marinelines, in 2001.*

***Most*** *of the equipment is made from long lasting Stainless Steel. The crux of the System is the Scrubber; here the Smoke is scrubbed with Water and Chemicals to remove solid particles and to absorb Carbon. The turbid-dirty water is filtered and reused for few cycles and then drained. The still hot but cleaner air is, then, let out at 100 feet height above ground through Chimmney. Thus most of the pollution is absorbed in water and remaining is let out high above, avoiding smoke accumulation at the Ground Level.*



***The*** *system is successful in reducing, 1000 milligrams per Meter Cube of particular matter down to less than 100 milligrams per Meter Cube of particulate.*

***This*** *system, being directly related to the health and wellbeing of the people, prompted many corporator's to get the System installed in their locality. Hence, starting from 201-Chandanwadi, we installed the System at over 8 sites in Mumbai and at nearly 18 sites in Pune (city) since 2013 (Starting with Vaikunthdham-Navi peth.)*

***We*** *have our own manufacturing, fabrication and testing facility for all components of the system, we also have the necessary man power and expertise, required for site installation till final commissioning along with expertise in system maintenance. The final Testing of the system is done by a Government approved laboratory under MPCB and CPCB guidelines. Test results have shown more than 95 percent reductions in the Concentration of Total Particulate Matter in the flue gas.*

**Factory & Head Office :** C-46, Sinnar-MIDC, Nashik - 422103.
**Mobile :** 9819233845 *(C.A. Bhide)*, 9869102884 *(A.P. Bhide).*




**Villas Starting @ 37.90 Lacs***
**Near Shahapur**

**+ 91 8692 00 2299 / 55**
**www.euro-ville.com**

MahaRera Regestration No:
Euro-Ville Phase I - P51700001003
Euro-Ville Phase II - P51700001090

**1Bhk & 2Bhk Flats Available**
**In Talegaon Near Pune**

Thane Office: 102, Shivanand Society, Above Times of India, M.G.Road, Naupada, Thane (W) 400602. Tel: 022- 2544 2111

# भारतीय जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धन

– **सौ. वृषाली मधुसूदन भिडे,** मुंबई
मो. ९८२१२५७८७७

पर्यावरण ! पर्यावरण !! हा शब्द अनेकविध माध्यमांतून आपण सतत ऐकतो, वाचतो. आपल्या सभोवतालचे वातावरण म्हणजेच पर्यावरण !! सध्या विविध ठिकाणी अचानक उद्भवणारी पूरस्थिती, काही ठिकाणी कोरडा किंवा ओला दुष्काळ, भूस्खलन, तापमानातील वाढ, कमी दाबाच्या पट्ट्यामुळे निर्माण होणारी चक्रीवादळे, बर्फ वितळणे यावरून पृथ्वीवरचा पर्यावरणाचा समतोल ढळलेला आहे हे लक्षात येते. परमेश्वराने मानवाला अनंत हस्तांनी पर्वत, नद्या, झाडे, वेली, समुद्र यांसारखे नैसर्गिक स्रोत उपलब्ध करून दिले. हे सर्व स्रोत युगानुयुगे परोपकाराचे कर्तव्य चोख बजावत आहेत. सूर्य, चंद्र, ग्रह, तारे यांची निर्मिती करून त्यांचे पर्यावरणाशी तसेच मानवी जीवनाशी असलेले नाते उलगडून दाखविले. विश्वाच्या निर्मितीपासून हे निसर्गचक्र अव्याहतपणे चालू आहे. दिवस-रात्र तसेच उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे ऋतुचक्र म्हणजे निसर्गरंगांची मुक्त उधळणच ! हे सर्व आनंददायक व मानवोपयोगी आहे हे सिद्धच झाले आहे. याचा फायदा पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व मानवी आयुष्य सुखी करण्यासाठी होतो. याचा प्रत्यय माणूस गेली कित्येक वर्षे घेत आहे. सुरुवातीला मानवाने निसर्गसृष्टीचा आदर केला. त्याचे पूजन व योग्य संगोपनही मनोभावे केले.

पण कालांतराने माणूस प्रगत व तंत्रज्ञानयुक्त झाला. निसर्गाशी मैत्री करता करता तो त्यावर अधिकार गाजवू लागला. त्याला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या मूलभूत गरजा, पण त्या पूर्ण करण्यासाठी तो नैसर्गिक गोष्टींचा अनिर्बंध वापर करू लागला. सधन होण्यासाठी कृषिक्षेत्रात विविध प्रयोग करू लागला. रासायनिक खते व रासायनिक द्रव्यांची बेसुमार फवारणी करू लागला. त्यामुळे धान्योत्पादन वाढूनही दर्जा खालावला. 'अति सर्वत्र वर्जयेत्' ही उक्ती माणूस सोयीस्करपणे विसरला. परिणामी जमीन हिणकस झाली. कीटकनाशकांचा अतिवापर शेतीला घातक ठरला. 'जीवो जीवस्य जीवनम्' या सूत्रानुसार एक जीव त्याच्यापेक्षा मोठ्या जीवाचे भक्ष्य ठरतो. यावरच कालचक्र चालते. पण माणसाच्या अतिईर्षेमुळे अनेक छोटे-मोठे जीव प्राणास मुकले. विविध तऱ्हेच्या प्रतिजैविकांमुळे धान्य, फळे, भाज्या या सर्वांवर विपरीत परिणाम झाला. पौष्टिकपणा नष्ट होऊन माणसाचे शरीरही कमकुवत होऊ लागले. वस्त्रनिर्मितीत माणूस स्वावलंबी व अग्रेसर झाला. 'स्वदेशी खादी'चे नाव देशविदेशात गाजले. पण त्यासाठी घरबांधणीसाठी जंगलतोड केली गेली. जंगलाचे उजाड माळरान झाले. झाडांवरचा पक्ष्यांचा निवाराच नाहीसा झाला. निसर्ग व माणूस परस्परपूरक घटक आहेत. परमेश्वराने दोघांनाही 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' या स्वप्नपूर्तीसाठीच घडविले आहे. विचारवंत माणसाने साध्या, सोप्या पर्यावरणपूरक गोष्टी कराव्यात. हे अगदी सहज शक्य आहे. धूर सोडणाऱ्या इंधनतेलयुक्त वाहनांचा वापर न करता दुचाकी म्हणजे सायकलचा जास्तीत जास्त वापर केल्यास वायूप्रदूषणावर नियंत्रण राहील तसेच उत्तम व्यायामामुळे शरीरसौष्ठव अबाधित राहील. घरोघरी वापरण्यात येणाऱ्या विजेच्या यंत्रांच्या अतिवापरामुळे काम करण्याची क्षमता, सहनशक्ती व शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होते. त्यासाठी यंत्रांचा कमीत कमी वापर करावा. सेंद्रीय पद्धतीने शेती केल्यास जमिनीचा कस कायम राहील. सिमेंटची इमारतीरूपी जंगले उभारण्याऐवजी पुष्पौषधी, वनौषधी व पोषणमूल्ययुक्त पिकांची लागवड करावी. म्हणजे ही निसर्गदेवता हिरवाईने बहरेल. सर्वत्र 'प्लॅस्टीकमुक्ती' झाली तर 'प्रदूषणमुक्ती' आपोआपच होईल. हा प्रत्येकाने मनोमन निर्धार करून परमेश्वराकडे सर्वांसाठी प्रार्थना करावी.



'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्॥'

या प्रार्थनेबरोबरच ज्या वसुंधरेने माणसाला निरपेक्ष वृत्तीने आपल्याजवळचा सर्व धान्यखजिना बहाल केला. विविध रूपांनी सर्व जीवसृष्टीचे आजीवन पालनपोषण केले तिच्या-बद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी प्रतिवर्षी ५ जूनला जगभर 'पर्यावरण दिवस' साजरा करतात. यानिमित्ताने ठिकठिकाणी वृक्षारोपण करतात. शाळा, महाविद्यालये तसेच सरकारी कचेऱ्यांमध्ये पर्यावरणासंबंधी जनजागृती करतात. वक्तृत्व स्पर्धा व भाषणे होतात. ज्यामधून पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित होते. असे सद्‌विचार सतत अंगवळणी पडले तर भावी पिढी पर्यावरणाबाबत अधिक जागरुक होईल व सर्वत्र संस्कारक्षम जीवनशैलीचे आचरण होईल यात शंकाच नाही.


आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी अंकास हार्दिक शुभेच्छा !
2022
नव्या वर्षाची खरी सुरुवात
प्रत्येकाचे गृहस्वप्न
आता होईल साकार !
जनता गृहकर्ज योजना @6.95%
*नियम व अटी लागू
व्याजदरा पासून गृहकर्ज उपलब्ध
कमीत कमी कागदपत्रे
आणि त्वरित
मंजुरी.
70 लाखांपर्यंत अर्थसहाय्य
आजच आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा ...!
जनता बँक JANATA BANK
जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून)
www.janatabankpune.com
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८/५९

आम्ही भिडे सुवर्ण महोत्सवी विशेषांकास....

हार्दिक शुभेच्छा

# मंगलम् ट्रेडिंग कंपनी

## जनरल मर्चन्ट अ‍ॅण्ड कमिशन एजंट

४०५, मार्केट यार्ड, सिंडिकेट बँकेसमोर,
गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
फोन : २४२७०९३०, २४२७०९४०
मो. ९३७१००६१९७, ९८९०२७१००५
**रविवारी बंद**

साखर
गहू
ज्वार
तांदूळ
डाळी
आटा
रवा
बेसन
मैदा
कडधान्ये
साबुदाणा
यांचे
होलसेल व्यापारी

*** सुलेखचंद जैन**
*** संदीप जैन**

## नेते आणि राजकारण !

एकाने लगावले जोरदार टोले,
दुसऱ्याने घेतले चिमटे
साऱ्या पक्षांत असतात थोडेबहुत,
सारखेच धुमाकूळ घालणारे भामटे
आमच्या वाटेला जाऊ नका
नाही तर म्हणतात फोडू तुमचं बिंग,
एकमेकांवर तुफान चिखलफेक करून
उभे विरुद्ध पार्टीवर रोखून शिंग
संधी मिळेल तिकडे सगळ्या पक्षात
माकड उड्या उमेदवारांच्या
जिथे तिकीट पक्कं होईल
तिकडे निष्ठा वळतात त्यांच्या
कोणी कुणाच्या गळास लागतील
पक्षात म्हणे मेगा भरती येईल
बहुमत मिळून सत्ता आल्यावर
जनतेला लुटणे सोपे जाईल
आत्महत्या, पुरात उध्वस्त शेतकऱ्यांना
कामगारांच्या हातावर पोट असणाऱ्यांच्या
नोकरीस मुकलेल्या उच्च शिक्षित बाबुंच्या
आत्महत्या ऋण काढून घरं घेतलेल्या तरुणांच्या
रोजी रोटी नसलेल्या झोपडी धारकांचा
सर्वच नेत्यांना येत असतो
खोटा अन मोठा कळवळा
सोशल मिडियावर चर्चासत्रे
वादविवाद भांडणे सभागृहात कुरघोड्या
हाणामाऱ्या, धक्काबुक्की शिव्याशाप
भोटीगाठीत जुन्या नव्या मंत्र्यांनाही येतो उमाळा
पीडितांच्या नशिबाची परवड मात्र थांबत नाही
थकलेल्या जनतेला न्याय कधीच मिळत नाही
स्त्रियांच्या अब्रूची लक्तरं
कुणा... कुण्णालाही छळत नाहीत
खुनी, लुटारू, चोर फरार बदमाश
पोलीसांना कुठेच कधी सापडत नाहीत
जनता मात्र हतबल. पक्ष बदलून मतदान करते
संस्थानिक झालेल्या नेत्यांना तरीही मत देते
दरवेळी नेता मात्र जनतेला फसवत राहतो
जनतेच्या खिशातून लूटमार करत राहतो
दीनदुबळे यातून सुटण्यासाठी
परमेश्वराला नवस सायास
पूजा प्रार्थना करत असतात
उत्सवाच्या नावाखाली देवांनाही
नेतेच दरवर्षी वेठीस धरतात
राजकारणाचे दशावतार फक्त
सामान्य जनतेला भोगावे लागतात
गल्ली पासून दिल्ली पर्यंत सगळे नेते
सगळेच पक्ष सारखे असतात

– **डॉ. सौ. प्रतिभा भिडे**, ठाणे

## एक पणती !

काळोखाच्या गुहेत
अडकलेल्या मनाला
मंद प्रकाशाने सोडवणारी
एक पणती...
इच्छा अपूर्ण असणाऱ्यांना
त्या पूर्ण करण्यासाठी
आशेचा किरण दाखवणारी
एक पणती...
अंधारात असणाऱ्या
लोकांच्या घरासमोर
तेजाचा खरा अर्थ सांगणारी
एक पणती...
निराशेच्या काळजीला
हलकेच झटकून
चैतन्याच्या उंबरठ्यावर तेवणारी
एक पणती...
तेलाशी खेळणारी
कापसाशी जुळवून घेणारी
अग्नीच्या साथीने डोळे दिपवणारी
एक पणती...

– **करुणा भिडे**, डोंबिवली




श्री®
महालक्ष्मी
वस्त्र भांडार
1935

• कांजीवरम • इन्दौरी • उपाडा • माहेश्वरी
• बनारसी • वलकलम • कोसा • नऊवारी साड्या
• चंदेरी • प्रिंटेड सिल्क • पैठणी आणि इतर व्हेरायटीज

30, जेल रोड, इंदौर 452 007 (म.प्र.) फोनः 0731-2535071, 2541120 मोबाइल : 83057 43838
ब्रांचः किले के पास, महेश्वर

# आगटे - गिजरे बिल्डर्स

## समर्थ सदन

**1/2 BHK फ्लॅट्स**

माटेराम मंदिरा समोर, फुटका तलाव शेजारी, शनिवार पेठ, सातारा




## सिद्धिविनायक प्लाझा

**1/2 BHK फ्लॅट्स, शॉप्स आणि ऑफिसेस**

सोहोनी गिरणी जवळ, मंगळवार पेठ, सातारा






## चैतन्य रेसिडेन्सी

**लक्झुरियस 3 BHK फ्लॅट्स**

के. बी. पी. कॉलेज जवळ, सदर बझार, सातारा

## मॉडेल लॅण्डमार्क

**2/3 BHK फ्लॅट्स आणि पेंटहाऊस**

माऊली ब्लड बँके जवळ, आय एम ए हॉल, पोवई नाका, सातारा




**8308311511**
**9422053952**

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले. **संपादक : प्रफुल्ल डबीर. मो. 8623053750**
**email - prajaktaweekly@gmail.com • RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI • Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS**